उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत

उठा, जागे व्हा, ध्येया प्रत चला

# उन्मेष

## वार्षिकांक २०१९-२०



## नानासाहेब कुंटे शैक्षणिक संकुल

◆ जनता शिक्षण मंडळाचे

श्रीमती इंदिराबाई जी. कुलकर्णी आर्टस्,

जे. बी. सावंत सायन्स व सौ. जानकीबाई धोंडो कुंटे कॉमर्स् महाविद्यालय

आणि कला, विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय

◆ ॲड. दत्ता पाटील विधी महाविद्यालय

अलिबाग-रायगड




शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी मुंबई विद्यापीठाचा अत्यंत मानाचा सर्वोत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुहास पेडणेकर यांच्या हस्ते प्रकुलगुरू डॉ. रविंद्र कुलकर्णी, कुलसचिव डॉ. अजय देशमुख व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत महाविद्यालयास देण्यात आला. महाविद्यालयाच्या वतीने  जनता शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष, ॲड. श्री. गौतम पाटील, प्राचार्य डॉ. अनिल पाटील, उपप्राचार्य प्रा. अविनाश ओक, प्रा. पी.डी. दातार यांनी इतर सहकाऱ्यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार स्वीकारला.



मुंबई विद्यापीठ

उत्कृष्ठ महाविद्यालय पुरस्कार
शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९
(ग्रामिण विभाग)

जनता शिक्षण मंडळाचे स्व. नानासाहेब कुंटे शैक्षणिक संकुल
श्रीमती इंदिराबाई ज. कुलकर्णी कला महाविद्यालय, जे. बी. सावंत विज्ञान महाविद्यालय आणि
सौ. जानकीबाई धोंडो कुंटे वाणिज्य महाविद्यालय
अलिबाग, जिल्हा रायगड

यांना बहुमोल शैक्षणिक संपादन आणि विद्यापीठातील विविध यंत्रणेमार्फत महाविद्यालयातील शिक्षकांचा विद्यापीठाच्या कामकाजातील सहभागा प्रित्यर्थ प्रदान करण्यात येत आहे.

BEST COLLEGE AWARD

Academic Year 2018 – 2019
(Rural Area)

is conferred upon

Janata Shikshan Mandal's Late Nanasaheb Kunte Educational Complex
Smt. Indirabai G. Kulkarni Arts College, J. B. Sawant Science College and
Sau. Janakibai Dhondo Kunte Commerce College
Alibag, Dist. Raigad

In recognition of valuable academic achievements and participation of the college teachers in the University system through various mechanism of the University.

Mumbai – 400 032
26th January, 2020

Prof. Suhas Pednekar
Vice Chancellor

उठा, जागे व्हा, ध्येयाप्रत चला.

"आम्ही जनता शिक्षण मंडळाच्या महाविद्यालयाचे व्यवस्थापन, प्रशासन,
विद्यार्थी आणि शिक्षक सचोटी, सृजनशीलता,
सुजनता आणि श्रमप्रतिष्ठा यांचे प्रती प्रतिज्ञाबध्द आहोत."

**नानासाहेब कुंटे शैक्षणिक संकुल**

जनता शिक्षण मंडळाचे
श्रीमती इंदिराबाई जी. कुलकर्णी आर्टस्,
जे. बी. सावंत सायन्स व
सौ. जानकीबाई धोंडो कुंटे कॉमर्स् महाविद्यालय
आणि कला, विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय
अलिबाग, रायगड. (नॅक द्वारा प्रमाणित (B))
ॲड. दत्ता पाटील विधी महाविद्यालय, अलिबाग-रायगड

# उन्मेष
## २०१९-२०

**संपादक मंडळ**

**मुख्य संपादक**
प्राचार्य डॉ. अनिल पाटील

**सहसंपादक**
प्रा. सुरेंद्र दातार

**उपसंपादक**
प्रा. जयेश म्हात्रे

**सदस्य**
प्रा. डॉ. प्रवीण गायकवाड
श्री. प्रवीण पाटील
श्री. जे. डी. पाटील
सौ. नीलम म्हात्रे

**विद्यार्थी प्रतिनिधी**
कु. प्रांजली जाधव टी.वाय.बी.ए.



संस्थापक

**नानासाहेब कुंटे**



आमचे प्रेरणास्थान

# लोकनेते ॲड. दत्ता पाटील



**संजय दत्ता पाटील**

अध्यक्ष

जनता शिक्षण मंडळ

# जनता शिक्षण मंडळ, अलिबाग

## कार्यकारी मंडळ



अध्यक्ष
मा. श्री.संजय पाटील



उपाध्यक्ष
मा. ॲड. श्री. गौतम पाटील



कार्यवाह
मा. श्री. अजित शाह



सदस्य
मा. श्री. रघुजीराजे आंग्रे



सदस्या
मा. सौ. शारदा धुळप



सदस्य
मा. श्री. गौरव पाटील



सदस्य
मा. डॉ. साक्षी पाटील



मानद चिटणीस
मा. श्री. मिलिंद पाटील

# जे. एस. एम. कॉलेज (वरिष्ठ महाविद्यालय)
# महाविद्यालय विकास समिती


मा. श्री. संजय दत्ता पाटील
अध्यक्ष


मा. श्री. अजित पुरुषोत्तम शाह
सदस्य


मा. श्री. श्रीरंग पांडुरंग घरत
स्थानिक सदस्य


मा. श्री. शरद गोपाळ कुंटे
स्थानिक सदस्य


मा. ॲड. सिध्दार्थ संजय पाटील
स्थानिक सदस्य


मा. श्री. रघुजीराजे आंग्रे
स्थानिक सदस्य (माजी विद्यार्थी)


मा. डॉ. मोहसीन खान
सदस्य (प्राचार्य नियुक्त विभागप्रमुख)


मा. श्री. प्रकाश दातार
सदस्य (शिक्षक प्रतिनिधी)


मा. प्रा. अशोक जाधव
सदस्य (शिक्षक प्रतिनिधी)


डॉ. जयश्री पाटील
सदस्य (महिला-शिक्षक प्रतिनिधी)


मा. प्रा. वर्षा पाटील
सदस्य (महिला-शिक्षक प्रतिनिधी)


मा. डॉ. एस. ए. कानडे
सदस्य -IQAC- समन्वयक


मा. श्री. गबाजी गीते
सदस्य (शिक्षकेतर कर्मचारी)


कु. प्रांजली जाधव
(विद्यार्थी परिषद सदस्य)


कु. आनंद थळे
(विद्यार्थी परिषद सदस्य)


कु. आकाश चिमणे
(विद्यार्थी परिषद सदस्य)


कु. राजेश म्हात्रे
(विद्यार्थी परिषद सदस्य)


मा. डॉ. अनिल क. पाटील
सचिव, प्राचार्य

## जे. एस. एम. कॉलेज (कनिष्ठ महाविद्यालय) शाळा समिती


मा. श्री. संजय दत्ता पाटील
अध्यक्ष


मा. श्री. श्रीरंग पांडुरंग घरत
सदस्य


मा. श्री. अंकित अ. शाह
सदस्य


मा. श्री.सिध्दार्थ सं. पाटील
सदस्य


मा. सौ. व्ही. एस. एरंडे
शिक्षक प्रतिनिधी


मा. श्री. जी. के. गीते
शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी


मा. डॉ. अनिल क. पाटील
सचिव - प्राचार्य

# उन्मेष
## २०१९-२०

## अनुक्रमणिका


| अ.क्र | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | संपादकीय | |
| २. | विद्यार्थ्यांचे लेख व कविता | |
| | मराठी विभाग | १-२० |
| | हिंदी, इंग्रजी विभाग | २१-२९ |
| ३. | विविध विभागांचे अहवाल | ३०-७३ |
| ४. | गुणवत्ताधारक विद्यार्थी | ७४-८१ |
| ५. | विविध उपक्रमांची छायाचित्रे | ८२-९८ |



**संपादक/प्रकाशक**

प्राचार्य, डॉ. अनिल क. पाटील

**प्रकाशन स्थळ**

जनता शिक्षण मंडळाचे महाविद्यालय, अलिबाग-रायगड

**मुद्रक**

फ्लोरिस एन्टरप्राइजेस, अलिबाग-रायगड.



या अंकात व्यक्त झालेल्या मतांची व लेखनाची जबाबदारी संबंधीत लेखकांची आहे. संपादक मंडळ व संस्था त्याला जबाबदार नाही.



**अलिबाग सन-२०२०**

(फक्त खाजगी वितरणासाठी)

# संपादकीय

सन २०१९-२० हे शैक्षणिक वर्ष म्हणून महाविद्यालयाच्या दृष्टीने संस्मरणीय ठरले आहे. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी मुंबई विद्यापीठाचा अत्यंत मानाचा सर्वोत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार महाविद्यालयास प्राप्त झाला, हे आपणांस सांगताना विशेष आनंद होत आहे. अध्ययन-अध्यापन, कला, क्रीडा, संशोधन अशा विविध क्षेत्रात महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी उल्लेखनीय कामगिरी या वर्षात केली.

सन २०१९-१९ मध्ये विविध स्पर्धांमध्ये यश संपादन करून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे. अथर्व श्रीवर्धनकर (११ वी, विज्ञान) याने राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत रजतपदक प्राप्त केले. युवा महोत्सवाच्या जिल्हास्तरीय फेरीत १५ स्पर्धाप्रकारात यश संपादन करून रायगड (दक्षिण) झोनचे विजेतेपद महाविद्यलयाने पटकाविले. युवा महोत्सवाच्या विद्यापीठस्तरीय अंतिम फेरीत धीरज इंदुलकर (एस.वाय.बी.ए.) याने कोलाज स्पर्धेत रजतपदक प्राप्त केले व प्रांजली जाधव (टी.वाय.बी.ए.,मराठी) हिने कथाकथन स्पर्धेत कांस्यपदक प्राप्त केले. गणेशोत्सवानिमित्त मॉरिशसमध्ये झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांत मुंबई विद्यापीठाची संघ प्रतिनिधी म्हणून स्नेहल पाटील (टी.वाय.आय.टी.) सहभागी झाली. आंतरमहाविद्यालयीन कबड्डी झोन-४ च्या स्पर्धांमध्ये महाविद्यालयाच्या संघाने अंतिम विजेतेपद पटकाविले. युवा महोत्सवाच्या विद्यापीठस्तरीय अंतिम पेरीत रायगड झोन क्र. ८ मधून महाविद्यालयाने सर्वाधिक पारितोषिके प्राप्त केली. महाविद्यालयाचे व्यवस्थापन व पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारी प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्या अथक परिश्रमाने आमच्या महाविद्यालयाची यशस्वी घौडदौड सुरु आहे.

महाविद्यालयाचा वार्षिकांक नवोदित विद्यार्थी-लेखकांसाठी संधीचे दार खुले करत असतो. विद्यार्थ्यांना लिहावंस वाटतंय आणि विद्यार्थी लिहित आहेत, हे फार महत्वाचं आहे. परंतु यासोबतच आपण जे लिहितोय त्या लेखनाची गुणत्तादेखील आपल्याला कळली पाहिजे, ओळखता आली पाहिजे. विविध समजामाध्यमांचे व्यासपीठ लाभल्याने अलीकडे कित्येकांमध्ये लेखक, कवी होण्याची उर्मी निर्माण झाली आहे. उपलब्ध समाजमाध्यमांचा वापर तरुण पिढी आपल्या अभिव्यक्तीसाठी करत आहे. परंतु हे लेखन अत्यंत स्फुट स्वरूपाचे आहे. त्यात प्रसिध्दीची इच्छा व घाई अधिक दिसते. पोस्ट करून अधिकाधिक लाईक व कमेंटस् मिळवणे ही वृत्ती निर्माण झाली आहे व 'अभ्यासोनी प्रगटावे' ही वृत्ती कमी झाली आहे. याचा परिणाम म्हणून नवोदित लेखकांच्या लेखनातील गुणवत्ता कमी होत असल्याचे लक्षात येते. तसेच गांभीर्याने दीर्घ लेखन करण्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये अनुत्साह असल्याचे दिसते. याचे प्रत्यंतर या वार्षिकांकात समाविष्ट लेखांमधूनही आपल्याला येते, हे येथे आवर्जून नमूद करावेसे वाटते.

सन २०१९-२० चा वार्षिकांक 'उन्मेष' आपल्यापुढे सादर करताना एकीकडे मनात आनंदाची भावना आहे तर दुसरीकडे कोरोना या विषाणूजन्य साथीच्या आजारामुळे उद्‌भवलेली अभूतपूर्व परिस्थिती लक्षात घेता निर्माण झालेल्या वातावरणामुळे चिंताही वाटत आहे. या सर्व परिस्थितीवर मात करून लवकरच जनजीवन पूर्ववत होईल व अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया सुरळीत होईल अशी आशा वाटते. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर साधनांची मर्यादित उपलब्धता लक्षात घेता यावर्षीचा 'उन्मेष' वार्षिकांक डीजीटल स्वरूपात ऑनलाईन प्रकाशित करावा अशी कल्पना पुढे आली व तिला आज मूर्त स्वरूप प्राप्त होत आहे. ललित-वैचारिक लेख, माहितीपर लेख, कविता, विविध उपक्रमांची छायाचित्रे, उपक्रमांची दखल घेणाऱ्या वृत्तपत्रांतील बातम्यांची कात्रणे, ऋतुजा पाटील (एफ.वाय.बी.एस्सी) हीने कुंचल्यातून साकारलेले आशयघन मुखपृष्ठ यांनी परिपूर्ण 'उन्मेष' वार्षिकांकाचे वाचक स्वागत करतील अशी अपेक्षा आहे.

धन्यवाद...!!!

# अंगण

प्रांजल निवास सुतार
एम. ए. मराठी

अंगण म्हटले की दिसते ते घरासमोर असणारे ते भलं मोठं अंगण. माझ्या घरासमोर देखील एक भलं मोठं अंगण होतं. परंतु माझे घर रस्त्याच्या शेजारी असल्यामुळे आम्हाला लहानपणी जास्त अंगणात खेळून द्यायचे नाही. आम्ही भावंडं खूप असल्यामुळे आम्हाला ते अंगण पुरेसे व्हायचे. लहानपणी आम्ही अंगणात बॅडमिंटन, डोंगरपाणी, लपाछपी, रिंगारिंगा रोझी, पकडापकडी अशा विविध प्रकारचे खेळ खेळायचो.

मे महिन्यामध्ये आमच्या गावात रात्रीची लाईट जायची तेव्हा घरातील सर्व मंडळी खूर्ची टाकून चांदणे बघत बघत गप्पा मारायची. बहुतेकवेळा तेव्हा भुतांच्या गोष्टी निघायच्या त्यामुळे आम्ही घाबरायचो. मस्त गार वारा यायचा. आमचं दोन घर मिळून असं भलं मोठं अंगण होतं. तेच आम्हाला भरपूर वाटायचे आमच्या अंगणात सार्वजनिक देवी बसते, त्यामुळे नऊ दिवस नुसती धावपळ असते. अंगणात मातीमध्ये खेळायला जी मज्जा यायची ती आता मोबाईलवर गेम खेळण्यात येत नाही. आई-बाबांचा ओरडा खाऊन अंगणात खेळण्याची मज्जा काय वेगळीच होती.

आमच्या अंगणात एक बदामाचं झाड होतं. मला वाटायचं दुकानात आपण खातो ती बदामं याच झाडावर येतात की काय? परंतु जेव्हा मोठी झाले तेव्हा समजलं की हे तर गावठी बदामाचं झाड आहे. बदाम येतात पण दुसऱ्या प्रकारची. तेव्हा स्वतःवरच हसू आले.

याच अंगणात मे महिन्यात खुर्ची टाकून आईस्क्रिम खाणे, भेळ करणे, संगीत खुर्ची खेळणे अशा प्रकारे सर्व प्रकारचे खेळ खेळायचो. त्याच अंगणात दिवाळीत रांगाळी काढायचे, फटाके उडवायचे. रांगोळीमुळे अंगणाला तेज यायचे. आमच्या लहानमुलांमध्ये जर भांडणं झाली तर आम्ही आमच्या अंगणात यायचे नाही असे देखील बोलायचो.

त्याच अंगणात खेळता-खेळता मोठे झालो आणि तेच अंगणच आपले नाही याची जाणीव घरचे लग्नाचा विषय काढून भासवून देत असत. मुलगी ही परक्याची धन असते असे सांगत असत. ज्या अंगणात आपण खेळलो मज्जा केली, त्याच अंगणात आपल्याला हळद लावणार, त्याच अंगणात आपल्या अंगावर अक्षता पडणार, ज्या अंगणात खेळण्यासाठी रडलो त्याच अंगणात माहेरचा निरोप घेताना आपण रडणारं, तेच अंगण आपल्यासाठी परके होणार हे समजल्यावर मन भरुन आलं.

आता लग्न झाले तरी जरी दुसरे घर, अंगण भेटले तरी माहेरच्या अंगणातील आठवणी पुसून जाणार नाहीत. माहेरच्या अंगणात आलेले अनुभव सासरच्या अंगणात येणार नाहीत.

## संध्याकाळ

माझ्या गावची संध्याकाळ ही
दमलेल्या भागलेल्या जीवांची
एक क्षण कातरवेळेची
एक वेळ दिवेलागणीची

माझ्या गच्चीवरची संध्याकाळ ही
क्षितिजावरील मावळतीच्या सूर्याची
लाल ताम्बूस नभांची
परतीच्या पाखरांच्या थव्यांची

माझ्या खिडकीतील संध्याकाळ ही
अंगणातील राजू मण्या बागडताना बघण्याची
आईने मुलांना साद घालण्याची
दिवसभर तळपून मावळणाऱ्या सूर्याची

माझ्या कॉलेजची संध्याकाळ ही
रुपेरी वाळूतील शांत सागराची
प्रॅक्टीकल लेक्चर करून घरी परतणाऱ्यांची
अशी ही संध्याकळ गोजिरवाण्या पावलांची

प्रज्ञा रमाकांत नागांवकर
एस.वाय.बी.एस्सी

# ओंजळभर सुख

**स्नेहल सोरटे**
एम.ए.-२ (मराठी)

दिसेल ती वाट तुडवत, सपासप पाऊल टाकत तो निघाला होता... त्याला निघायला जरा उशीरच झाला, नेहमीपेक्षाही खूप उशीर... ती नक्की रागवली असणार या खात्रीने, पावलात तिच्या भेटीची ओढ आणि तिला समजावण्याची हजार कारणं उराशी घेऊन तो सुसाट निघाला होता. अचानक वाऱ्याची झुळूक शांत करून गेली आणि तो जागीच स्तब्ध झाला... कारण ती आता त्याच्या समोर उभी होती.

तिने त्याला पाहूनही न पहिल्यासारखं केलं आणि निःशब्द चेहऱ्याने जमिनीकडे एकटक पाहत उभी राहिली. त्याने हलकं हसून विचारलं ''एवढा राग?'' - ''रागवायला मी तुझी कोण?'' तिनं झटक्यात उत्तर दिलं. ''ओळखही नाही दाखवणार?'' त्याने विचारलं. ''अनोळखी तर तू केलस मित्रा!'' तिचा एवढा राग पाहून तो म्हणाला ''ठाऊक आहे खूप रागावलीस पण आलोय ना आता..।''

''पण जेव्हा बोलावलं तेव्हा नाही आलास ना... तुझ्याकडे सारं काही व्यक्त करण्याची सवय लागली होती, सोबत हवी होती तुझी फक्त, म्हणून रडले, पण नाही आलास... एकटेपणाचे एकाकीपणाचे सारे प्याले घोटभर पाण्यात गिळले तरी नाही आलास..., त्या लाटेसारखीच लाही लाही होत भर उन्हात वाट पाहत राहिले तुझी किनाऱ्यापाशी, दुरुन पाहत होतास फक्त पण तरीही नाही आलास... ठाऊक आहे माझ्या एकटीचाच नाहियेस तू सगळ्यांचाच आहेत..., तुला तुझं जग आहे; पण तुझ्या त्या जगात माझ्यासाठी म्हणून काहीच जागा नाही? सोबत हवी होती रे फक्त तुझी म्हणून पाट पाहत होते. तरीही नाही आलास... मग झाले कणखर, शिकतेय, प्रयत्न करतीये एकटीने साऱ्याला सामोरं जायला... आणि जर तेव्हा नाही आलास तर आता तरी कशाला आलास?''

तिचे भरले डोळे हलकेच पुसत तो म्हणाला, ''तुझ्या डोळ्यातली मोठी मोठी स्वप्न जी मीच तुला दाखवलीत ती लवकर पूर्ण व्हावी असं वाटतं मला... मुळात तुला हवा तसा दिसत नसलो, तरी तुझ्याजवळ होतोच की मी नेहमी..., ओळखलं नाहीस मला? मुसमुसून रडत होतीस तेव्हा तुझ्या गालांवरून अलगद तुला कुरवाळत ओघळणारा मी लक्षात नाही आलो तुझ्या? सारे एकाकीपण सोसून घोटभर पाण्यात विश्वास सोडलास तेव्हा तुझ्यातला मी जाणवलो नाही तुला? की भर उन्हात अनवाणी पायानं बसून राहिलीस तेव्हा तुझ्या तळव्यांना शांत करणारा माझा नाजूक स्पर्श कळलाच नाही तुला?

खरं सांगायचं तर ठरवलंच होतं की जोवर तुला कणखर झालेलं पाहत नाही तोवर यायचं नाही असं तुझ्यासमोर... तू कुणाच्यातरी आधाराने मोठी व्हावीस, तुझ्यातली चंचलता कोणी इतरांनी दूर करावी किंवा कोणाच्या तरी खांद्यावर डोकं ठेवून तू रडत बसावीस, होय अगदी माझ्याहीपाशी येऊन रडत बसावीस.... इतकी कमजोर नाहीसच तू....

तुला तुझ्या हिमतीवर मोठ झालेलं पहायचं होतं मला... काल काळ्याकुट्ट रात्रीतही तुझ्या डोळ्यात, तुझ्या स्वप्नांचा उगवता सूर्य पाहिला अन् राहवलं नाही बघ मला. मग आलो धावत, धडपडत आणि हा असा तुझ्यासमोर उभा आहे... आणि हो साऱ्या जगाचा जरी असलो ना तरी आज फक्त तुझ्यासाठी आलो आहे. फक्त आणि फक्त तुझ्याचसाठी आलो आहे. फक्त आणि फक्त तुझ्यासाठी आलो आहे. फक्त आणि फक्त तुझ्याचसाठी....''

तिच्या रुसलेल्या चेहऱ्यावर गोड हसू खुललं होतं, मग नेहमीसारखी दोन्ही हातांची ओंजळ तिने पुढे धरली... दोघेही सुखावले होते आता...

कारण तिला मिळाला होता तिच्यासाठी ओसंडून पाहणारा तिचा ''मुसळधार पाऊस'' आणि साऱ्या जगाची तहान तृप्त करणाऱ्या त्याला तिच्या त्या रित्या ओंजळीतलं ''ओंजळभर सुख...''

# मला आवडलेले पुस्तक - ''अग्निपंख''

**प्राजक्ता महेश म्हात्रे**
एस.वाय.बी.एस्सी

काही व्यक्ती आणि गोष्टी इतक्या आवडतात की त्यांच्यासोबत आयुष्यभराचे बंध जोडले जातात. असेच बंध माझे आणि माझ्या मित्राचे अर्थातच ''अग्निपंख'' या पुस्तकाचे आहेत. ३ वर्षांपूर्वी हे पुस्तक पहिल्यांदा वाचलं आणि तेव्हापासून त्याची कितीतरी पारायणे केली. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम म्हणजे माझ्यासाठी आदर्श व्यक्ती असल्याने त्यांचे आत्मचरित्र वाचण्यासाठी उत्सुक असणं सहाजिकचं होतं. याच पुस्तकाच्या माध्यमातून प्रत्यक्ष न भेटलेल्या कलामजींसोबत दोस्ती जमली. हे आत्मचरित्र शब्दबध्द करण्यासाठी अरुण तिवारींनी कटोर मेहनत घेतली आहे.

कलामजींच्या मते, ''प्रत्येक जीवाची निर्मिती करण्यामागे देवाचा विशेष हेतू असतो. दैवी शक्तीचा अणूबिंदूचा अंश घेऊन प्रत्येकजण येतो. त्या अग्नीला पंख लाभावेत यासाठी आपण प्रयत्न करत रहावे.'' याच विचारातून आणि 'अग्नी' या क्षेपणास्त्रातील त्यांची गुंतवणूक यामुळे पुस्तकाला 'अग्निपंख' नाव मिळाले. पुस्तकाचे आवरण साधेच पण लक्षवेधी. काळ्या रंगाच्या पृष्ठभागावर कलामजींचा फोटो आणि शेजारीच अवकाशात झेपावणारे क्षेपणास्त्र! त्यांच्या डोळ्यातून व्यक्त होणारी विलक्षण बुध्दीमता, साधेपणा आणि सच्चाई पाहून आपले सुध्दा डोळे चमकून जातात. या पुस्तकात एकूण १६ भाग आहेत. सुरुवात ''जडणघडण'' पासून होते व शेवट सामान्य माणसासाठीच्या आपुलकीच्या शब्दांनी होते.

या पुस्तकाची वैशिष्ट्ये म्हणजे कलामजींच्या जीवनासोबत उलगडत जाणारा भारताचा अंतरिक्ष संशोधन व कार्याचा प्रवास आणि प्रत्येक पानावर लिहिलेली मनावर ठसा उमटवणारी वाक्ये. ही वाक्ये म्हणजे कधी अब्दुल कलामांचे विचार तर कधी त्यांचे इतरांसोबतचे संवाद किंवा त्यांच्या प्रचंड वाचनाच्या खजिन्यातील त्यांनी साठवलेले शब्दरूप मोती! कोणतेही पान उलगडले तरी लक्षणीय शब्द अथवा वाक्ये दृष्टीस पडणारच.....

सुरुवातीला कलामजींचे रामेश्वरम मधील बालपण. तेथील वातावरण आणि त्यातून त्यांच्यावर झालेले संस्कार यांचे वर्णन केले आहे. सहज व सोपी भाषा वापरुन लहानपणीचे प्रसंग व घटनांना शब्दांकित केले आहे. जात आणि धर्माच्या पलिकडे जाऊन माणूस म्हणून कलामजी सर्वांना का प्रिय होते, याचा उलडा त्यांच्या बालपणीच्या संस्कारात आहे हे यावरुन लक्षात येते.

बालपणीच्या जडणघडणीनंतर रामनाथ पुरम पासून सुरु झालेल्या त्यांच्या महत्वाच्या शैक्षणिक प्रवासाचे वर्णन प्रभावीपणे मांडले आहे. रामनाथपूरम येथे सुरुवातीच्या काळातील त्यांची घराची ओढ आणि तिथे रमण्याचा निश्चय केल्यानंतरचा त्यांचा प्रवास वर्णित करण्यात आला आहे. B.Sc. पूर्ण केल्यानंतरच Madras Institute of Techonology मध्ये प्रवेश घेताना त्यांच्या मनाची द्विधावस्था झाली आहे. त्यावेळी त्यांना वडिलांचे शब्द आठवले. ''जो दुसऱ्यांना समजू शकतो तो सुशिक्षित असतो. पण स्वतःला समजून घेण्यात खरे शहाणपण आहे.'' त्यांच्या आयुष्यात त्यांना चांगले गुरु, मार्गदर्शक मिळाले आणि त्यासर्वांचा आवर्जुन उल्लेख करण्यात आला आहे.

कलामजींना वैमानिक बनण्याची खूप इच्छा होती. MIT मधून शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना दिल्ली येथील D.T.D & P. आणि डेहराडून येथील Hindustan Aeronautics Ltd. (HAL) मधील निवडणूक त्यांना वैमानिक बनवण्याच्या स्वप्नांच्या जवळ घेऊन जाणार होती. पण तिथे निवड झाली नाही आणि त्या निराशा अवस्थेत त्यांना स्वामी शिवानंद भेटले. त्यांची मनोव्यथा ओळखून स्वामी म्हणाले, ''तू कोण होणार आहेस हे नियतीने अजून उघड केलेले नाही, पण ते ठरवलेले आहे. नियतीचा स्वीकार कर व तिला सामोरे जा.'' ही घटना अत्यंत सुंदररित्या वर्णिली आहे. पुढे त्यांची D.T.D & P. मध्ये निवड झाली, ''नंदी'' या Howercraft ची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली. त्यावेळचे संरक्षण मंत्री कृष्म मेनन यांनी त्यातून सैर केली. पण नंतर हा प्रकल्प गुंडाळला गेला. त्यावेळी त्यांना झालेली मर्यादेच्या जाणिवेची प्रखरता पुढील शब्दांत व्यक्त झाली, ''आकाशाला मर्यादा नसते आणि कर्तृत्वाला आकाश हीच मर्यादा असते. पण तसे नसते. काही मर्यादा तुमच्या आयुष्याला आपोआप बंदिस्त करतात. मर्यादा तुमच्या आयुष्यात आपोआप येतात. मर्यादा असणे हे वास्तव आहे आणि ते स्वीकारावेच लागते.'' नंदीचा प्रकल्प गुंडाळला गेल्यानंतर Tata Institute of Fundamental Research चे MGK मेनन व विक्रम साराभाई यांनी त्यांची निवड थुंबा येथे Rocket Engineer म्हणून केली. तेव्हापासून विक्रम साराभाईंचा त्यांच्या जीवनावर असणारा प्रभावाचा प्रत्यय पुस्तक वाचताना वारंवार येतो.

Rocket Engineer या पदावर निवड व त्यानंतर त्यांचे अमेरिकेतील नासा येथे प्रशिक्षण, RATO प्रकल्पाचे त्यांनी केलेले नेतृत्व, त्यांची चिकाटी, संघटनकौशल्य या सगळ्याची फलश्रुती म्हणजे SLV-3 च्या प्रकल्प प्रमुखाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आणि फक्त ५० लोकांना घेऊन हा प्रकल्प सुरु झाला, हे खूप मोठे आव्हान होते. तरीही १९७९ साली SLV-3 चे पहिले उड्डाण अयशस्वी झाले. त्या अपयशाची जबाबदारी स्वीकारुन

त्यांनी जिद्दीने १९८० साली SLV-3 चे यशस्वी उड्डाण केले. त्यानंतर नेहरुंनी त्यांना भेटायला बोलावल्यावर साजेसे कपडे त्यांच्याकडे नव्हते. त्यावेळी डॉ. धवन यांनी ''तुझ्या उज्वल यशाचे सुरेख कपडे तुझ्या अंगावर आहेत,'' असे उद्गार काढले. हे वाचताना साधेपणातच सौंदर्य असते, हे आपल्यालाही नकळतपणे वाटते. SLV-3 च्या यशस्वी उड्डाणानंतर कलामजींवर अग्नि, नाग, त्रिशुळ, पृथ्वी व अवकाश या क्षेपणास्त्र प्रकल्पांची जबाबदारी सोपवण्यात आली. हे प्रकल्पसुध्दा त्यांनी सफल केले आणि भारताच्या इतिहासात एका नवीन पर्वाची सुरुवात झाली...

किती वर्णन करू माझ्या अग्निपंख नावाच्या मित्राचे! जेव्हा कधी नकारात्मक विचार मनात येतात, निराशा दाटू लागते तेव्हा इतरांप्रमाणेच हा मित्र माझ्या सोबतीला असतो. माझ्या विचारांच्या जडणघडणीत अग्निपंखचा मोलाचा वाटा आहे. कलामजींना प्रत्यक्षात भेटू शकले नाही. पण पुस्तकाच्या रुपाने ते नेहमी सोबत असल्यासारखे वाटतात. पुस्तकाकडे पाहिले की कलामजी आठवतात, त्यांचे विचार मनात उमटतात आणि पुस्तकात लिहील्याप्रमाणे मलाही वाटायला लागतं, ''देव सर्वत्र आहे. त्याला सर्व समजते. काम करण्यासाठी लागणारी अंतर्मनाची प्रेरणा देण्यात तो आपल्याला मदत करतो. कधी एखाद्या व्यक्तीच्या रूपात तर कधी शब्द, गाणे, विचार, किंवा पुस्तकाच्या रुपात!!''

# पाणी



आता मात करू पाण्यासाठी
घ्या वसा जपण्याचा....
मी थेंब एक पाण्याचा
चर खणूया पात्रासी अन्
पाणी जिरवूया
पाणी जीवनाचे अमृत
नको मानवा करू नासाडी
जलसंकट येता
भटकंती हाई या पाण्यासाठी
पशु पक्षी व्याकुळ होती
याच पाण्यासाठी
पैसे जतन करणे हीच काळाची गरज
नदी पात्रात टाकूनी कचरा
प्रदुषित करीशी तू त्या पाण्यास
थेंबे थेंबे तळे साचे या म्हणीचा
अर्थ आपुल्या जीवनास आचरशी
पाण्याचा टाळून अपव्यय
चल संवर्धन करीशी या पाण्याचा
आनंदाचा, अन दुःखाचा अश्रुबिंदू
तळ विहीरीचा गाठला पाण्याने
पाणी पातळी
खोलवर गेली आवर्षणे
पाणी जिरवा, पाणी वाचवा
गर्जना चालली प्रयासाने
रानोरानी पाणी जिरवूया
वारेमाप पीक पिकवूया
पाण्याची आणीबाणी नष्ट करूया
हातचे जल शिवाराचे
स्वप्न साकार करुया
सुजलाम् सुफलाम् धरणी करुनी
भारतभूचे ऋण फेडूया
नाद ईश्वराच्या हसण्याचा...
थेंब एक पाण्याचा
विनवून तुम्हा सांगतो पुन्हा,
सांभाळा या थेंबाला
सौख्य समाधानाचे जीवन जगूया!

वैष्णवी नित्यानंद पवार
एफ.वाय.बी.ए.

# रात्र

**वैष्णवी नित्यानंद पवार**
एफ.वाय.बी.ए.



गावातली ती भयाण शांतता, अंधारलेली रात्र, गाव असतो घाबरून, रोज अनेक झाले गायब.

कोणास ना हे कळले, कधी, कुठे आणि कसे ?

अनामिक भिती उमटत मनात, एक शिरशिरी जायची भीतीचा मायाजाल पूर्ण गावाला वेढा घातला होता. लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सगळ्यांनाच एक अनामिक भीती वाटत होती.

गाव तसं हे चांगल पण हे विपरित असे का घडते ? असे कितीतरी प्रश्न होते, ज्याची उत्तरे सापडत नव्हती. अनेक प्रश्नांचा बांध मनात राहतो कोंडून, कोणालाच काही कळत नव्हते.

ती होती अमावस्येची रात्र, भयानक शांतता, कुत्र्याचं ते विव्हळणं , त्या आवाजाने काळीज जातो फुटून मनाचा थरकाप उडून जातो. आज कोणाचा नंबर आहे अशी भीती मनात येऊन जाते. पिंपळपाण्याच्या झावळ्यात गुरफटलेली. ती विहीर, त्याची सावली, खूप भयाण वाटत होती. मध्येच पक्षांचा येणारा आवाज, कुत्र्याचं भुंकणं सगळं काही मनाचा थरकाप उडवणारं होते.

अशा वेळी संपूर्ण गाव निपचित पडून राहायचा. लहान मुलं घाबरुन जायची, दर अमावस्येला ती यायची तिची वेळ ठरलेली असायची. ती यायची अशाच एका रात्री. ती रडायची, का रडायची ती, हे कोणालाच माहित नव्हते. तिला कोणी पाहिले नव्हते. ती तिच्या वेळेला यायची, रडायची आणि मग एक भयाण किंकाळी कानावर पडायची. ती किंकाळी कोणाची, हे कोणालाच माहित नव्हते.

भीतीने कोणीच बाहेर पडायचे नाही. कोणी उठायचे पण नाही, जीव मुठीत घेऊन ते तसेच पडून राहायचे तुसऱ्या दिवशी त्यांना समजायचं आपल्यातलं एक कमी आहे. संपूर्ण गाव जमायचं, डोक्याला हात लावून  बसायचं, कोणाला काही सुचायचं नाही. यातून आपली सुटका कशी होईल, हे काही त्यांना कळायचं नाही मग ती रडण्याचा आवाज अन् ती भयाण शांतता. नेहमीच असं घडायचं, प्रत्येक महिन्याच्या, प्रत्येक अमावस्येला हे असं घडायचं.

पुढल्या अमावस्येच्यावेळी मी शोध घ्यायचा ठरवलं. लपून बसलो मी आणि ती येण्याची वाट पाहू लागलो. आली ती तिच्या वेळेला, डोक्यावर पदर, एका नवी नवरीसारखी ती सगळा शृंगार करून आलेली होती. तिच्या पायातल्या घुंगरुचा आवाज, शांतता चिरत होती. ती आता एका घरासमोर थांबली होती.

आणि मग तिने रडायला सुरुवात केली. जोडीला तो कुत्र्यांचा आवाज, माझं अंग थंड पडलं, मी थरथर कापू लागलो. ती पुढे काय करते ते पाहू लागलो, आणि मी बघतच राहिलो. तो दरवाजा आपोआप उघडला गेला.

ती आत गेली आणि एका व्यक्तीला घेऊन बाहेर आली. ज्याला तिने आणलं होतं, तो माझा मित्र होता. ती माझ्या दिशेने वळली आणि तोच, तिने तिच्या डोक्यावरचा पदर बाजूला केला. आता तिचा चेहरा मी बघू शकत होतो. ती कोण आहे हे मला समजणार होतं. ती आता मध्यभागी आली आणि तिचा चेहला मला दिसला. तिचा तो चेहरा बघून, माझ्या तोंडातून किंकाळी बाहेर पडली. आणि मी तिथेच बेशुध्द पडलो. दुसऱ्या दिवशी उठलो तेव्हा मी घरी होतो.

मी घरी कसा ? कोणी आणलं मला इथे ? मी स्वप्न तर पाहिलं नाही ना ? पण नाही मला बाहेरून आरडाओरडा आणि रडण्याचा आवाज येत होता. म्हणजे रात्री जे घडलं ते सत्य होतं. अजूनही तो चेहरा आठवला की, संपूर्ण अंगाला घाम फुटतो. माझी वाचाच बंद होऊन जाते. त्यारात्रीची अनामिक भीती माझ्या मनात घर करून जाते !

# प्रसार माध्यमे व मराठी भाषा

**शांथाली दिपक नलावडे**
टी.वाय.बी.ए.

महाराष्ट्रात मराठी भाषेचे वैभव आहे. त्यात आपली मराठी भाषा समृध्द आहे याचा अभिमान वाटतो.

आपल्या संतांनी सुध्दा मराठी भाषेविषयी थोरवी सांगितली आहे. जसे की संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, श्रीचक्रधर यांनी मराठी भाषेचे कौतुक केले आहे.

त्यात चक्रधरांनी मराठी भाषेविषयी आग्रह धरला. त्यांचे शिष्य नागदेवाचार्यांनी प्रसंग सांगितला की एकदा केशिराजांनी त्यांना संस्कृत भाषेत प्रश्न केला असता त्याचे उत्तर न देता ते त्यांना म्हणाले की, ''तुमचा अस्मात कस्मात मी नेणे गाः मज श्रीचक्रधरे निरुपिली मऱ्हाटीः तियांचि पुसाः ही ओळ मराठी भाषेविषयी आग्रहाविषयी! इतकं सुंदर बोलतात हे चक्रधर. त्यातून त्यांचे तर मराठी भाषेवरचे प्रेम दिसून येते.




ही समृध्दी आणि भाषिक प्रेम आज एकविसाव्या शतकात राहिली आहे का? हा प्रश्न पडतो. अशा वेळी मराठी भाषेच्या होत चाललेला ऱ्हास दिसतो आणि या ऱ्हासामध्ये प्रसारमाध्यमामुळे मराठी भाषेत भर पडली आहे.

प्रसारमाध्यमामुळे जग जवळ आले पण माणसे दुरावली. माणसे पूर्वी एकमेकांशी बोलत होती. ती माणसं आता एकमेकांचे बोलणं, चालणे, गप्पा मारणे हे सगळं विसरून गेली. हे कशामुळे? तर हे प्रसारमाध्यम आल्यामुळे. त्यातूनच मराठी भाषेचे खच्चीकरण होत चाललेले दिसते. संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषा समृध्द करण्याचे काम केले, पण प्रसारमाध्यमे आली व त्या मराठी भाषेवर आक्रमणे सुरु झाली. या आक्रमणात मराठी भाषेतून अनेक शब्द लोप पावले. यात नवीन शब्द स्वीकारले गेले. त्यामुळे मराठी भाषेचे खच्चीकरण झाले. इंग्रजी भाषेचा प्रभाव वाढलेल्या आणि एकीकडे प्रसारमाध्यमे, त्यामुळे मराठी भाषेची गळचेपी झालेली दिसते.

प्रसारमाध्यमे मराठी भाषेच्या वापराबाबत फार काटेकोर नाही. त्यामुळे मराठी भाषेवर परिणाम होतो अशी ओरड ऐकायला मिळते.

मराठी भाषा ही आपली मातृभाषा आहे. त्यातून आपण बोलत नाही उलट इंग्रजी भाषेचा वापर आपण जास्त करतो. हे कशामुळे? प्रसारमाध्यमामुळे आपण इंग्रजी शब्द वापरतो. उदा.ः एखाद्यांनी आपल्याला फोटो पाठवला तर आपण प्रतिक्रिया इंग्रजी शब्दातच देतो. तर का समोरचा माणूस प्रभावित होतो, असा समज आपल्याला असतो. आपण मराठीतले केवलप्रयोगी शब्द का नाही वापरत? जसे की अरे वा! छान! अभिनंदन हे शब्द वापरणारे हातावर मोजण्याइतकी माणस आपल्याला भेटतात. ही मराठी भाषेविषयी दुर्दैवी गोष्ट आहे.

वृत्तपत्रांमधून भाषाविषयक पत्रे अनेकदा प्रकाशित होतात. त्या पत्रातून वाचकांची भाषाविषयक जाणीव, कळकळ आणि आस्था व्यक्त होत असते.

प्रसारमाध्यमे आल्यामुळे नभोवाणी, दूरचित्रवाणीसारख्या प्रसारमाध्यमासाठी देखील बरेचसे लेखन घाईगडबडीत केले जाते. आणि त्यामुळे त्यात दोष राहून जातात. पण अक्षरांमध्ये चूक निघतात त्याचे काय करणार? असा प्रश्न पडतो.

संगणाकावर केलेली छपाई, लेखनामध्ये बऱ्याच चुका आढळून येतात. पण सगळा दोष आपण छपाई लेखन व संगणकाला देतो पण या ठिकाणी पत्रकार, वार्ताहार, निवेदक याचा सुध्दा बेफीकीर वृत्ती आणि भाषेविषयी अनास्था आणि उणीव ही सुध्दा तेवढीच कारणीभूत आहे.

मोबाईल (भ्रमणध्वनी) आल्यामुळे सगळेच शब्द नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. उदा ः आपण मोबाईल विकत घेतो. पण त्याबरोबर आपण नवीन शब्दपण विकत घेतल्यासारखे होते. मोबाईलमुळे मराठी भाषेकडे आणि त्यातल्या शब्दाकडे दुर्लक्ष होत चालेले आहे. कदाचित ही गंमत पहा म्हणजे लक्षात येईल की इमेज, डिलीट, मेनू, मेसेज, साऊंड, चिप्स हे शब्द आपण मराठी म्हणून वापरायला लागलो आहोत. मोबाईल व संगणकाच्या अधिक वापरामुळे नवीन शब्दात भर पडत चाललेली दिसते. आकाशवाणी (रेडिओ) मुळे सुध्दा इंग्रजी आणि हिंदी हे सुध्दा आपल्याला मराठी शब्द म्हणून वाटतात. आणि दूरदर्शनवरील इंग्रजी व हिंदी तर मिश्रण झालेले दिसून येते.

आपण मराठी भाषेचा आग्रह धरणारे ? आपण तेच करतो त्यामुळे मराठी भाषेचे संवर्धन करायला हवे. मराठी भाषा जपली पाहिजे. आपण प्रसारमाध्यमांचा वापर जरूर करावा. पण त्याबरोबरच मराठी भाषेचा वापर जर आपण नमस्कार, शुभसकाळ या शब्दांनी केला तर किती चांगलं होईल. मोबाईवर हॅलो म्हणण्यापेक्षा नमस्कार म्हटलं तर किती छान होईल ना!

संतांनी जसा मराठी भाषेविषयीचा आग्रह धरला होता तसा आपण आग्रह धरला तर आपली मराठी भाषा समृध्द होईल. आणि मराठी भाषेचे वैभव वाढेल.

प्रत्येकाने मराठी भाषा बोलून तिचे संवर्धन केले पाहिजे. तरच मराठी भाषेचा विकास होईल.

## संध्याकाळ

अशी ही एक संध्याकळ होती
खेळापासून अभ्यासापर्यंत
सर्व सामावून घेत होती

अशी ही एक संध्याकाळ होती
मैत्रीच्या भांडणापासून मैत्रीच्या प्रेमापर्यंत
सारं सांगून जात होती

अशी ही एक संध्याकाळ होती
आईने दिलेल्या मारापासून
प्रेमाने भरवलेल्या घासापर्यंत
सर्व समजावून सांगत होती

अशी ही एक संध्याकाळ होती
बाबांची वाट बघणारे डोळे
बाबांच्या येण्याने
खाऊच्या पुडीकडे वळवत होती

अशी ही एक संध्याकळ होती
शाळेतून येणाऱ्या दादाची वाट बघत
मला ही तेथेच निजून नेत होती

अशी ही एक संध्याकाळ होती
ताईच्या अभ्यासाच्या वेळी
भांडण्याची ही
एक गंमतच निराळी होती

अशी ही एक संध्याकाळ होती
गोष्टी ऐकवत झोपवणे
ही सुध्दा आजीची
एक वेगळीच कला होती

अशीही एक संध्याकाळ होती
चांदोमामाची वाट बघत
चांदण्या मोजण्याची
आजोबांची गंमतच न्यारी होती

अशी ही एक संध्याकाळ होती
पशुपक्ष्यांना सुध्दा
आपल्या घरी असणाऱ्या
पिल्लांची आठवण देऊन जात होती

अशी ही एक संध्याकाळ होती
आपोआप हात जोडून
शुभंकरोतीसुध्दा
नकळत तोंडून वदवून घेत होती

अशी ही एक संध्याकाळ होती
काऊचिऊचे घास खात
चंद्रालासुध्दा
मामाचं स्थान देत होती

अशी ही एक संध्याकाळ होती
घराचे घरकुल करत
साऱ्यांना एकत्र बांधून ठेवत होती

समिक्षा शरद भोस्तेकर
एफ.वाय.बी.ए.

# 'पाऊस एक सुखद अनुभव'

**शांथाली दिपक नलावडे**
टी.वाय.बी.ए.

पाऊस म्हटलं की मला डोळ्यासमोर येतो रिमझिम बरसणारा पाऊस! मी पावसाची विविध रुपे पाहिली आहेत. कधी धो-धो पडणारा, रिमझिम बरसणारा, संततधार पडणारा तर धुवाधार कोसळमारा पाऊस अशी दरवर्षी पावसाची रुपे पाहायला मिळतात. आणि ती अनुभवली सुध्दा....

पाऊस सुखद धक्काही देतो. तर, कधी चिडीला आणतो. इतका पडतो की हैराण करतो. कधी कधी नकोसा वाटतो पाऊस तर कधी हवा हवासा वाटणारा पाऊस तो जून महिन्यात. कारण माणसं गरमीने हैराण झालेली असतात आणि शेतकऱ्याला इकडे शेतीची कामे करायची असतात.

पावसाळा सुरु झाला की मला शाळेचे दिवस आठवतात ती शाळा आणि नवीन वर्ग, नवीन दप्तर, नवीन वह्या! पुस्तके! त्या नवीन पुस्तकाच्या आणि वह्यांचा वास मी घेत बसायचे. हा सुखद अनुभव होता. लहानपणी आम्ही कागदाच्या होड्या सोडायचो. माझी आणि मैत्रिणीची स्पर्धा लागायची. हा एक माझ्यासाठी सुखद अनुभव होता. पावसाळा आला की रेनकोट आणायचे. संध्याकाळी पाऊस पडत असेल तर मस्त आलं घालून केलेला चहा आणि खमंग भजी हा कार्यक्रम असायचा.



पावसाळा आला की मला एक गाणं आठवायचे.

सांग सांग भोलानाथ पाऊस पडेल काय?

शाळेभोवती तळे साचून सुट्टी मिळेल काय?

आणि खरंच मला सुट्टी मिळायची मग मला आनंद वाटायचा.

एकदा धुकं आणि निसर्गरम्य वातावरणात पावसाचा अनुभव घेतला. ते गाव म्हणजे भीमाशंकर, त्या गावात निसर्ग सौंदर्य बघण्यासारखे असते. तिथे धुकं होतं त्या धुक्यात रिमझिम पाऊस सुरु होता, तिथे धबधबा, डोंगरावर पसरलेलं धुकं ते दृश्य डोळ्याचे पारणे फेडणारे होते. तिथून भीमा नदीचा उगम झाला. आणि तिथलं भीमा नदी, धरणाचे दृश्य आणि दाट जंगल त्यात मंदिर, त्या मंदिराच्या कळसावर धुकं पसरलेलं होतं. त्यात पाऊस पडत होता. तो एक सुखद अनुभव घेतला आहे.

एकदा तर गारांचा पाऊस पडत होता मे मध्ये! महाबळेश्वरला गारा पडत होत्या आणि मी हातात घेत त्या गारांच्या पावसाचा अनुभव घेत होते.

पावसाचे हे सुखद अनुभव दरवर्षी आपण घेत असतो.

पावसाचे थेंब पडले की मातीचा सुगंध यायचा. घराच्या बाजूला शेती असल्यामुळे शेतात पाणी साठले की बेडकांचा आवाज, शेतात लावणी करणयासाठी बायका यायच्या त्यांचा आवाज ते दृश्य खिडकीतीन बघायला खूप मजा येते. ऑगस्ट महिन्यात बघायचे ना शेताकडे, शेत अगदी हिरवेगार दिसायचे. तो एक सुखद अनुभव असायचा.

श्रावणातला पाऊस म्हणजे क्षणात ऊन पडतं आणि उन्हात पडणारा पाऊस! हा अनुभव प्रत्येकजण घेतो. आणि त्यात इंद्रधनुष्यामध्ये सात रंग उमटलेले दिसतात. श्रावण महिन्यातला पाऊस हा सण घेऊन येतो नदी, नाले, ओढे तुडूंब भरुन वाहत असतात. त्यावेळी निसर्ग हिरवागार झालेला असतो.

आमच्या गावाकडे श्रावण महिन्यात सण उत्साहात साजरे केले जातात. नारळी पौर्णिमा उत्साहात साजरी केली जाते. समुद्रात नारळ अर्पण केला जातो आणि मग पाऊस कमी होतो. या श्रावणातला पाऊस मात्र मानवी भावनांचा कोमलपणा, हळुवारपणा, नाजुकपणा तितक्याच हळव्या मनाने जपतो असे वाटते. हिरव्या रंगाच्या विविध छटा वातावरणात लहरत असतात हा अनुभव प्रत्येकजण घेत असतो. मी तर दरवर्षी श्रावणातला पाऊस अनुभवते. या श्रावण महिन्यात लहान मुलांना सुट्ट्या मिळातात. सगळीकडे चैतन्य निर्माण झालेले असते. जिकडे जाते तिकडे हिरवीगार मखमली पांघरलेली आहे असे माझ्या मनाला वाटत राहते. असा हा विविध रुपाचा पाऊस एक सुखद अनुभव देऊन जातो.

# प्रसार माध्यमे व मराठी भाषा

**प्रज्ञा रमाकांत नागांवकर**
एस.वाय.बी.एस्सी.

सर्व प्राण्यामध्ये माणूस हा बुध्दी व वाणी लाभलेला एकमेव प्राणी आहे, त्या वाणीचा व बुध्दीचा योग्य वापर करून मानवाने विविध भाषा निर्माण केल्या. यातूनच मराठी भाषेचा उगम झाला. मराठी ही आपली बोलीभाषा आहे मराठी माणूस म्हटले की, मराठी भाषा आलीच पाहिजे. भाषा ही आपल्या सुख-दुःखाचे देवाण-घेवाणीचे प्रसार माध्यम आहे. हे झाले दोन व्यक्तींपुरते. आजच्या या आधुनिक युगात ज्ञान, माहिती, प्रचार आणि संपर्क साधण्यासाठी आपण काही प्रसार माध्यमे वापरतो. जसे वर्तमानपत्र, दुरदर्शन, आकाशवाणी, भ्रमणध्वनी व वृत्तपत्र पण आज या प्रसार माध्यमांतून वापरल्या जाणाऱ्या विविध भाषा या भाषांचे एकत्रिकरण करून मूळ भाषाच दूर होत चालली आहे.

मराठी भाषेचा वैभवसंपन्न इतिहास आणि तीची समृध्दी पाहिली की फादर स्टीफन्स यांनी मराठी भाषेबद्दल काढलेले उदगार आठवतात....

**'जैसे पुष्पामांजी पुष्प मोगरी, परिमळ माजी कस्तुरी,**
**तैसा भाषांमाजी साजिरी, मराठिया'**

पण ही समृध्दी आणि भाषिक अस्मिता एकविसाव्या शतकात राहिली आहे का? असा प्रश्न पडतो. अशावेळी मराठी भाषेची होत राहिलेली गळचेपी आपल्याला दिसते आणि या गळचेपीत प्रसार-माध्यमांनी मोठी भर घातली आहे, हे लक्षात येते. प्रसारमाध्यमांमुळे जग जवळ आले, पण माणसे दुरावली आणि यातूनच मराठी भाषेच्या खच्चीकरणास सुरुवात झाली. ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेस समृध्द करण्याचे काम केले. प्रत्येक कालखंडात मराठी भाषेतून अनेक शब्द लोप पावले व नवीन शब्द स्वीकारले गेले. आजपर्यंत प्रक्रिया चालू आहे. जगातील ६७६० भाषांपैकी २६४ भाषा मृतप्राय झालेल्या आहेत. ही झाली जगाची स्थिती. यात मराठी, मराठी भाषा आलीच. भाषा नष्ट करण्याचा किंवा भाषाप्रदूषण करण्याचा मान ओघानेच प्रसारमाध्यमांकडे जातो.

मातृभाषेचे संवर्धन आणि संरक्षण करण्यासाठी अनेक भाषिक समूह पुढे येत आहेत. महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाला मराठी भाषेचे उत्तम ज्ञान असावे, त्याने आपले भाषिक व्यवहार मराठीतूनच करावे, मातृभाषेच्या अभिमानाबरोबरच त्याने मराठी संस्कृतीचेही संवर्धन करावे, अशा किमान अपेक्षा तरी पूर्ण होतील का? हा खरा प्रश्न. यात काही गैर नाही. पण एकविसाव्या शतकातील माणसाकडून ही अपेक्षा पूर्ण होईल का? हा प्रश्नच पडतो. आपल्या शिक्षण प्रक्रियेत मातृभाषा सक्तीची करून हा प्रश्न मिटेल का यात शंकाच आहे!

एक गोष्ट खरी की, ही अशी सारी प्रसारमाध्यमे हीच मराठी व इतर भाषेच्या कौशल्यावर उभी आहेत. भाषा हेच या माध्यमांचे बलस्थान आहे. मराठी प्रसार माध्यमे आणि त्यावर होणारा मराठी भाषेचा वापर या अनुषंगाने आपण विचार करायला लागलो की, मराठी प्रसारमाध्यमे मराठी भाषेचा विकास करणार की भाषेची मोडतोड करून तिचे देशीय अस्तित्व धोक्यात आणणार? हा प्रश्न आपल्याला पडल्याशिवाय राहत नाही. आकाशवाणी, दूरदर्शन वृत्तपत्रे, इंटरनेट ही आधुनिक प्रसारमाध्यमे आहेत. या प्रत्येक माध्यमाचे स्वरुप वेगवेगळे आहे. अर्थात प्रत्येक माध्यमाची स्वतःची गरज व त्याचे वेगळेपण म्हणून भाषेच्या अविष्कारात बदल केले गेले. म्हणून आकाशवाणीवरील निवेदनाची, दूरदर्शनवरील बातमीदाराची आणि वृत्तपत्रातील वार्तांकनाची स्वतःची शैली असते. बाजार, लोककला, नाटक, बैठका, चर्चा इ. ही पारंपरिक प्रसार माध्यमे आहेत. तेथे बोलीभाषेचा अधिक वापर होतो. यात शुध्द अशुध्दतेचा फारसा विचार केला जात नाही. याशिवाय व्यक्ती व्यक्तीमधील अंतर्गत संवादासाठी पोस्ट, फोन, मोबाईल फोन इ. चा मोठ्या प्रमाणावर वापर होऊ लागला होता. आज रस्त्यावर चालणाऱ्या, बस स्थानकावर बसलेल्या प्रत्येक माणसाच्या हातात मोबाईल दिसतो. एव्हाना मोबाईल ही गरज बनली आहे.

आपण दुकानात जाऊन केवळ मोबाईल खरेदी करतो म्हणजे केवळ तीच वस्तू खरेदी करतो असे नाही तर त्या वस्तूबरोबर त्याची भाषा आणि शब्दही विकत घेत असतो. आता गंमत म्हणून पहा. sms, message, delete, contacts, image, menu, mailbox, sent, recharge, sound clips इ. सारखे जवजवळ आठशे शब्द आपण नव्याने वापरतो. मग कॉम्प्युटर आणि इंटरनेटच्या वापरामुळे तर यापेक्षा कितीतरी शब्द आपण नव्याने वापरतो. याचा बारकाईने विचार केला तर आजच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मराठी भाषाच नव्हे तर कोणतीही मातृभाषा आपले शुध्द अस्तित्व टिकवेल असे वाटत नाही. रेडिओ तसेच दूरदर्शनच्या माध्यमातून आपण अनेक इंग्रजी शब्द ऐकतो आणि ते शब्द एवढे ऐकलेत की ते शब्द आपल्याला मराठीच वाटू लागले आहेत.

दूरदर्शनवरील इंग्रजी व हिंदीचे मिश्रण तर आपल्याला नित्याचेच झाले आहेत आणि जर हे असेच चालू राहिले तर प्रसारमाध्यमातूनच मराठी भाषा लोप पावेल की काय?

# पाऊस ( ललित लेख )

**दिव्या गणेश पवार**
एम.ए.मराठी-२

किती छान शब्द आहे ना हां! तेवढाच भीतीदायक नाही का वाटत हल्ली...., मलाच काय पण जगातल्या प्रत्येक सजीव सृष्टीला पाऊस आवडतोच, हो ना! खूप क्वचित काही मोजके असतील ज्यांना पाऊस आवडत नसावा. कारण हल्ली तो खूप रुसल्यासारखा वागतो, ''का रे वागतोस असा, का बरे रुसलास इतका, की तुला जराही दया येत नाही, रोज फासावर जाणाऱ्या शेतकऱ्यांना बघून हळहळतो रे जीव, तुला कधी येणार आहे कीव, या शेतकरी बांधवांची, या वसुंधरेची, अरे सावळ्या आभाळा, तुला कसे कळत नाही या दुष्काळग्रस्त राधेचे प्रेम, तुझे प्रेम आजही फक्त त्या पूरग्रस्त रुक्मिणीवरच का बरे आहे!! ही राधाही तुझ्यावरच फक्त तुझ्यावरच न जाणे कित्येक युगापासून प्रेम करते रे! भिजवून टाक या दुष्काळग्रस्त राधेचे अंग नी अंग, होऊ दे तिलाही पूर्णतः चिंब, फक्त तुझ्या प्रेमात,'' या पावसाशी मला संवाद साधायला आवडते आणि आम्ही बोलत बसतो तासन्तास.

''ये रे ये रे पावसा
तुला देतो पैसा
पैसा झाला खोटा
पाऊस आला मोठा''

ही गाणी गात गातच आम्ही मोठे झालो, हल्ली Rain rain go away म्हणतात मला ते अगदीच पटत नाही, अरे खेळायचे तर पावसात खेळा ना आम्ही पावसात खेळण्यासाठी तरसायचो आणि तुम्ही कसले पावसाला थांबा म्हणता आहात, यांना ना वाळवंटात पाठवून द्यायला हवे, मग बघा कसे पावसाचा धावा करतील ते!! अरे पाऊस म्हणजे बाप, पाऊस म्हणजे जीवन, तो जर रुसला तर दुष्काळाचा शाप. माझी आजी म्हणायची मी पोटात असताना आई या पावसातच खूप राबायची, गळणारे घर.., घर कसले झोपडीच ती, घरात शिरलेले पाणी बाहेर काढण्यातच पावसाळा जायचा, त्यावेळी पावसाची खूप खूप भीती वाटायची सर्वांना सुखावणारा पाऊस! आम्हाला मात्र धास्ती असायची, तोडक्या-मोडक्या संसाराची, काय ठेवावे आणि कुठे ठेवावे, त्यानंतर पांघरायचे आणि अंथरुणाला जर ओल लागली तर त्याच ओल्यात झोपायचे..., कुडकुडत थंडीत, खूप भयानक होते रे ते दिवस,

पाऊस लय वंगाळ वाटायचा,

आवडत असूनही नकोसा वाटायचा,

आजीची गोष्ट ऐकून माझे डोळे भरुन यायचे, आईने खूप



भोगले असावे, उन्हात पावसात केलेली मेहनत, ऐकून माझे काळीज फाटून यायचे, आणि नुसत्या या कल्पनेनेच अंगावर काटा यायचा की घरात पाणी शिरले आणि अंथरुण पांघरुण ओले झाले तर कसे झोपत असेल आई मी पोटात असताना, मी असेही ऐकले ती आजारी पडली तर दवाखानाही घरापासून खूप दूरवर होता, त्यामुळे रात्रभर थंडी अंगावर काढून सकाळी दहाच्या नंतरच दवाखान्यात जावे लागायचे, पाऊस इतकाही भयानक असू शकतो ही कल्पनाच मला करवत नव्हती आणि आजही पाऊस पडल्यावर मला ते दिवस कसे असतील याचा विसर पडत नाही, ते मी पाहिले नव्हते पण आजी जसे सांगायची त्यावरुन ते दिवस खूप भयानक असावे असा अंदाज यायचा.

''आभाळ फाटतं'' ही आजपर्यंत म्हण असेल असेच वाटत होते, पण खरोखरच आभाळ फाटते हे अनुभवायला मिळणार होते, तसेच वृक्षारोपण फार उत्साहाने साजरे केले जातात, पण नंतर त्याकडे दुर्लक्ष केले जाते. पृथ्वीच्या गर्भातून जन्म घेऊन इवलेसे रोप पाण्याअभावी कोमेजून प्राण सोडतात हे पाहून मनाला फार खोलवर घाव करून जाते, मग पाऊस तर रुसणारच ना. सुपीक जमीनी नापीक झाल्या मग त्याच्यावर घरे उभारली गेली, प्लॉटींगमध्ये भक्कम पैसा आहे म्हणून जमिनी बेभाव विकल्या गेल्या, आपल्याच सोन्यासारख्या जमीन रुपी पोरी अनेकांनी दलालांच्या आहारी स्वार्थासाठी विकल्या, आणि गावांची शहरे झाली, निसर्गाचे संतुलन पुरते बिघडून गेले, मग आला तो पाऊस पडणार कोणासाठी, म्हणून त्यालाही राग येत असेल, मग रागाच्या भरात कुठे ढगफुटी तर कुठे दुष्काळ हे विदारक चित्र आता बघायला मिळणार, ''हे कुठे तरी थांबायला हवे असे मनोमन वाटायचे आणि भरुन आलेल्या ढगांचे सांत्वन करायचे.

# पाऊस

**प्रांजली प्रमोद जाधव**
टी.वाय.बी.ए.



सकाळी उगवलेला सूर्य अचानक हरवून भर दुपारी कोवळ्या सकाळचा अनुभव देणारे ते ढगाळ दिवस आले की रणरणत्या उन्हातून जरासा दिलासा मिळतो. मे महिन्याच्या शेवटचे आणि जूनच्या सुरुवातीचे ते दिवस म्हणजे जणू पावसाची चाहूल. असे शांत, ढगाळ, दिवसभर सोसाट्याचा वारा सुटलेले ते दिवस संपून कधी पावसाची टिपटिप सुरु होते कळतच नाही. लहानपणी 'येरे येरे पावसा...' म्हणत पावसाची अनुभलेली सुरुवात आजही मनात घर करून आहे.

पावसाळा सुरु झाला की शाळा सुरु हे गणितच. बाहेर धो धो पाऊस पडताना वर्गात गिरवलेले धडे, बाईंचे खाल्लेले धपाटे, कौलावरून येणाऱ्या पागोळीच्या पाण्याने एकमेकांना भिजवणं, कधीतरी कोणीतरी चिखलावरून पाय घसरुन पडल्यावर हास्याला येणारं उधाण.... ती सारी मौज! दरवर्षी हा पाऊस ओलावून जातो. बऱ्याचदा माझा बाक गळक्या कौलाखाली असायचा. मग पाऊस सुरु झाला की टपटप थेंब माझ्या अंगावर, वहीवर पडायचे.

आज महाविद्यालयात शिकताना हाच पाऊस कधीकधी अगदी नकोसा वाटतो. कॉलेजला जायला घरातून निघताना पाऊस असेल तर बसस्टँडला जाईपर्यंत अर्ध भिजायला होतं. बसमध्ये गर्दीतून प्रवास करत तशाच भिजलेल्या अवस्थेत स्टँडवर उतरावं लागतं. तरीही पाऊस सुरुच असेल तर छत्री असूनही पार भिजत कॉलेजला जाऊन भिजलेल्या पाखरासारखे बसून लेक्चर्स करावे लागतात. पुन्हा घरी जाताना पाऊस असेल तर वैतागच. त्यात बसमध्ये चढताना, उतरताना तर भिजण्याची पुरेपुर सोयच. असा हा सतत ओलंओलं करणारा पाऊस नकोच वाटतो. शिवाय मनमुराद पावसात सोबत भिजणाऱ्या मैत्रिणीही आज विखुरल्या आहेत. अशावेळी भर पावसात प्रियकराच्या गाडीवरून मनोसक्त भिजत फिरणाऱ्या प्रेयसीला हा पाऊस जितका हवासा वाटतो ना... तितकाच मला नकोसा वाटतो.

पण हा नकोसा वाटणारा पाऊस मात्र तेवढ्याचपुरता. पावसाळ्यात सगळीकडे पसरणारी हिरवळ, बहरलेली शेतं, तुडुंब भरुन वाहणाऱ्या नद्या ही सारी निसर्गाची किमया मन उल्हासित करते. जणू ही सारी सृष्टी जगण्याचा खरा अर्थ सांगते.

पावसाळ्यातल्या आठवणी नकळत सुखावून जातात. काही खोल मनात ठसठसतात. भर पावसात आम्ही एकत्र कुटुंबातून वेगळे राहायला निघालो तो दिवस.... मोठ्या आईच्या अंत्यविधीला धो धो कोसळणाऱ्या पावसाचा दिवस.... त्याक्षणी जणू माझ्या मनातील अश्रूंचा वर्षाव पावसावाटे कोसळतोय हाच भास झाला. अशा एक ना अनेक आठवणी पावसाच्या.

असा हा पाऊस... कधी नकोसा तर खूप वेळा हवाहवासा.... मनातल्या आठवणींवर सरींचा शिडकावा करून त्या अलगद ओलावणारा.....

## वाटसरू

हृदयात माझ्या अंतरात्म्याची हाक ऐकतोय
रात्र सरता मी उषःकाळाचाी जो वाट पाहतोय
साद वेदनेची आर्त शरीराची अन् मनाची शांत
जखमा जेव्हा भरतील तोवर राही सुखाची भ्रांत

मृगजळासाठी तरसलो राहिलोय तहानलेला
छेडलेल्या सुरांमध्ये अर्थ माझ्या विसावलेला
हिरवळही लाचार झाली वाट कुठे संपे नाही
नजर जाई आरपार चालणेच हा पर्याय नाही

निरर्थकच जगायचे आता कुठे ओढत न्यावे
नियतीने खेळ केला जग माझे माझेच नसावे
ऐकण्यास हाक माझी आपले असे कुणी नाही
विखुरलेले मन सावरण्यास साथ कुणाची नाही

उरलोय एकटा आशा जगण्याची आयुष्य पुन्हा
रचेन कहाणी नवीन मी समजवेन स्वप्नांची पुन्हा
रक्ताळलेल्या जखमा बांधताना धैर्य मी एकवटेन
आत्मविश्वासाने प्रवाहात झोकून मी मार्ग चालेन

पंख छाटले जरी आकांक्षा झेप घेण्याची बाळगून
ठरवलंय जगायंच ताठ मानेने जीवन जे भरभरून
वेदनांचे बंध तोडून अखंड प्रवास मी चालत राहीन
नाही वाटेवर सावली तरी वाटसरू बनून प्रवास करीन
चालत राहीन चालत राहीन जगायचं ठरवलंय मी

**श्री. नरेश ना. म्हात्रे**
शिक्षकेतर कर्मचारी

# मला आवडलेले पुस्तक : 'गीता बोध'

**सागर रमेश पाटील**
एम. ए. भाग-२

'वाचाल तर वाचाल!' ही उक्ती आपणा सर्वांच्या चांगलीच परिचयाची आहे. मला वाचनाची आवड अगदी बालपणापासूनच आहे. तशी मी अनेक पुस्तके वाचली परंतु माझ्या हृदयाच्या कप्प्यात विशेष स्थान असणारे खास पुस्तक म्हणजे 'गीता बोध' गेल्या काही दिवसांपासून, दिवस काय महिन्यांपासून मी एकाच पुस्तकात हरवलोय. त्या पुस्तकाने मला वेड लावले आहे म्हणाना!

खरं तर या पुस्तकाबद्दल लिहायचे म्हणजे हिंदी म्हणीनुसार 'गागर में सागर भरना' असे होईल. त्याचा विषयच इतका गहन, त्याचा आवाका इतका अफाट की काही वाक्ये किंवा दोन-तीन पृष्ठांमध्ये त्याबद्दल लिहिणेच हास्यास्पद ठरेल. पानोपानी वा आपण शब्दोशब्दी म्हणू या लेखकाने घेतलेले प्रचंड कष्ट आपणास दिसून येतात. हे पुस्तक सर्वप्रथम आपणास त्याचा बाह्य आकार, प्रकार, उत्तम छपाई, या गहन विषयाला सोपे करून समजविण्यासाठी दिलेली चित्रे, रेखांकने आणि लेखकाची सुलभ करून शिकवण्यासारखी भाषा यानेच मोहून टाकते.




आपल्याला अगदी सामान्य माणसालादेखील तो फार मोठा दार्शनिक नसला तरी पडणाऱ्या फूट प्रश्नांची सोप्या सरळ भाषेत उत्तरे शोधण्यासाठी केलेली उकल म्हणजेच 'गीता बोध' हे पुस्तक. या पुस्तकाचे लेखक आहेत श्री. उदय वामन करंजकर.

मी कोण आहे? माझे अस्तित्व काय? मी या जगात का आलो? हे विश्व म्हणजे काय? असे असंख्य प्रश्न कोणाला पडत नाहीत? पण नुसती गीता वाचून आल्यावर आपल्याला कळते का? साधे आजारपण आले, दुःख आले, अपयश आले, कष्ट करावे लागले तरी आपण सहज विचार करतो. मनात संशयाचे काहूर उठते, प्रश्न, प्रश्न आणि प्रश्न! यांचा गुंता वाढत जातो. खरचं देव आहे का? आणि असलाच तरी तो सर्व व्यवस्थित का करत नाही? आणि तसेच या उलट, मला इतके काही देवाने दिले आहे पण तरीही मला काय सलत राहते? समाधान म्हणजे काय? ते कुठे मिळते? कसे मिळते? माणूस एवढाच का जगतो? मृत्यू म्हणजे काय? असेही अनुत्तरित प्रश्न आपल्याला छळत राहतात. आणि नेमक्या याच प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केलाय, श्री. करंजकरांनी.

या पुस्तकाचे सर्वात मोठे श्रेय कोणते? तर ही फक्त हिंदूची 'गीता' ठरत नाही; तर ती होते कुठल्याही जाती, पंथ, धर्माच्या, विचारवंत माणसाची नोंदवही. हे पुस्तक वाचायला वयाचेही बंधन नाही. गीतेतला अर्थ सांगणारी, त्याचे विवेचन करणारी, त्यातले शास्त्र समजावून सांगणारी अशी अनेक पुस्तके आज उपलब्ध आहेत. त्या पुस्तकांमध्ये काय होते की, ते प्रत्येक श्लोकाचा अर्थ समजावत पुढे जातात. या पुस्तकात तसे नव्हे. लेखकाने परिश्रमपूर्वक गीतामंथन करून आपल्या समोर लोण्याचा मिष्ठास गोळा ठेवला आहे.

लेखक एकच धारणा, परिकल्पना मनात ठेवून, त्या एकाच 'शब्दाचा' संपूर्ण गीतेमध्ये धांडोळा घेतो. वानगीदाखल 'आत्मा' हा शब्द गीतेत दुसऱ्या अध्यायापासून तेराव्या अध्यायापर्यंत किमान ५१ वेळा आला आहे, पण लेखक त्या सर्वांचा अर्थ आपल्याला एकाच 'आत्मा' या प्रकरणात समजावून सांगतो.

अनेक पुस्तकांमध्ये क्लिष्ट भाषा, दुर्बोध अवघड विवेचन असते. परंतु हे पुस्तक अत्यंत मुद्देसूद, नेटके व समजण्यास अतिशयसोपे असे लिहिले आहे, त्यामुळे हे पुस्तक विशेषतः आजच्या अहोरात्र कामात बुडून गेलेल्या व इतर काही अवांतर वाचण्यासाठी नसलेल्या पिढीला फार उपयुक्त ठरेल, असे वाटते. आजची पिढी जास्त ताणाखाली जगत आहे. त्यांचे ताणतणाव कमी करून जीवनाचा खरा अर्थ समजाविण्यास या पुस्तकाची सोपी, सुटसुटीत, सुबक, चित्रमय भाषा आणि शेवटी ठळक अक्षरात मुख्य मुद्दे देण्याची लेखकाची कला तरुणांना नक्कीच आकर्षित करते.

लेखकाने एक एक प्रश्न व एक एक धारणा घेत त्यांची उकल करण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे. हे ५४४ पानांचे पुस्तक जरी असले तरी ते वाचताना मध्येच सोडावेसे वाटत नाही. कारण सामान्यांच्या मनात असलेली 'गीते' बद्दलची एक अनामिक भीती, एक गूढ अशांत हुरहुर, गीता कुठून सुरु करायची? प्रत्येक श्लोक समजलाच पाहिजे का? अशा असंख्य प्रश्नांची उत्तरेदेखील आपण यात मिळवू शकतो. एक एक सोपान चढत कधी आपण उद्दिष्ठ साधतो, तेच कळत नाही.

ईश्वराचे अस्तित्व आहे की नाही, हा कोणालाही पडणारा

नेहमीचा प्रश्न. पण अगदी साध्या चित्रांनी, भोपळ्यावर वडिलांनी केलेल्या सहीच्या कथेने लेखक ते समजावितो. माया म्हणजे काय, सृष्टीकर्ता कोण हे देखील उदाहरण देत लेखक म्हणतो, 'मायाच प्रकृती आहे.' माया या चराचराचे जणू प्रक्षेपणच. थिएटरमध्ये असलेल्या फिल्म प्रोजेक्टरप्रमाणे ती. त्याचा पूर्ण सिनेमा आहे, पण तिचे प्रकटीकरण झालेले नाही आणि ते आपणहून स्वतः ते प्रक्षेपितही करू शकत नाही. ते जड, अचल, गतिहीन आहे. त्याला चालविण्यासाठी कोणाची तरी गरज भासते. ते हात असले तर सिनेमा सुरु होईल. तसेच 'माया' मध्येच हे निर्माण कार्य सामावले आहे. अशीच त्याची स्थितीकर्ता, लयकर्ता ही रूपेही लेखक सोपे करून सांगत जातो.

शेवटी लेखक, साधना म्हणजे काय? मोक्ष प्राप्तीसाठी आपण कसे अडथळे दूर करू शकतो? स्वतःच त्यासाठी काय प्रयत्न करावे हे सांगताना म्हणतो, ''या मानवी जीवनात प्रत्येक जीव ही वाट चोखाळू शकतो, जी त्याला 'जीवनमुक्ती'कडे नेते.'' तो आत्ता कुठे आहे, कसा आहे, हा विचार करण्याची काळजी नाही. मुक्तीच्या या वाटेवर तो चालण्याची कधीही सुरुवात करू शकतो आणि त्याचे अंतिम साध्य मोक्ष मिळवू शकतो.

हे पुस्तक देखील अत्यंत देखणे असूनही ज्ञानवर्धक, जिज्ञासा पूर्ण करणारे असे झाले आहे. किंमत थोडी जास्त वाटते, पण नक्कीच संग्राह्य आहे. लेखक स्वतः इलेक्ट्रॉनिक इंजिनिअर आहेत. लहान वयातच त्यांना जीवनातील मुलभूत प्रश्न पडू लागले आणि त्या ज्ञानपिपासेच्या शोधार्थ ते 'गीता' अध्ययन करू लागले. त्यांना गीता आणि वेदांतमध्ये प्रचंड रस वाटू लागला. त्यांचा जन्म १९५५ साली नागपूर येथे झाला.

लेखक स्वतः एक उत्तम कलाकार आहेत. त्यांची जलरंगांची चित्रे, दगडी, कांस्य किंवा इतर शिल्पे अप्रितम असतात. ते हिमालयाचे जणू भक्त आहेत. हिमालय त्यांना सतत साद घालीत असतो. तेथे ट्रेकिंगसाठी जाऊन तेथील स्थलचित्रे काढताना जणू ते ध्यानस्थ योगी होतात. त्यांची हीच प्रतिभा, त्यांच्या ज्ञानाची डूब, त्यांचे स्पष्ट विचार यामुळे गीतेच्या गाभ्याला न हलवता त्यातले नेमके मोती तसेच्या तसे वाचकासमोर ठेवण्यात ते यशस्वी होण्यास कारणीभूत आहेत.

शेवटी इतकेच सांगू इच्छितो की, मला पडलेले हिंदू धर्माबद्दलचे प्रश्न, गीतेविषयीचे प्रश्न हे पुस्तक वाचल्यावर अगदी चुटकीसरशी नाहिसे झाले. हे पुस्तक वाचून निर्मळ, तजेलदार, पाणीदार, चकाकणारे स्फटिकासमान मोती वाचकांना मिळो, हीच सदिच्छा!

## वाहता किनारा

पाण्यावाचून तडफडतील कितीक मासळ्या
असशील त्यांचा यम राक्षस तू....??
की लाट होऊनी भेटाया तुज
सरिता येते लांबून इतक्या
तिचा असावा प्रियकर तू....?

प्रेमरंगी रंगल्या आशिकांच्या
वचनांची साक्ष तू...?
की कधी तुटल्या मैत्रीच्या
उदास विरहाची
एकाकी साथ तू....?

आयुष्य संपण्यास कित्येक आतुर
त्यांना खुले ते मरणाचे दार तू?
वा कितीक कवीमन
शब्द शोधतील वाळूत तुझ्या
त्या कवितांचे जीवन तू...?

सांग आज खरेच एकदा,
साथ तू की साक्ष तू...
अंत तू की अथांग तू...
अपूर्ण तू की संपूर्ण तू...

ओलेपाणा उरात लपवून
कोरडा निस्तब्ध तू...?
की शुष्कपणा तो विसरून मनीचा
क्षणभर वाहता किनारा तू...?

कु. स्नेहल सोरटे
एम.ए.-२ (मराठी)

# साठीशांत

**अश्विनी रामकृष्ण आठवले**
सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग

साठीशांत...
कोणाची ?
सदूशेठची ?
हो....
म्हणजे सदू साठ वर्षांचा झाला ?
हो... म्हणूनच साठीशांत आहे ना....

एखाद्याला द्वाडपणा करायचा असेल तर सदूशेठची दीक्षा घ्यावी असा हा मनुष्य...पु.लं. च्या म्हणण्याप्रमाणे 'कोकणातील माणसं एकवचनी' तसा सदू पण एकवचनीच.... तोंडावर मात्र सदूशेठ...

सदूशेठ धरुन दहा-बारा भावंडं... या सगळ्यांपैकी फक्त एकजण दहावी पास झाला... बाकी कोणीही तिथपर्यंत पोचलीदेखील नाहीत....



सदू बाकीच्यांतील एक... याचे लहानपणीचे किस्से एकाहून एक सरस.... शाळेत जायला म्हणून हा घराबाहेर पडायचा आणि इकडेच फिर, तिकडेच फिर असे उद्योग करायचा.... कधी चुकून शाळेत गेला तर मार खाल्ल्याशिवाय परत यायचा नाही...

एकदा गावात कोणाच्यातरी घरी गेला.... त्या घरातील बाई भाकऱ्या भाजत होती... भाकऱ्या भाजत असताना ती मधूनच कशासाठी तरी उठली.... तर तिकडे हा सदूच भाकऱ्या भाजायला बसला....

एकदा या पठ्ठ्याने वाड्यातला बैल सोडला आणि अंगणातल्या बाजल्यावर उभा केला... मग दवंडी पिटवून सगळ्यांना बघायला बोलावलं... या द्वाडपणाला घरातले कंटाळले... नंतर घरात कोणाचं ऐकत नाही म्हणून सदूला चिपळूणला ओळखीच्यांकडे राहायला आणि शिकायला ठेवला.... तिकडेही तऱ्हा तीच...

सुंभ जळाला तरी पिळ जात नाही, हेच खरे...

तो घरातले पैसे चोरून जीवाची मुंबई करायचा... अख्ख्या चिपळूणभर फिरायचा.... त्या वेळच्या सिनेमातल्या नटांची स्टाईल म्हणून त्याने डोक्यावरचे केस भरपूर वाढवले होते... कोणीतरी त्याला म्हणालं, सदू केस काप हो आता, काहीतरीच दिसताहेत... पडत्या फळाची आज्ञा म्हणतात तसं तो केस कापायला गेला आणि तुळतुळीत गोटा करून आला.... अतिरेकी वागणं म्हणतात ते हेच....

अभ्यासाच्या नावाने आनंदच होता.... अभ्यास केला नाही म्हणून कितीतरी वेळा दप्तर डोक्यावर घेऊन शाळेभोवती फेऱ्या मारल्या असतील.... असं सगळं असूनदेखील नशीब जोरावर होतं त्याचं.... शिक्षण नसूनसुध्दा याचं आयुष्यात कधीही कुठेही अडलं नाही....

वडिलोपार्जित संपत्तीची वाटणी झाली.... प्रत्येकाच्या वाट्याला शंभर शंभर लागती आंब्यांची कलमं, पन्नास बाजते माड, पन्नास पोफळी आणि घरात खाऊन विकायला होईल इतकं भात पिकणारी शेती आली....

रिकामा वेळ हवा तेवढा असायचा त्याच्याकडे.... मग बसून पानसुपाऱ्या खायच्या नाहीतर आजूबाजूची लोकं गोळा करून कुटाळक्या करायच्या.... कलमं कराराने दिलेली.... भाताची शेती कोणालातरी करायला दिलेली.... एकदम पैसा हातात येतो... हवी तेवढी छानछोक करायची....

त्याला एक मुलगा पण आहे.... त्याचाच मुलगा तो.... संध्येची चोवीस नावं सुध्दा येत नसतील त्याला पण मुंबईत भिक्षुकी करतो म्हणतात....

भगवंताने उभ्या केलेल्य विश्वाच्या नाटकातलं सदू हे एक पात्र.... त्याच्या साठीशांतीला तुला करण्यासाठी मोठा तराजू आणलेला.... तराजूच्या एका बाजूला फुलशर्ट फुलप्यांट घातलेला सदुशेठ... आणि दुसऱ्या बाजूला वह्या.... त्या वह्या म्हणे गावातल्या मुलांना वाटणार होते...

ज्या गोष्टीशी त्याचा कधीही संबंध आला नव्हता त्याच गोष्टीशी त्याची तुला होत होती....

त्या दहा-बारा भावंडांमध्ये पास झालेलं एक भावंड होतं... तो पास झाला तेव्हा सदू म्हणाला.... 'नापास होण्याची आपली परंपरा मोडलीस तू' अशा या अर्कांशी तुला होत्ये ते बघून त्या वह्यासुध्दा धन्य झाल्या असतील....

# महत्व अभ्यासाचे

श्री. नरेश ना. म्हात्रे
शिक्षकेतर कर्मचारी



विद्यार्थी जीवन आणि अभ्यास, या दोन्ही एकमेकांशी संलग्न अशा गोष्टी आहेत. विद्या मिळवणे, विद्येचे अर्जन करणे हे विद्यार्थी जीवनाचे खरे उद्दिष्ट होय.

विद्या मिळवणे ही गोष्ट प्रयत्नसाध्य आहे ! हवा तो अभ्यास ! अभ्यास महणजे अभि+आस. मनापासूनची इच्छा असली तरच मनुष्य प्रयत्न करतो प्रयत्न म्हणजे परिश्रम आलेच.विद्यार्जन करण्यासाठी सातत्याने परिश्रम करण्याची मनापासूनची तयारी हवी असे म्हटले आहे. वाळूचे कण रगडीता तेलही गळे, अशी बरीच उदाहणे देता येतील. निरीक्षण करण्याची सवय हवी पाठ्यपुस्तके व अन्य अवांतर वाचनाची शिस्त हवी आणि मुख्य म्हणजे लेखन व वाचन याबरोबरच हवा अभ्यास. अभ्यास म्हणजे काय ?

निरीक्षण-वाचन-ग्रहण-लेखन या सर्व कौशल्यासाठी सातत्याने परिश्रम करण्याची तयारी म्हणजे अभ्यास. विद्यार्थ्याने लक्षपूर्वक वाचले पाहिजे, मुद्दे ध्यानी ठेवले पाहिजेत, जरुर तेथे पाठांतर केले पाहिजे, टिपणे काढली पाहिजेत, अवांतर वाचन केलं पाहिजे तसेच विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहूनही काढली पाहिजेत.

दररोज शिकवल्या गेलेल्या भागाचे पुनर्वाचन केले पाहिजे. पुढे जो भाग शिकवणार असतील त्याचे वाचन करून त्यातील कठीण भागाचे संशोधन किंवा मुल्यांकन करणे, वाचणे व समजून घेण्याचा प्रयत्न करणे.

या सर्व अभ्यासाच्याच पायऱ्या आहेत. विद्यार्थी हा विद्या-अर्थी असतो या वयातच मनावर झालेले विद्येचे संस्कार कायम राहतात, टिकतात. हे वय म्हणूनच खूप महत्वाचे मानले जाते. पुढील यशस्वी जीवनाचे गमक म्हणून विद्यार्थी जीवनाकडे पाहिले जाते.

उद्याच्या उज्ज्वल भविष्यकाळासाठी आज, विद्यार्थी जीवनात ज्ञान संपादन करून ठेवणे अत्यंत आवश्यक असते. यात जो कोणी कुचराई करील, त्याला आयुष्यभर पश्चाताप करीत बसण्याची वेळ येते. म्हणून प्रत्येकाने सावध राहून या काळी ज्ञान संपादनाला महत्व दिले पाहिजे.

विद्येचे मनुष्याला आले श्रेष्ठत्व ह्या जगी मोठे, हे लक्षात ठेवून आपले भावी जीवन अधिक संपन्न व सुसंस्कारित होण्यासाठी अभ्यासाचे महत्व ध्यानी घेतले पाहिजे.

विद्यार्थी जीवन सुफलित केले पाहिजे.

# पाऊस

आकाशात नभे अन्
धुके दाटून येती
पहिल्या सरीत मात्र
माती न्हाऊन घेती ।।१।।

नद्या, नाले, सरोवरांत
कोसळती पावसाच्या धारा,
डोंगरावर मात करून वाहतो
झुळझुळणारा वारा ।।२।।

विजेची चमक अन् ढगांची गडगड
ही पावसाळी खूण,
परंतु मान कधीच फेडत नाही
ते पावसाचे ऋण ।।३।।

गरमागरम भजी अन् चहाचा स्वाद देत
येते पावसाची सर,
क्षणात भिजवूनी टाकते
ते मातीचे थर ।।४।।

शेती हिरवीगार अन्
जमीन चिखलदार,
मात्र, ढग चिडल्यावर होतो
एकच विजेचा वार ।।५।।

अनूभव इतका छान
की, पावसाळा हवाहवासा वाटतो,
गणपती उत्सव साजरा करून
चार पाच महिन्यात निघून जातो ।।५।।

आम्ही समस्त कोकणस्थ
ऋणी आहोत या पावसाचे,
''भरपूर पाऊस पडू दे रे''
हे वाक्य मात्र नवसाचे ।।६।।

मनश्री उल्हास पवार
एस.वाय.बी.कॉम

# जननिंदा

**सौ. मिनाक्षी बन**
सहाय्यक ग्रंथपाल



जिच्या वाट्याल जननिंदा कधीच आली नाही, अशी व्यक्ती कोठे जन्माला आल्याची नोंद नाही. निंदा ही एक लोकप्रतिक्रिया असते. आपली मते, विचार किंवा जीवनपध्दती ज्यांना मान्य नाही किंवा आपले जगणे आणि वागणे ज्यांना रूचत नाही अशा व्यक्तींचा आपल्याविषयीचा प्रतिकूल अभिप्राय म्हणजे जननिंदा....

ही निंदा तशी अटळ असते. अशा निंदेचा परिणाम आपल्यावर घडू न देणे हे आपल्या हाती आहे. निंदेला तोंड देणे शक्य आहे,पण निंदकाचे तोंड बंद करणे केवळ अशक्य आहे. आपली अविचल आत्मश्रध्दा हेच आपले संरक्षक कवच होय.

श्री अक्कमादेवी या नावाची एक वीरशैव संत कवयित्री होऊन गेली. बसव, प्रभुदेव, अल्लमप्रभू या बाराव्या शतकातील वीरशैव संतांच्या प्रभावळीत अक्कमा शोभून दिसत असे. ती एक तपस्विनीहोती, पण तिचे स्त्रीत्व व रुपसंपदा तिच्या वाटेत आले. तिच्या शिवभक्तीची थट्टा झाली. या थट्टेमुळे आणि निंदेमुळे ती ढळली नाही. ती म्हणत असे....

''वनात घर करून हिंस्त्र पशूंना भिऊन कसे चालेल ?
समुद्रकिनारी घर करून लाटांना भिऊन कसे चालेल ?
बाजारात घर करून आवाजाला भिऊन कसे चालेल ?
यालोकी जन्मल्यावर स्तुती-निंदा झाली तरी मनात क्रोध न बाळगता समाधानी होऊन राहावयास शिकले पाहिजे.''

समाजातील सज्जनांनी शेवटी वागावे कसे ? शेजाऱ्या-पाजाऱ्यांची नाके मुरडली तर करावे काय ? धर्मकारण, राजकारण, समाजकारण, व्यक्तीजीवन या सर्व क्षेत्रात धुळीचे लोट उठत राहतात, तरीही भल्या माणसांनी आपले स्वत्व आणि सत्व सोडू नये, असे अक्कमाचे सांगणे होते.

समजात आपणाला माणसे दिसत, भेटत राहतात. कोणी आपले कौतुक करतात. कोणी आपल्याकडे पाहून नाके मुरडतात. तोंडावर गोड बोलणे व मागे निंदा करणे हा सुमार व्यक्तींचा मनोधर्म आहे. अशा व्यक्तींचा पाठपुरावा करू नये. केवळ त्यांच्या समाधानासाठी कशाचीही शहानिशा करीत बसू नये. असे करीत बसले तर आपल्या मनःशक्तीचा अपव्यय होतो. जग काय म्हणेल याचे गणित मांडत बसू नये. आपली विवेकबुध्दी काय म्हणते त्याकडे लक्ष द्यावे. इतरांनी केलेली आपली निंदा आपण विसरावी व स्वतः कोणाची निंदा करू नये एवढेच एक तत्व पाळावे. याचा अर्थ असा नव्हे, की आपले प्रांजळ मतभेद आपण व्यक्त करू नयेत. अत्यंत विनयाने आणि तरीही योग्य तेवढ्या सुस्पष्टतेने आपली वेगळी मते बोलून दाखवावीत. कोणाला मुद्दाम डिवचू किंवा खिजवू नये. कोणाची अनावश्यक, अप्रासंगिक व अप्रमाण स्तुतीपण करु नये. तोंडदेखलेपणा कटाक्षाने टाळावा.

समर्थांनी म्हटल्याप्रमाणे वागणे सरळ, निर्मळ, कोमल असावे. विरोधांचा वारा सहन करावा. निंदेच्या पावसात भलेपणाची छत्री उघडून धरावी....!!!

# पाणी

**अलगद गालावर रेंगाळत येते**
**कधी तरी माहेरची आठवण करून देते,**
**ते पाणी......**

**त्या पाण्यामध्ये खूप काही दडवून ठेवलेले असते,**
**ते पाणी......**

**कधीतरी त्याच भावना त्या पाण्यामधून निघून जातात,**
**ते पाणी......**

**सोबत बनते मन अगदी मोकळे होते,**
**ते पाणी.....**

**त्या पाण्याला अश्रू असे नाव**
**अश्रू असे नाव......**

**प्रांजल निवास सुतार**
एम.ए.-२ (मराठी)

# सोयी तेवढ्या गैरसोयी

सौ. अश्विनी रामकृष्ण आठवले
सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग

सोयी तेवढ्या गैरसोयी....

आणि पाहुणे आल्यावर तर सगळ्यासोयी गैरसोयी म्हणूनच उभ्या ठाकतात... फजिती होणार हे शंभर टक्के ठरलेलंच... आमचं घर गावात असलं तरी सगळ्या सोयी आहेत हो आमच्याकडे....

तुम्ही कधीही राहायला या.... अगदी बिनधास्त... आंघोळीसाठी गॅस गिझर आहे आमच्याकडे, लाईट गेले तर इन्व्हर्टर आहे, पाणी सुध्दा आम्ही आरओ-युव्ही चं पितो, दर चार-चार महिन्यांनी पेस्ट कंट्रोल करतो, मुंगी नाही की डोंगला नाही कुठे अजिबात, रात्री जेवण झाल्यावर आम्ही शतपावली करायला जातो बरे.... तेव्हा कधीकधी आईस्क्रीम खातो.... तो आईस्क्रीमवाला आहे आमच्याइथला, कसलं अफलातून आईस्क्रीम बनवतो... लाजवाब...

नवीनच लग्न झालेली परी आपल्या माहेरच्यांना आनंदाने सांगत होती... पहिल्यांदाच नव्हे जवळ जवळ चवथी पाचवी वेळ असेल हे सांगायची... ॲट लास्ट... तिच्या काका-काकूंनी ठरवलंच की तिच्या सासरी जायचंच.. आणि हो-हो म्हणता ते आले सुध्दा परीकडे राहयला...

आल्यावर अगदी आनंदाने स्वागत झालं त्यांचं... वेलकम ड्रींक (कैरीचं पन्ह) का काय म्हणतात ते ... ते पिऊन सुध्दा झालं.. काका काकूंनी पुतणीचं घर बघितलं... सगळ्या सुख-सोयींनी अगदी समृध्द...काका काकू खूश त्यामुळे पुतणीसुध्दा भलतीच खूश..

संध्याकळचे पाच वाजले होते....का काकू मोठ्ठा प्रवास करून आले होते... जरा फ्रेश होऊ म्हणत-म्हणत आंघोळत करू असा ठराव संमत झाला... नाहीतरी गॅस गिझर आहेच.... वेगळं पाणी तापवायची वगैरे भानगड नाही.... परी म्हणाली हो-हो करा ना आंघोळ... चालेल... मी लावते गरम पाणी... लगोलग ती बाथरूममध्ये गेली आणि गरम पाण्याचा नळ चालू केला...



काका थांबा हा जरा.... आत्ता गरम पाण्याने बादली भरेल... मग जा आंघोळीला... थोडावेळ झाला आणि बादली वाहून गेल्याचा आवाज आला.... काका आंघोळीला गेले आणि पाण्यात हात घातला आणि..... गार पाण्याने भरली होती बादली.... अगं गरम पाणी नाही आलं... गारच तर आहे.... परीने जाऊन सिलेंडर हलवून बघितलं तर चक्क हलकं लागत होतं....

अहो काका सिलेंडर संपलं हो... सकाळी आमच्या सगळ्यांच्या आंघोळी झाल्या तेव्हा व्यवस्थित आलं गरम पाणी... आत्ता नेमका सिलेंडर संपला... थांबा लावते दुसरा... मग करा आंघोळ... यथावकाश काकांची आंघोळ झाली आणि नंतर काकूंची सुध्दा...



गप्पा रंगत आल्याच होत्या... परी आणि सासूबाई एकीकडे स्वयंपाक करतच होत्या... हळुहळु जेवणाची वेळ झाली आणि पानं घेतली... रितसर सगळं वाढून झालं... सगळे जेवायला बसले... पहिला घास तोंडात टाकला आणि लाईट गेले... सगळ्या ट्युब आणि पंखे अचानक जीव गेल्यासारखे बंद पडले....

अरे इन्व्हर्टला काय झालं... एरवी लाईट गेलेले समजत पण नाही... परीने इन्व्हर्टरजवळ जाऊन बघितलं आणि बॅटरी डिस्चार्ज झाल्याचा लाईट परीकडे बघत होता... आणि पर्यायाने परीही त्याच्याकडे...

कधीच असं होत नाही हो... आजच काय झालं... समजत नाही... शेवटी कँडललाईट डिनर झालं नव्हे तसं करावं लागलं....

नंतर सगळे अंगणात बसले... गप्पांना ऊत आलेललाच होता... परी जरा पाणी आण गं... काकूने ऑर्डर सोडील... परी स्वयंपाक घरात गेली.... तांब्या-भांड भरून बाहेर आणलं.... काकूने पाण्याचा एक घोट घेतला आणि तडक बेसिनजवळ जाऊन बाहेर काढला... काय गं परी... मचूळ आहे पाणी... विहिरीचं आहे की काय...



अग काकू आरओ-युव्ही चं आहे... मचूळ कसं लागेल...

अगं परे पिऊन बघ.... परीने प्यायलं आणि कसंबसं गिळलं...

बहुतेक ॲक्वागार्ड बिघडलं वाटतं.... नाहीतर पाणी खरंच बिसलरीसारखं लागतं गं....तेवढ्यात सासूबाई म्हणाल्या... अगं परी आपण काल केलेले रव्याचे लाडू दे काका काकूला... हो देते....

परी आत गेली आणि तिने डब्याचं झाकण उघडलं... लाडवाच्या अगोदर मुंग्या दिसल्या डब्यात...जेवढे लाडू त्याच्या दसपट मुंग्या डब्यात... अहो आई, लाडवाला मुंग्या आल्या.... काका काकूने निराशेने एकमेकांकडे बघितलं आणि परीने आणि सासूबाईंनीसुध्दा....

प्रसंगावधान राखत काकू पटकन म्हणाली.... अगं परी, तू तो कुठला आईस्क्रीमवाला म्हणत होतीस, मस्त असतं म्हणे त्याच्याकडे आईस्क्रीम.... चल जाऊ तिकडे आईस्क्रीम खायला...

हो हो काकू ... चल ना जाऊ....




दाराला कुलूप लावलं आणि सगळी मंडळी आईस्क्रीमवाल्याच्या दिशेने निघाली... मजल दरमजर करत करत आईस्क्रीमचं दुकान गाठलं पण... चक्कं दुकानाचं शटर घट्ट बंद... परीच्या चेहऱ्यावरचे भाव बघण्यासारखे झाले होते आणि सासूबाई परिस्थिती सांभाळत म्हणाल्या... ह्याचं दुकान कधी म्हणजे कधी बंद नसतं हो... अगदी रात्री साडेबारा-एक पर्यंत उघडं असतं.... नेमका आजच मेला कुठे गेला काय माहिती....

सगळ्यांचा मूड ऑफ झाला... आता सगळे बॅक टू पॅव्हेलियन... घरी येऊन प्रत्येकजण ठरलेल्या जागेवर झोपले आणि आंघोळी पासूनच्या झालेल्या फजितीची मनातल्या मनात उजळणी करत होते....

# माणुसकीची 'टंचाई'

**श्री. नरेश ना. म्हात्रे**
शिक्षकेतर कर्मचारी



टंचाई हा शब्द तसा आपल्याला नवीन नाही. महागाईच्या जोडीला टंचाई असायची. टंचाई-रॉकेल-गॅस, जीवनाश्यक वस्तूंची - वस्त्र अन्नाची - दुधतुपाची - पाण्याची विजेची या साऱ्यात आता आणखी एका गोष्टीची भर पडलीय ती म्हणजे माणुसकी ! टंचाई माणुसकीची.

माणुसकी-किती साधासुधा शब्द खरं तर माणसाचं खरं वैशिष्ट्य जिच्यामुळं जाणवतं, मोठेपण समोर येतं तीच ही माणुसकी पण आज तिचीही चणचण जाणवू लागलीय.

पूर्वी माणसं अतिथी देवो भव ! म्हणायची. भुकेलेल्या अन्न, तहानलेल्या पाणी देणं आपलं माणूसपणाचं पहिलं आद्य कर्तव्य समजायची पुर्वी जुनी माणसे रस्त्याने जाणारा अगदी वाटसरु असला तरी ओळख असो वा नसो हात जोडून मुखी श्रीरामाचं नावं म्हणजेच राम-राम म्हणायची. परंतु आता माझ्या ४८ वर्षांच्या कारकिर्दीत पाहतोय कुणी साधा नमस्कार सुध्दा करायला तयार नाही. ही वस्तुस्थिती आहे. कुठे गेली ती माणुसकी ? गोरगरीबांना, गरजूना मदत करा असं कुणी-कुणाला न सांगताच पूर्वी मनापासून हे सारं केलं जातं होत.

आज मात्र जिकडे पहाल तिकडे पैसा आणि मतलब वा स्वार्थ यापुढे माणसाला दुसरं काही दिसत नाहीसं झालंय. पैशासाठी-स्वार्थासाठी माणूस रक्ताची नाती, मैत्री, थोरांबद्दलचा आदर, कौटुंबिक स्नेह, जिव्हाळा आपुलकी या साऱ्यांना विसरु लागला आहे.

दीन दलितांचे अश्रू पुसणं त्यांना उध्दाराचा मार्ग दाखवणं आपल्याला होईल तेवढी दुसऱ्याला मदत करणं आणि इतरांच्या सुखदुःखात सहभागी होणं खरा माणूसधर्म. पण आज पहावं तिकडे गरीबांना मदत करण्याऐवजी त्यांना अधिक लुबाडता कसं येईल आणि आपल्या पोळीवर तूप कसं ओढून घेता येईल. यासाठीच जो तो धडपडताना दिसतोय. गरीबी नष्टकरण्याऐवजी गरीबांनाच नष्ट करण्याचे डावपेच आखले जात आहेत. राजकारणी लोक मतांसाठी गलिच्छ राजकारण करत आहेत. चांगुलपणा अभावानेच दिसतोय. इथंच जाणवतेय माणूसकीची टंचाई ! साने गुरुजींनी म्हटले आहे. 'खरा तो एक धर्म जगाला प्रेम अर्पावे !' ही माणुसकीची टंचाई दूर करायची तर प्रत्येकाने सचोटी, सदाचार, प्रामाणिकपणा आणि सत्य धर्माचं पालन करायला हवं. आपण वाईट वागायचे नाही व दुसऱ्याला वाईट वागण्यापासून परावृत्त करायचे हे व्रत प्रत्येकाने जर अंगिकारले तरच ही माणूसकीची टंचाई नाहीशी हऊ शकेल.

## सांजसखी

त्या सांज वेळी
दिसे सूर्य मजला
मावळिता पश्चिमेकडे,
तांबूस तांबूस रंगछटांनी
लक्ष वेधले आभाळाकडे ।।१।।

किलबिल किलबिल
गाणे गुणगणत
पक्षी निघाले परतीकडे,
अंधाराच्या गडद भीतीने
ओढ लागली घरट्याकडे ।।२।।

शांत किनारा, फेसाळते पाणी
सौम्य असती
सुर्याची किरणे,
मावळतीचे रंग सोडूनी
सूर्य निघाला अस्ताकडे ।।३।।

**मनश्री उल्हास पवार**
एस.वाय.बी.कॉम



# स्वत:शीच बोलावे असे काहीतरी....

**अभिजित अ. तुळपुळे**
शिक्षकेतकर कर्मचारी

**महाविद्यालयातील माजी जेष्ठ शिक्षकेतर कर्मचारी 'कै. अनिल तुळपुळे' यांच्या आठवणीत...**

माणसं आयुष्यात येतात ... जातात... काही माणसं भेटतात फक्त एक ''निमित्त'' होऊन, काही कामापुरती, काही कारणापुरती ... काम संपलं की निघून जाणारी... आणि काही माणसं मात्र ऋतूसारखी येतात, आणि जगण्याचे मोसमच बदलून टाकतात.

आपण त्यांच्या रंगात रंगतो त्या मोसमाचे होऊन जातो. काही माणसं मात्र ''जगणं'' होऊन येतात न आपले जगणं त्यांच्या जगण्याचाच एक भाग होऊन जातं. ते येतात आणि आयुष्यभर राहतात.. आपला भाग होऊन निमित्त होऊन आलेली माणसं, भेटतात, घटकाभरच्या प्रवासात, भेटल्यासारखी न प्रवास मजेत होतो, खूप गप्पा होतात, मस्त गट्टी होते, आपण एकदम हरवून जातो त्या प्रवासातपण, प्रवास संपतो, त्या माणसाचा किंवा आपला थांबा येतो आणि ती माणसं निघून जातात कायमची.

तरी ती माणसं आपल्या आयुष्यात नाहीत म्हणून, रडून थांबून कसे चालेल ? उलट विचार करून पहा ती व्यक्ती थोडेच दिवस का आपल्या आयुष्यात आली ? भावनिकतेने ढेपाळलेल्या आपल्या जगण्याला, थोडासा आनंदाचा शिडकावा द्यायला ? की, आपल्या जवळचा असे कोणीच नाही असे वाटत असताना तुमच्यासाठी काय वाटेल ते करण्याची तयारी दाखवायला ? किती स्पेशल आहात तुम्ही त्यांच्यासाठी हे तुम्हाला समजून द्यायला.

आपल्या प्रत्येकाचं कारण असेलंही वेगळं, पण अशी निमित्ताने आलेली माणसं आपले जगणे उजळवून टाकतात, काही काळासाठी आणि मग निघून जातात. त्यांच्या जाण्याचा खूप त्रास होतो आपल्याला आपण खूप त्रागाही करतो, स्वतःला किंवा त्या व्यक्तीला दोष देतो आणि जे मिळालेले असते तेही नाकारत राहतो.

आपण असे का करायचं ? आपण जे जगतो ते भरपूर जगायचं, आपल्या सोबत असलेल्या माणसांना बंधन घालण्यापेक्षा अपेक्षांची ओझी लादण्यापेक्षा, जाऊ द्यावं, त्यांना जायचं असेल तर आणि म्हणावं की चार क्षण का होईना, किती आनंद मिळाला, किती सुंदर झाला प्रवास.

आपले हसरे क्षण हीच आपली पुंजी, ती अशा रडक्या आठवणींवर का खर्च करायची ? दिलखुलास जगा आणि जगू द्या.

## किनारा

घेतले मी हुंदके, काठावर त्या रोजच्या
जिथे अश्रुच्या तुझ्या, किनारा तो होता

मी विसर्जित केली तेव्हा, ती पत्रे गोड आपुली...
ज्यावर प्रेमाचा आपला, ऊतारा तो होता

मी स्मरत गेलो काही, आठवणी कटू त्या आपुल्या
जिथे नयनाचा तुझ्या, पहारा तो होता

मी गळत गेलो तेव्हा, अश्रुंना त्या माझ्या...
कारण सोबतीला स्मृतींचा, सहारा तो होता

घायाळ झाले डोळे माझे, शोधात तेव्हा तुझ्या...
ज्या वाटेवर तुझा, ईशारा तो होता

भेटले न मला काही, त्या रस्त्यात तिथे
माझ्यासाठी तुझा हा, जवाब करारा होता....

वाहत गेलो पुन्हा, डोहात गोड तुझ्या...
जिथे गोड स्वप्नांचा, दरारा तो होता

भेटला तू पुन्हा, काठावर त्या रोजच्या
ऊगवला अंगावर पुन्हा, शहारा तो होता..

**पाटल सागर रमेश**
एम.ए. मराठी

# छात्र एनसीसी का

**नितेश शांताराम पाठारे**
एफ.वाय.बी.ए.

पहला एनसीसी दिवस १९४८ में तत्कालीन प्रधानमंत्री स्वर्गीय पंडित जवाहरलाल नेहरु के निर्देशों के तहत मनाया गया था। उन्होने एनसीसी दिवस मनाने का प्रावधान शुरु किया था। नवम्बर के चौथे रविवार को एनसीसी दिवस के रूप में तय किया गया था। इस दिन एनसीसी के मुख्यालय दिल्ली में जोर शोर से उत्सव किया गया था जहाँ पर एनसीसी के कैडेट्स का शक्ति प्रदर्शन किया गया था।

यह तब से हमेशा ही यह दर्शनीय होता है। पंडित जवाहरलाल नेहरू का एनसीसी के प्रति एक विशेष आकर्षण था। नेहरू एनसीसी के लिए काफी ज्यादा प्रभावशाली रवैया अपनाते थे। युटीसी और युओटीसी को जोडकर एनसीसी बनाने का फैसला भी पंडित जवाहरलाल नेहरू का ही था। एनसीसी में जो छात्र पहले वर्ष प्रवेश लेते है। उन्हें कैडेट्स ही बोला जाता है। दूसरे और तीसरे वर्ष में जो कैडेट्स होते हैं। उन्हे वही रैंक दी जाती है। एनसीसी में विविध प्रकार के कैंप भी करने होते हैं। जैसेकि आर.डी.सी., आय.जी.सी. और थल सैनिक कैंप आदी में भाग लेने का अवसर मिलता है। यह सारे कैंप कैडेट्स को बेहतर भविष्य निर्माण और मेहनत करना सिखाते हैं। एनसीसी नेवी, एयर, आर्मी की युनिट होती है। और यह तीन वर्ष की होती है। एनसीसी के तिसरे वर्ष पूरा करने के बाद 'सी' सर्टिफिकेट दिया जाता है। उसका आर्मी मे चुने जाने के लिए एक अच्छा विकल्प है।

रा कै को
NCC
एकता और अनुशासन

# ₹1000 का नोट

**गौरव उपाध्याय**
हिन्दी शोधार्थी

मैं १००० का नोट हूँ। एक समय में मैं भारत के चरण मुद्रा में सबसे बडा था। मेरी उत्पत्ति सबसे पहले वर्ष १९५४ में भारतीय रिजर्व बैंक के द्वारा हुई। १९५४ से लेकर १९७८ तक में भारतीय बाजार में चलन में रहा। समय के साथ ही साथ मेरी अहमियत बढ़ती गई लोग मेरे महत्व को समझने लगे और साथ ही साथ मेरा दुरुपयोग करने लगे। मेरे नकली रूप को बाजार में उतार दिए। जिसके कारण मुझे लोग बहुत ही जाँच-परख कर लेने लगे। मेरे




नकली रूप को बढते देख सन १९७८ में भारत सरकार ने मेरा चलन बंद कर दिया।

समय बीतता गया औऱ एक दिन अचानक से भारत सरकार को मरी याद आई और सन २००० में मुझे पुनः अस्तित्व में लेकर आए मैं बाजार में अपना परचम तेजी से लहराने लगा भारतीय बाजारों हो या विदेशी बाजार मेरी माँग बढने लगी। मेरी माँग खास करके एशियाई बाजार जैसे-पाकिस्तान, बांग्लादेश, नेपाल आदि देशों में तेजी से बढ रही थी माँग बढ़ने के साथ ही साथ मेरा नकली रुप भी बाजार में तेजी से उतरने लगा। जहाँ एक तरफ मेरा उपयोग उपनिवेश किया जा रहा था वहीं दूसरी ओर मेरे दोनों रूप (वास्तविक और बनावटी) का उपयोग लोगों को धोखा देने, आतंकवाद को बढावा देना, बेरोजगारी उत्पन्न करना आदि क्षेत्रों में होने लगा। इन सभी कारणों को देखते हुए जनसामान्य मुझसे दूर जाने लगे। मेरे वजूद को बार-बार निरीक्षण करके तभी स्वीकार करते थे। यह बात मुझे अत्यधिक पीड़ा पहुँचाने वाली थी।

वक्त गुजरता गया और मेरा उपयोग और दुरुपयोग दोनों होता रहा। कभी मैं किसी की जान बचाने के लिए अस्पताल पहुँचा तो कभी रिश्वत के नाम पर पुलिस स्टेशन। जहाँ आम जनता दिवाली में मेरी पूजा करते थे वहीं जुआ खेलने वाले मुझे दांव पर लगाते थे। कहीं पर मुझे सम्मान मिला कहीं पर मुझे अपमानित होना पडा। कभी-कभी ऐसा लगता कि मेरा होना ही मेरे लिए गुनाह है।

८ नवंबर २०१६ को रात्रि को ८:०० बजे मैंने मेरे जीवन की आखिरी साँस ली। वर्तमान भारत के प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी ने ८ नवंबर २०१६ को रात्रि को ८:००० बेज मेरा विमुद्रीकरण अर्थात मुझे हमेशा के लिए बंद करने जिसे आम भाषा में नोटबंदी कहते हैं, उसकी घोषणा कर दी है। मेरे साथ साथ मेरे छोटे भाई ₹५०० को भी बंद करने की घोषणा किए। उनका वक्तव्य रात को ८:०० बजे सार्वजिनिक और व्यक्तिगत मीडिया चैनलों के द्वारा दिखाया और सुनाया गया। इस घोषणा में ८ नवंबर २०१६ की आधी रात से देश में मेरा अस्तित्व पूर्णतयः समाप्त हो जाएगा। इसका उद्देश्य केवल काले धन का नियंत्रण करना ही नहीं था बल्कि जाली नोटों से छुटकारा पाना भी था।

मेरे बंद होने के साथ ही साथ सरकार ने घोषणा की कि ३१ सितंबर २०१६ तक नोट को बदला जा सकता है और एक दिन के अधिकतर रु. ५००० ही बदल सकते हैं। इसका असर आम जनता से लेकर अमीर उद्योपति और राज्य और देश की अर्थव्यवस्था पर पडी। जहाँ एक तरफ आम जनता, किसान परेशान हुए थे वहीं देश के टैक्स चोर ने मुझे नदी, नालों में फेंक दिया तो कोई जला दिया। कहीं लोग पंक्ति में लगकर अपनी जान गँवा दिए तो कहीं लोगों के पास इतना अधिक था कि उनकी जान चली गई। यह सब दृश्य




देखकर मुझे बहुत बुरा लग रहा था। मुझे तकलीफ हो रही थी मैं आम जनता के लिए कुछ नहीं कर पाया।

अंततः यही कहूँगा कि मुझे जब पहली बार लाया गया तो मुझे बहुत खुशी हुई थी। लेकिन समय के साथ मेरा दुरुपयोग धर्म नकली करने मुझे उतना ही अधिक दर्द भी दिया है।

शायद ! मेरा बंद होना उचित ही था।

# काला टीका

**रंजना चौबे**
(पीएच.डी.) हिंदी शोधार्थी

एक दिन अचानक मेरी नजर उस पर पडी
हाँ उसी पर
जो बन्द, शांत और एकांत
एकदम वीरान
डर से सिक्त
और जनमानस से रिक्त
हाँ
संवेदनविहीन जनमानस से रिक्त

गली के कोने में
एकदम सहमा-सिसका
भूख से बेहाल
अपनी फटी पोटली निहार रहा था।
इस आस में की उसकी भूख मिटाने के लिए कुछ मिल जाएगा।

और एकाएक
मैं भी देखने लगी
उसकी पोटली में ाखिर है क्या....
जो वो इतनी तल्लीनता से निहार रहा है।

और जब पोटली की दशा देखी तो
मैं वाकई हैरान रह गई
उसकी पोटली में भरी थी
चंद बासी रोटियाँ
थोडे चावल
और सडी सब्जी
जिस पर धावा था सडन और फफूँद का।
मैं उस पोटली को देख स्तब्ध
निश्तेज और परेशान हुई

वाकई परेशना
और वो गरीब, लाचार भूखा, बेबस...
खुश था और खुश हो भी रहा था कि
उसके पास अब भी कुछ खाने को
अपनी भूख मिटाने को है।
और
मैं खड़ी सोचती रही
इसकी भूख ताजा है या बासी खाना

और फिर एक पल को
मेरी सोच रुकने लगी
विचार डगमगाने लगे
शब्द काँपने से लगे
दिल सहम गया और
यूँ लगा की वक्त ठहर सा गया है।

क्योंकि मै हैरान थी
उस भूखे की 'भूख' देख
वह बेसुध हो बडे चाव से खाने को खा रहा था।
अपनी बेबस तडपती भूख को मिटा रहा था।
शायद यही है उसकी भूख का सच

रोटियों की सडन और बासीपन से भी
कहीं अधिक ताजी और छटपटाती है उसकी भूख।
इसलिए उस बासी खाने में भी उस सुख की अनुभूति हुई।
और उस दिन लगा
जैसे इस बन्द गली के कोने में
मानवता के कई तार
संवेदना और परोपकार
दया और करुणा से रिक्त होकर
कई परतों की कब्र में बन्द हों गए।
जिन्हे तोडना इस बेबस की बात नहीं।
ये बासी रोटी इनके जीवन का सच और समाज का काला टीका
हाँ, काला टीका बनकर रह गई है।

# गाँधी : सिध्दान्त और विश्व कल्याण

**डॉ. मोहसिन खान**
स्नातकोत्तर हिन्दी विभागाध्यक्ष एवं शोध निर्देशक

जब भी विश्व को शांति, अहिंसा और मानवता की गहन आवश्यकता महसूस होगी, सहज ही गांधी जी के विकल्प के अतिरिक्त विश्व को कुछ अन्य सुझाई नहीं देगा। जैसी मानवता की सेवा गांधी जी के यहाँ मौजूद है,वैसी आधुनिक महान चरित्रों और व्यक्तित्वों के यहाँ एक साथ कम देखने को मिलती है। जिस तरह का अनुशासित व्यक्तित्व गांधी जी ने स्वयं के लिए निर्मित किया, वैसा उदाहरण कोई दूसरा उनके समय में देखने को नहीं मिलता है। वो पहले खुद को बनाते हैं, फिर दूसरों से वैसा बनने की अपेक्षा रखते हैं। इस तर के कई उदाहरण हमें गांधी वाङ्मय में सहजता से प्राप्त हो जाते हैं। इसीलिए महात्मा गाँधी व्यक्ति, विशेष व्यक्तित्व के साथ सम्पूर्ण युग का नाम हैं, ये नाम केवल भारत की सीमाओं में ही आबध्द नहीं, बल्कि वैश्विक स्तर पर प्रमुख हस्तियों में अपनी विशिष्ट और अनूठी पहचान रखता है। गाँधी जी के व्यक्तित्व को समझने के लिए बाँस की नोक से होकर उसकी जड़ों तक जाना होगा, जिस तरह बाँस के कई पौर होती हैं वैसे ही गाँधी जी के व्यक्तित्व के कई आयाम हैं। उनके व्यक्तित्व के समस्त आयाम इतने साफ-सथरे, सहज और जमीनी हैं कि उसमें किसी भी तरह की न तो कृत्रिमता है और न ही कोई कठिनता है। जैसे वे स्वयं के लिए था वैसे ही सबके लिए दिखाई देते हैं। खुलापन इतना कि अपनी आत्मकथा 'सत्य के प्रयोग' के माध्यम से अपनी अभिव्यक्ति को बिना किसी अंकुश के भीतरी बाहरी समस्त गोपनीयता को सहज रूप में उजागर कर सबको आश्चर्य में डाल देते हैं। उनके भीतर इस बात का न तो भय ही था और न ही भ्रम ही था कि मेरी अभिव्यक्ति को सम्पूर्ण विश्व किस दृष्टि से ग्रहण करेगा? अपनी बेलौस आत्मभिव्यक्ति से वे इस रुप में सिध्द हो जाते हैं, कि एक व्यक्तित्व निजी होते हुए भी सबका है, सबका होते हुए भी अपना है और अपना होते हुए भी मानवजाति के उध्दार का प्रतिनिधी है।



व्यक्ति का व्यक्तित्व किसी एक चीज से बना या निश्चित साँचे में ढला हुआ नहीं होता है, वह बहुत सारे पक्षों को ग्रहण करके चलता है, उसमें परिवर्तन और विकास होना स्वाभाविक है, जो परिवर्तनों को स्वीकार नहीं करता वह रूढ़ होकर सीमाओं में आबध्द हो जाता है और वह अविकसित, अप्रगतिसील ही रह जाता हैं। गाँधी जी का व्यक्तित्व परिवर्तनों के महामार्ग को लेकर चलता है और उसी कर्मठता को प्रदर्शित करता है, जिसके कुछ अंश कोई भी व्यक्ति ले तो शांति और उन्नति के धरातल पर मानवीय उत्थान के लि सहायक सिध्द हो। स्वानुशासन या अनुशासन गाँधी जी का प्रमुख और प्रिय सिध्दान्त रहा, जिसने उनके व्यक्तित्व को सबलता के साथ निर्णय लेने की अपार क्षमता के विकास में सहायता प्रदान की। उनके आत्म-अनुशासन प्रिय होने के कई किस्से हैं, जो यत्र-तत्र बिखरे पडें हैं। अनुशासन चाहे दैहिक हो या आत्मिक वह हर स्तर पर उसका पालन करते हुए नजर आते हैं, ऐसा नहीं कि उनसे अनुसासन टूटता नहीं है, वे भी सामान्य मानव की तरह अनुशासन की सीमाओं को तोड देते हैं या टूट जाती हैं, तो वे टूटे हुए अनुसासन को ठीक करने के लिए स्वयं को सजा भी देते हैं और उसपर कायम रहने के लिए पुनः दृढ प्रतिज्ञा भी लेते हैं। उनके कठोर अनुशासन के पालन के कारण सबमें भ्रम हो जाता है कि गाँधी अभिमानी और अडियल व्यक्ति हैं, उनके भीतर लचीलापन नहीं। यह बात सत्य है कि अनुसासन और लचीलापन दो विरोधी मूल्य हैं, जो गाँधी जी में एक साथ देखे जाते हैं। लचीलापन भी गाँधी

जी के भीतर है, उसकी स्थिती हमें कई अवसरों और निर्णयों पर देखने को मिलती हैं, परंतु अनुशासन का भाग गाँधी जी के हिस्से में अधिकता से देखा जा सकता है। यह अनुशासन ही था जिसमे राष्ट्र-नेतृत्व की कमान संभाली यदि अनुशासन की सत्ता गाँधी जी के भीतर न होती तो निर्णय लेने में इतनी दृढता कहाँ से आती। सम्पूर्ण राष्ट्र की स्वतन्त्रता का सपना, बड़ा और असमाप्त होने वाला संघर्ष, गुलामी का बढ़ता दबाव, जनता का दो गुटों में बंट जाना, आंतरिक विरोधों की असंगतता, विचारधाराओं का मतभेद, मूल्यों की टकराहट, सिध्दांतों की दृढ़ता इत्यादि के भीतरी और बाहरी दबाव, ऊहापोह में गाँधी के पास एक ही सिध्दान्त और मूल्य प्रमुख रुप से नजर आता ही वह है, अनुशासन। उनका संयम, अपरिग्रह और ब्रह्मचर्य का सिध्दान्त भी अनुशासन का संस्कार और पालन वे अपने परिवार द्वारा प्रदाय मूल्यों मे सीखते हैं, वे उसे तोडते भी हैं और तोड़ने के पश्चात उसपर दुखी होकर उसे व्यवस्थित कर पुनः जीवन में अपनाते हैं, यह उनकी प्रायोगिक दृष्टि का परिणाम था, लेकिन इस प्रयोग में अनुशासन और भी ग्रहण करने योग्य बन जाता है, अनुशासन का मूल्य टूटता नहीं, बल्कि और भी सबल हो जाता है।

धर्म और संप्रदाय की अभेद्य दीवारों और संकीर्णता को गाँधी जी ढहा देते हैं और ऐसा खुला मंच निर्मित करते हैं जहाँ हर संप्रदाय, हर धर्म का व्यक्ति एक साथ समता के तहत उपस्थित हो। इसीलिए वे नरसिंह मेहता का भजन आत्मसात करते हैं- ''वैष्णव जन तो तेने कहिए जे पीर पराई जाने रे।'' धर्म उनके लिए बहुत अर्थ रखता है, धर्म को वे जीवन में प्रमुखता देते हैं, धर्म को वे सद्मार्ग का प्रतीक मानते हैं, धर्म को मान जाति के उध्दार का कारक मानते हैं, धर्म को वे सबलता और शक्ति का आत्मविश्वास स्वीकारते हैं, धर्म के पथ पर वे आगे बढते हैं और दूसरों को भी प्रेरणा देते हैं। उन्होंने धर्म को संकुचित अर्थों में कभी ग्रहण नहीं किया इसीलिये व अपने समय में प्रत्येक धर्म का गहराई से अध्ययन करते हैं और सम्पूर्ण निचौड में वे पाते हैं कि अध्यात्म के मार्ग भले ही अलक-अलग हों परंतु परमात्मा एक ही है। उनके भीतर परमात्मा निर्गुण-सगुण दोनों रूपों में उपस्थित होता है। गाँधी जी जितने बहिर्मुखी हैं उतने ही अंतर्मुखी भी थे, बाह्य संघर्ष की शक्ति उनके आंतरिक, आत्मिक विकास की सबलता का ही परिणाम था। वे भीतरी तौर पर अपनी शक्ति का संचयन अपने अध्यात्म पक्ष से ग्रहण करते हैं और राष्ट्र के दीर्घ-संघर्ष में प्राण फूंकते है। उनका व्यक्तित्व भीतरी और बाहरी दोनों रूपों में सबल और संपूर्णता के निकट इसीलिए दिखाई देता है कि विश्व के धर्मों और संप्रदायों की समस्त अच्छी बातों और मूल्यों को एकसाथ ग्रहण करते हैं। उनकी दृष्टि मूल रुप से समन्वयवादी थी, इसी कारण वह प्रत्येक धर्म और संप्रदाय के लिए ग्राह्य बन सके। समन्वयी दृष्टि के कारण वह कई प्रकार के मूल्यों को प्रयोगों के आधार पर अपने में समायोजित करते हैं और जीवन में खुले रुप में उनको स्वीकार करते हुए समन्वय की विराट भूमि का निर्माण करते हैं।

अहिंसा का मूल्य गाँधी जी के जीवन मूल्यों में सबसे ऊपर नजर आता हैष वे दैहिक हिंसा के साथ वैचारिक हिंसा का प्रतिरोध करते हैं और सदैव इस बात का भी ध्यान रखते हैं कि उनसे किसी भी तरह की मन, वचन कर्म से हिंसा न होने पाए। हिंसा-अहिंसा के पक्ष पर वे विधेयवादी और निषेधवादी नजर आते हैं। इनके इसी दृष्टिकोण के कारण उनसे समय के प्रमुख व्यक्तियों ने उनका खुलकर विरोध किया और अपने समर्थन को न देने के साथ उनके मार्ग में बाधाएँ उपस्थित कीं. लेकिन हुआ क्या, विजय अहिंसा और शांति की हुई। वे अहिंसा की परिधि में स्वयं के व्यक्तित्व को दृढ करने के साथ अपने अनुयायियों को भी इस मार्ग पर चलाने के लिए प्रोत्साहित करते हैं और लोग प्रोत्साहन पाकर इस मार्ग पर आगे बढ़ते हैं शांति के समर्थन मे ं अपने मतों को रखते हैं। सात्विक भोजन करना उनके अहिंसा के सिध्दान्त का अभिन्न अंग था, वै सदैव सजग रहते थे कि उनके कर्म से किसी भी प्रकार की हिंसा न हो सके, राष्ट्र के इतने बडे संघर्ष को वे अहिंसा के माध्यम से जीत जाते हैं और सम्पूर्ण विश्व आश्चर्य में पड़ जाता है, कि इतना बारुद, इतने हथियार, इतनी सेना सब के सब अहिंसा के सिध्दान्त के समक्ष बौने सिध्द हो गए। वास्तव में महात्मा बुध्द, महावीर के पश्चात अहिंसा का कोई प्रबल समर्थक है, तो वह है गाँधी, अहिंसा का बडा पालक और प्रतिनिधि व्यक्ति कोई है तो केवल नजर आता है, वह गाँधी है। गाँधी जी ने अहिंसा के सिद्दान्त को अपनाकर आधुनिक विश्व को यह जता दिया कि दो महायुध्द विश्व में केवल विनाश ला सकते हैं विकास तो अहिंसा के मूल्य से ही संभव हो सकता है। वैश्विक महाशक्तियों की आँखे गाँधी जी अपने अहिंसा के सिध्दान्त और मूल्य से खोल देते हैं तथा सिध्द कर देते हैं मानवजाति की उन्नति और विकास का एक ही मार्ग है, वह है - अहिंसा और शांति का मार्ग। गाँध जी के अहिंसा के सिध्दान्त की नींव में शांति की भी आधारशिला है, शांति गाँधी जी का प्रमुख लक्ष्य था और ये लक्ष्य भी संकुचित नहीं, बल्कि व्यापक और उदार था। शांति केवल अपने राष्ट्र तक सीमित नहीं थी, वरन वह सम्पूर्ण विश्व स्तर पर प्रत्येक मानव के लिए, उसके विकास, उन्नति और प्रगति के लिए थी।

सत्य गाँधी जी के लिए एक बल और आत्मविश्वास का पुंज है, वह सत्य के आधार पर ही ब्रिटीश साम्राज्य से टकरा जाते हैं और लोहा लेते हैं। सत्य का पक्ष उन्हें अपनी वकालत के समय निर्बल और कुचला हुआ लगा तो वह वकालत त्याग देते हैं और एकांगी रुप में सत्य को अपना लेते हैं। सत्य ही उनकी भीतरी और बाहरी शक्ति

बनकर उभरता है और एक लंबा संघर्ष वह आंतरिक और बाह्य रूप में करते हैं। सत्य के बल पर ही वह अपने जीवन के असत्य और निर्बल पक्षों को भी उजागर कर देते हैं। यदि यह शक्ति उनके पास न होती तो वह क्षीण-काया का व्यक्ति इतना सशक्त और दृढ रूप में हमारे समक्ष उपस्थित न होत पाता। गाँधी जी अपने निजी जीवन में सत्य के पक्ष को दर्शाने के साथ सार्वजनिक जीवन में भी खुलकर अभिव्यक्ति प्रदान करते हैं। वे सत्य के उस रूप को उद्धाटित कर जाते हैं, जो कि कभी-कभी बडे और सफल व्यक्ति अपनी सफलता को बनाए, बचाए रखने तथा अपनी छवि को साफसुथरा रखने के लिए छिपा जाते हैं। गाँधी जी ठीक इस बात के विपरीत नजर आते हैं वे अपने सत्य को छिपाते नहीं है, बल्कि उजागर करते हैं और उनके उजागर से लोगों को सत्य मार्ग की प्रेरणा भी प्राप्त होती है। बचपन की चोरी की घटना और सत्य के पक्ष को ग्रहण करना उनके जीवन की एक महत्वपूर्ण घटना के साथ सत्य के मूल्य को उनके मन में सदैव के लिए स्थापित कर जाती है। गाँधी जी अपने जीवन में नैतिकता को महत्व देते हुए उदार हो जाने की बात का समर्थन करते हैं, वे दर्शाते हैं कि विरोध का विरोध से समाप्त नहीं किया जा सकता है, बल्कि बुराई को अच्छाई के साथ जीता जा सकता है। वे बुरा मत देखो, बुरा मत कहो, बुरा मत सुनों के एक सामान्य किन्तु सशक्त मूल्य को अपनाते हैं और समस्त प्रकार की नकारात्मक ऊर्जा से अपने को और दूसरों को बचा लेते हैं। उनसे लिए सदाचार का मार्ग ही केवल एक उपयोगी मार्ग है, जिसपर वे निरंतर चलते रहे और अपने साथ उन तमाम पीडित, शोषित और दलित जन को लेकर आगे बढते हैं, जिनके अस्तित्व पर प्रश्न चिहन लगा हुआ है। अस्पृश्यता के बडे फासले को अपने कर्म से मिटा देते हैं और प्रत्येक व्यक्ति को हरि का जन मानते हुए उसके प्रति संवेदनशील और मानवीय बने रहते हैं।

गाँधी जी का व्यक्तित्व इतना विशाल और व्यापक है, कि उसके शब्दों की सीमाओं में बांधना बडा कठिन हो जाता है, उनसे समस्त मूल्य भारतीय धर्म, अध्यात्म, संस्कृति की सतह से जुड़े हुए हैं। सबसे बडा कोई मूल्य उनके भीतर नजर आता है तो वह है - मानवीयता का मूल्य। मानवीयता के कारण ही वह मनुष्य को मनुष्य रुप में देखने के पक्ष में खडे होते है और इसी कारण उनमें समत्व का भाव भी जन्म लेता है। इसी समता के कारण वह चतुर्वर्णों की परंपरा को भी चुनौती देते हैं। उनके लिए मानव सिर्फ मानव है, न कोई बड़ा है और न ही कोई छोटा, न तो कोई सवर्ण है और न ही कोई क्षुद्र है। उनके भीतर सबको स्थान मिला हुआ था वह किसी भी पक्ष को अनदेखा कर उसे उपेक्षित नहीं करते, बल्कि संतुलित न्यायिक दृष्टि से उसे ग्रहण करते हैं। वह चाहे जीवन का प्रश्न हो, राष्ट्र की स्वतन्त्रता का प्रश्न हो या कि भाषा का प्रश्न हो। भाषा की दृष्टि से वे इस मत के सबल पक्ष में थे कि भारत में हिंदुस्तानी भाषा सभी वर्गों, मानवीय समुदायों की प्रतिनिधि भाषा समन्वय केरुप में स्थापित हो सके। उनकी दृष्टि साफ थी कि भारत बहुभाषी राष्ट्र है और भाषा के प्रश्न पर भावनात्मक रूप से कई विवाद और समस्याओं का सामना होगा, इसीलिए वे हिंदुस्तानी भाषा की स्थापना का प्रबल समर्थन करते हैं। परंतु स्वतन्त्रता के पश्चात राष्ट्रभाषा के चल रहा है। इसी के साथ ही गाँधी जी के आर्थिकता को केन्द्रित सिध्दान्त को भी देखना उचित होगा, वे भारत का प्राण ग्राम और ग्रामीण जनता को स्वीकारते हैं और ग्राम-उध्दार के लिए लघु-उद्योग, स्वदेशी वस्तुओं का निर्माण तथा उपयोग इत्यादि पर बल देते हुए उसे पूर्ण रूप में स्थापना दिलाने का प्रयास करते हैं। इसी तहत उनका चरखा एक प्रतीक के रूप में उभरकर समक्ष आता हैं और दर्शाता है कि भारत की गरीब जनता के हाथों में काम है, वह बेरोजगार और लाचार नहीं। उनकी ग्राम रोजगार योजना लघु और कुटीर उद्योगों के बढ़ावे पर अश्रित है, और उस योजना से आर्थिक स्वावलंबन का सीधा संबंध दृष्टिगोचर होता है। गाँधी जी के विचार स्वराज के विचार थे ताकि लोकतन्त्र की व्यवस्था अपने सुचारु रूप में बहाल हो सके, स्वराज तो आगया, परंतु राज कुछ हाथों तक ही सीमित रह गया। फिर भी गाँधी जी की ग्राम स्वराज योजना, सत्ता विकेंद्रीकरण की योजना आज भी जनतंत्र की सबलता और सफलता का प्रमाण माना जाना चाहिए। गाँधी जी के सिध्दान्त और मूल्य वास्तव में भारतीय परंपरा से उपजे और ग्राह्य मूल्य हैं, वे स्वयं किसी मूल्य का निर्माण नहीं करते, बल्कि वे मौजूदा सिध्दान्तो और मूल्यों का अनुपालन दृढता के साथ करते हैं, भले ही आज गाँधी जी हमारे समक्ष दैहिक रुप में न हों परंतु मूल्यों के रूप में वह हमारे साथ निरंतर अटूट रुप में बने हुई हैं, आज भारत ही नहीं; बल्कि सम्पूर्ण विश्व को गाँधी जी के समर्थित मूल्यों और सिध्दान्तों की गहन आवश्यकता है, ताकि इन मूल्यों और सिध्दान्तों के माध्यम से वैश्विक उन्नति, प्रगति, विकास के साथ मानवीयता को अपनाते हुए वैश्विक-शांति को कायम कर सकें। विश्व जिस मार्ग पर दृढता से आगे बढ रहा है, वह मार्ग हिंसा का मार्ग है। ऐसे में गाँधी जी का अहिंसा का संदेश पूरे विश्व को असीम शांति, समानता, बंधुत्व और करूणा का संदेश प्रसार करने वाला है। जिस दिन विश्व इस मार्ग पर दृढ़ता और संकल्प से आगे बढेगा उसरोज ये पृथ्वी किसी स्वर्ग की कल्पना से दूर नहीं होगी। बस शर्त यही है कि विश्व को गाँधी सिध्दान्तों का अनुपालन अपनी अनुशासनिक नीतियों ते तहत करना होगा और किसी भी तरह के मद से दूर रहते हुए स्वयं को विनम्र, उदार, सेवक और मानवीय बनाना होगा।

# Does. Mass Media Really.. Spoils the Students?

**Kunika Sushil Mhatre**
S.Y.J.C.

What is mass media? Mass media can be a lot of things it can be T.V., Radio, Magzines and etc. but the most popular forms of mass media are T.V. and Radio. Mass media is just ways for something to reach a large amount of people. Radio was the first major form of mass media. But now a days there are so many sources of mass media.



We all know that T.v. programs provide us with the current events and news they are going all around the world. But when the news or events are shown on the T.V. students get attracted by the scenes shown in it. And after some days they become the part of it. However it is already a fact that this same events are interpreted and shown differently in different countries. But students should know this thing which is important for them that before this events are shown on T.V. they are altered in order to satisfy somebody needs.

This mass media have on positive as well as negative effects on students. If we see to positive side then movies, T.V. programes, videos games and print media expose students to cultures and experiences for outside from their daily routines. This sort of cultural awareness can breakdown harries and encourage more global acceptance in students.

On the negative side we can see that this same media sources can desensitize students minds to scenes of violence and criminal behavior, by influencing their sense of right and wrong. Then now-a-days large percentage of students are spending several hours a day playing video games, watching T.V. or chatting with friends online. Rather than exploring towards the beauty of nature of playing outdoor games.

Students are not using their minds because they know that they can get all the things readly available by using the sources of mass media. The conversation or the interaction between the parents and children or teachers and students are decreasing due to the mass media. Instead of discussing their problems with parents or teachers they take the help of mass media. Which creates a communication gap between them. They think that mass media is the write solution for their problems but it is not so. They don't realised it that moment.

So it is really important that parents should teach their children the good things of mass media from the childhood stage.

So we can't say that mass media spoils the students. Infact it is upto the students how seriously they see towards it. They have to know their limits itself.

# Democratic Election And Good Governance

**Kunika Sushil Mhatre**
S.Y.J.C.

The elections are the most important time for both citizens of our country and the politicians. A free and fair election guarantee the trust of the citizens in the elected government. As we all know, democracy is defined as "a government of the people, for the people, and by the people."

No matter what type of elections are being done in a country, they represent a direct expression of citizen's participation in democratic process. People of that country participate in elections and choose their representatives in the government. For such reason, people should take the decision of voting very seriously.



Democratic elections are competitive. Opposition parties and candidates must enjoy the freedom of speech, assembly and movement necessary to their voice criticisms for the government openly and to bring alternative policies and candidates to the voters.

India, USA, UK, France, Germany, Pakistan, Treland, South Africa, Poland, Norway, Sweden, Switzerland, Greece, Italy, Nepal and many more countries have adopted the democracy in their countries.

As India, is one of best democratic country in the world the constituent Assembly adopted the constitution of India, drafted by a committee headed by Dr. B. R. Ambedkar, on 26 November 1949. India became as sovereign democratic republic after its constitution came into effect on 26 January 1950.

Conceptually, a dome of democratic administration seems like a contradiction in the terms 'People's Government' may be a rhetoric but popular administration without corruption and public grievances. Very well-ment administrators would call it a democratic administration if it confirms the laws, rules and procedures.

The Indian constitution and Indian Policy followed there philosophy till 1991 and the 21st century opens with a band asking for full throated democracy at all walks of public life. This end of the endless transition is a metamorphosis and democratic administration is being asked for and is emphatically asserted as an end of native colonialism, which was not a fact in a european experience.

One of the primary characteristics of democratic administration is organised action. Prof. Appleby opines that "Persons in high poisition must have a sense of action. They must try to get things done." The motto of the ruling government should be to provide service of any cost, not power at any price. To transform society from its relatively under developed social, cultural and political conditions to a well developed social, cultural and political conditions to a well developed polity, the transformation must be planned one, in which, it is the business of government to be the principal planner, energaiser, promoter and director of accelerated development efforts.

Democracy cannot flourish in the absence of good governance. The pre-condition for good governance is effective democratic institutions for democratizing in the society. Improvement of the living standard of people cannot happen where



# Real Meaning of Success In my Life

**Jeffin Koshy John**
F.Y.B.Sc. IT

In our day to day life wi meet lot of new people. We interact with them and come to know about their ambitions, goals and ideas related to achieving money or success in their life. Some people think that having luxurious lifestyle or achieving log of money means success. But for me it s not so.

Money is important thing in our life but it is not more important than the life of a person or a time which has been passed. We know that coin has two sides like that only earning money has two sides one is earning easy money and other is earning success with money. Therefore earning a lot of money means not a success. A success is one which is achieved by the knowledge, talent, skills and efforts. It cannot be bought from the market.

According to me how my goal is achieving good marks is HSC exams and make my parents happy. And it is only the success for me. Having good behavior, relations, communications with parents, family members, teachers, friends and other members of the society means success. By keeping inspiration of famous personality Dr. Prakash Baba Amte and helping others would also be a success for me. Then doing well done job, staying along with the parents and having good personality in the society will also be a true success for me.

So now it is in our hands to choose which money we have to refer easy money or money with success. Because we losses so much of precious time and moments or sometimes relations also in our life while running towards achieving the money. So achieving our goals and ambitions in our life should be our dream than earning easy money and wealth by different ways. Because money cannot be preserved for a long time it will get finished after few days but success and relations which we have achieved will always be helpful for us till the end of our life.



।। उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत ।।

जनता शिक्षण मंडळाचे,

# कै. नानासाहेब कुंटे शैक्षणिक संकुल

श्रीमती इंदिराबाई जी. कुलकर्णी आर्टस्, जे. बी. सावंत सायन्स आणि सौ. जानकीबाई धोंडो कुंटे कॉमर्स कॉलेज

कनिष्ठ महाविद्यालय, अलिबाग-रायगड

## वार्षिक अहवाल शैक्षणिक वर्ष २०१९-२०

जनता शिक्षण मंडळाच्या कै. नानासाहेब कुंटे शैक्षणिक संकुलातील आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स ज्युनिअर कॉलेज अलिबाग रायगड. आमच्या कनिष्ठ महाविद्यालयाची चौथ्या दशकपूर्तीकडे यशस्वीपणे वाटचाल सुरू आहे. सन २०१९-२० या वर्षातील कनिष्ठ महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीचा आणि शिक्षणेतर उपक्रमांचा वार्षिक अहवाल मांडताना विशेष आनंद होत आहे.

**शैक्षणिक अहवाल:-**

आमच्या कनिष्ठ महाविद्यालयात कला आणि विज्ञान या रूढ अभ्यासक्रमांबरोबरच माहिती तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक्स या व्यावसायिक विषयांचे यशस्वीपणे अध्यापन केले जात आहे. कनिष्ठ महाविद्यालयात कला आणि विज्ञान शाखेतील अनुदानित आणि विनाअनुदानित वर्गांचे मिळून एकूण ६२८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.विज्ञान शाखेत ४६२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. विज्ञान शाखेतील विनाअनुदानित तुकड्यांमध्ये एकूण ८६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

विज्ञान शाखेतील कु. खुंडोल स्वागत भालचंद्र गिता हा विद्यार्थी एच.एस.सी. परीक्षेत फेब्रु. २०१९ मध्ये ८४.१५ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. कु. सिंग सुजित सुरेंद्र लक्ष्मी हा ८२.८२ टक्क गुण मिळवून महाविद्यालयात द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला. तर कु. ठाकुर ऋषिकेश नरेंद्र विजया हा ८२.६२ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात तृतिय क्रमांकाने उत्तीर्ण झाला. तसेच ११ वी इयत्तेत कला शाखेत कु. कहाणे निशांत भारत सुनिता हा विद्यार्थी ९०.४६ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला व कु. शेख सारिका सनिर मामोनी ही ८९.६९ टक्के गुण मिळून द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. तसेच कु. जाधव शुभम सुशिल शितल हा विद्यार्थी ८९.२३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला.

कला शाखेतील कु. झिंजे श्रेयस सुनिल स्नेहल हा विद्यार्थी एच.एस.सी. परीक्षा फ्रेब्रु. २०१९ मध्ये ७८.३१ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला व कु. थळे स्वरश्री रविंद्र राधा ही ७६ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. तर कु. चव्हाण नम्रता प्रकाश जयश्री ही ७४.७७ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात तृतिय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. तसेच ११ वी इयत्तेत विज्ञान शाखेत कु. वैशंपायन श्रध्दा देवानंद पूजा या विद्यार्थिनीने ९३.८५ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला व कु. कदम पूर्वा विजय अंकिता ही ८८.७७ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. तसेच कु. बैकर मनस्वी रंजित शर्मिला ही विद्यार्थीनी ८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

**नेत्रदीपक यश :**

भारत सरकारच्या 'डिपार्टमेंट ऑफ सायन्स टेक्नॉलॉजी' मार्फत महाराष्ट्र परीक्षा मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या एच.एस.सी. परीक्षेत उत्तम यश संपादन केलेल्या १० टक्के विद्यार्थ्यांना 'इन्सापयर स्कॉलरशिप' म्हणून प्रतिवर्षी प्रत्येकी रु. ८०,०००/- इतकी रक्कम दिली जाते. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील एकूण ०५ विद्यार्थी या शिष्यवृत्तीस पात्र ठरले. या सर्व विद्यार्थ्यांचा आम्हाला विशेष अभिमान आहे.

**परीक्षेच्या निकालाची टक्केवारी :**

शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मधील शाखानिहाय वर्गांच्या निकालाची टक्केवारी पुढील प्रमाणेः

| कला शाखा | टक्केवारी | विज्ञान शाखा | टक्केवारी |
|---|---|---|---|
| इ.११वी | ९७.६१ | इ. ११वी | ९७.६६ |
| इ. १२वी | ५३.३३ | इ. १२वी | ७२.४२ |

**क्रीडा स्पर्धांमधील नैपुण्य :**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या धोरणानुसार व जिल्हा क्रीडा परिषद, रायगड यांच्या नियोजनानुसार घेतल्या गेलेल्या वैयक्तिक व सांघिक क्रीडा प्रकारात जे.एस.एम. कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन उत्तम खेळाडू होण्याचा प्रयत्न केला आहे.

**शालेय मैदानी स्पर्धेत येश :**

नेहुली येथील जिल्हा क्रीडा संकुलात पार पडलेल्या जिल्हा स्तरीय शालेय मैदानी स्पर्धेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले. या स्पर्धेत कनिष्ठ महाविद्यालयातील १९ वर्षे वयोगटात मुलींमध्ये श्रुती संतोष अडित हिने गोळाफेक व थाळीफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला तर ऋचा आशिषकुमार पाटील हिने ८०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक आणि क्रॉस कंट्री स्पर्धेत सहावे स्थान पटकावले हे खेळाडू विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरले.

**विभागीय व राज्यस्तरावरील यश :**

राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत कु. अथर्व प्रशांत श्रीवर्धनकर (इ. ११वी, सायन्स) या विद्यार्थ्याला सिल्व्हर मेडल मिळाले. तर विभागीय कराटे स्पर्धेत कु. समय मुन्ना पटेल (इ. ११ वी, सायन्स ) हा विद्यार्थी सहभागी झाला. विभागीय मैदानी स्पर्धेत कु. श्रुती संतोष अडित (१२ वी, सायन्स) हिने थाळीफेक स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला तर गोळाफेक स्पर्धेत सहभागी झाली. कु. ऋचा आशिषकुमार हिने क्रॉसकंट्री स्पर्धेत १० वे स्थान प्राप्त केले तर ८०० मीटर व १५०० मीटर स्पर्धेत सहभागी झाली.

विभागीय थ्रोबॉल स्पर्धेत मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक मिळवला. तर जिल्हास्तरीय थ्रोबॉल स्पर्धेत मुलींच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळवला. जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत कु. जयदीप जितेंद्र राऊळ याला द्वितीय तर शिकाई मार्शल आर्ट स्पर्धेत कु. संतोषी नारायण थिटे हिला द्वितीय क्रमांक मिळाला.

शालेय जिल्हा स्तरीय स्पर्धेत क्रिकेट, थ्रोबॉल या सांघिक खेळात तर बॅडमिंटन, चेस, कराटे या वैयक्तीक स्पर्धेत विद्यार्थी सहभागी झाले. तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत मुले - मुलींचा संघ व खो-खो खेळाचा संघ सहभागी झाला. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाविद्यालयात तालुकास्तरीय हॉलिबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सर्व खेळाडूंना कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडाशिक्षक बी. आर. गुरव यांचे मार्गदर्शन लाभले.

**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेच्या विषयांचे जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिर :**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ वाशी, नवी मुंबई आयोजित इयत्ता ११ वी व १२ वी सुधारित आराखडा व मूल्यमापन योजनेचे कला व वाणिज्य शाखेचे रायगड जिल्हास्तरीय प्रशिक्षण दि. २५ सप्टेंबर, ३ ऑक्टोबर २०१९ या कालावधीत जे.एस.एम. महाविद्यालयात संपन्न झाले. या प्रशिक्षमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते झाले. सौ. व्ही. एस. एरंडे मॅडम यांनी केंद्रसंचालक म्हणून काम पाहिले.

या प्रशिक्षण शिबिरात प्रत्ये विषयासाठी स्वतंत्र तज्ञ नेमम्यात आले होते. इंग्लिश विषयाकरिता कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक श्री. जे. डी. पाटील यांनी तज्ञ म्हणून काम पाहिले. या प्रशिक्षण शिबिरात रायगड जिल्ह्यातून इतिहास विषयाच्या ८१, भूगोल विषयाच्या ७३, राज्यशास्त्र विषयाच्या ३८, मराठी विषयाच्या ९६, इंग्लिश विषयाच्या १११, हिंदी विषयाच्या ४८, बुक कीपिंग अकाउंटन्सी विषयाच्या ७५, व्यवसाय संघटन विषयाच्या ६६ आणि चिटणीसाचा व्यापार विषयाच्या ६८ शिक्षकांनी सहभाघ घेतला.

आपल्या किनिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेचे मराठी शिक्षक श्री. प्रविण पाटील, हिंदी शिक्षिका सौ. स्नेहा ठाकूर, इतिहास शिक्षक श्री. बी. आर. गुरव, इंग्लिश शिक्षिका नीलम म्हात्रे, भूगोल शिक्षिका सौ. निलिमा राऊत, राज्यशास्त्र व अर्थशास्त्र शिक्षक श्री. हर्षद टीवळेकर यांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला. या संपूर्ण प्रशिक्षण शिबिरासाठी कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक श्री. पी. ए. पाटील, श्री. एस. के. तानवडे, श्री. डी. एन. गायकवाड, श्री. ए. बी. सावंत, श्री. केदार, श्री. व्ही. व्ही. भामरे, श्री. धोदरे, श्री. स्वप्नील राऊत, सौ. अपर्णा देव, सौ. सुविधा घरत, सौ, एस. यु. गाढे, सौ. कारंडे, सौ. जागृती नाईक, सौ. एम. एन. पाटील, कु. पूजा रानडे यांनी सहकार्य केले.

सायन्स विषयाचे प्रशिक्षण सु.ए.सो. चे ज्युनिअर कॉलेज, कळंबोली येथे पार पडले. आपल्या महाविद्यालयातील सौ. ए.पी. देव (भौतिकशास्त्र), श्री. व्ही.व्ही.भामरे, श्री. एस.एस.राऊत (रसायनशास्त्र), श्री. जयेश पाटील (गणित), श्री. पी.ए.पाटील, सौ.एस.यु.गाढे (जीवशास्त्र) या विषय शिक्षकांनी प्रशिक्षणात भाग घेतला.

**विज्ञान प्रतिकृती निर्मीती राज्यस्तरीय स्पर्धेत उज्वल यश :**

इंडिअन सोसायटी ऑफ रिमोट सेंसींग (मुंबई विभाग) व महात्मा एज्युकेशन सोसायटीच्या 'पिल्लई एच. ओ.सी. कॉलेज ऑफ इंजिनिअरींग व टेक्नॉलॉजी, रसायनी' यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ७ डिसेंबर २०१९ रोजी 'मेव्हरीक' या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना आयत्यावेळी दिलेल्याविषयावर विज्ञान प्रतिकृतीची निर्मीती करायची होती.

या स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयातील इ. ११ वी व इ. १२ वी सायन्स मधील १५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. कनिष्ठ महाविद्यालयातील गटात आपल्या महाविद्यालयातील इ. १२ वी सायन्स मधील विद्यार्थीनी कु. सारीका सनीर शेख, कु. अपूर्वा मनोज थळे व कु. साक्षी संजय पाटील यांच्या 'उर्जा संवर्धन' या विषयावरील प्रतिकृतीला प्रथम क्रमांक मिळाला. या विद्यार्थीनींना प्रथम क्रमांकाचा चषक व रोख पारितोषिक रु. ८०००/- मिळाले. या विद्यार्थ्यांना श्री. मिलिंद धोदरे यांनी मार्गदर्शन केले.

**शैक्षणिक भेट :**

मंगळवार दि. १० डिसेंबर २०१९ रोजी कनिष्ठ महाविद्यालयातील ४० विद्यार्थ्यांनी 'पिंपरी चिंचवड सायन्स सेंटर, पुणे' येथे भेट दिली.

**वक्तृत्व स्पर्धेत दुहेरी यश – जहिरहसन कुरेशी राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी :**

जहिरहसन अयामुद्दीन कुरेशी, (११ वी, विज्ञान) याने 'युवा जागर - महाराष्ट्रावर बोलू काही' अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय-रायगड आयोजित 'महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत जिल्हास्तरीय युवा संसद वक्तृत्व स्पर्धा २०१९' मध्ये प्रथम क्रमांक प्राप्त करत उज्ज्वल यश संपादन केले.

जिल्हा क्रीडा संकुल नेहुली, अलिबाग येथे दि. २७ ऑगस्ट २०१९ रोजी संपन्न झालेल्या या स्पर्धेत जहिरहसन याने हे यश प्राप्त केले. विशेष म्हणजे 'युवा संसद' आयोजित तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत देखील या विद्यार्थ्याने आपल्या वक्तृत्वशैलीने श्रोतृवर्गाची मने जिंकत प्रथम येण्याचा मान मिळवला होता. जे.एस.एम. कनिष्ठ महाविद्यालयाच्याच श्रध्दा वैशंपायन, (१२ वी कला) हिने या स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केला होता. दि. २९ ऑगस्ट २०१९ रोजी विधानभवन, मुंबई येथे झालेल्या राज्यस्तरीय युवा संसद जहिरहसन याने सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांच्या बौध्दिक, शारीरिक आणि मानसिक अशा सर्वांगिण विकासासाठी महाविद्यालयाचे मा. प्राजार्य डॉ. अनिल पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाच्या मा. पर्यवेक्षिका सौ. व्ही. एस. एरंडे, कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी वृंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या उत्कर्षासाठी सदैव कटिबध्द आहेत. त्या अनुषंगाने मा. प्राचार्यांनी इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांकरीता 'इ. १२ वी नंतर पुढे काय' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान घेतले.

अशप्रकारे शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील शैक्षणिक आणि अभ्यासपूर्क उपक्रमांतील यशस्वी कामगिरीची  हा संक्षिप्त लेखाजोखा, धन्यवाद!

## J.S.M. (JR. COLLEGE), ALIBAG-RAIGAD

## F.Y.J.C. ARTS/SCIENCE EXAMINATION MARCH - 2018

### RESULT-SCIENCE FACULTY

| | | |
|---|---|---|
| Total Student Appeared | = | 332 |
| Total Student Passed | = | 322 |
| Passed with Distinction | = | 19 |
| Passed with First Class | = | 88 |
| Passed in Pass Class | = | 83 |

**COLLEGE PASSING PERCENTAGE = 96.38%**

### RESULT-ARTS FACULTY

| | | |
|---|---|---|
| Total Students Appeared | = | 33 |
| Total Student Passed | = | 31 |
| Passed with Distinction | = | 06 |
| Passed with First Class | = | 02 |
| Passed in Pass Class | = | 16 |

**COLLEGE PASSING PERCENTAGE = 93.93%**

## J.S.M. (JR. COLLEGE), ALIBAG -RAIGAD
## H.S.C EXAMINATION MARCH - 2018

### RESULT-SCIENCE FACULTY

| | | |
|---|---|---|
| Total Students Appeared | = | 277 |
| Total Students Passed | = | 235 |
| Passed with Distinction | = | 12 |
| Passed with First Class | = | 57 |
| Passed in Pass Class | = | 20 |

**COLLEGE PASSING PERCENTAGE = 84.84%**

### RESULT-ARTS FACULTY

| | | |
|---|---|---|
| Total Students Appeared | = | 45 |
| Total Student Passed | = | 33 |
| Passed with Distinction | = | 02 |
| Passed with First Class | = | 06 |
| Passed in Pass Class | = | 06 |

**COLLEGE PASSING PERCENTAGE = 73.33%**

# J.S.M. (JR. COLLEGE), ALIBAG-RAIGAD
# STUDENTS STRENGTH OF ACADEMIC YEAR 2018-19

**Grantable Division**

| Sr. No. | Class | Division | Total Students |
|---|---|---|---|
| 1. | F.Y.J.C. Arts | 1 | 42 |
| 2. | S.Y.J.C. Arts | 1 | 31 |
| 3. | F.Y.J.C. Science (I.T. - 50) | 2 | 240 |
| | F.Y.J.C. Science (I.T.- 60) | | |
| 4. | S.Y.J.C. Science (Electronics - 49) | 2 | 211 |
| | S.Y.J.C. Science (I.T. - 54) | | |
| | | **Total** | **524** |

**Non Grantable Division**

| Sr. No. | Class | Division | Total Students |
|---|---|---|---|
| 1. | F.Y.J.C. Science | III | 103 |
| | F.Y.J.C. Science (I.T.- 15) | | |
| 4. | S.Y.J.C. Science | III | 91 |
| | S.Y.J.C. Science (I.T. - 48) | | |
| | | **Total** | **194** |

## INSPIRE SCHOLERSHIP QUALIFIED STUDENT LIST 2018-19

| Sr. No. | Name of The Students |
|---|---|
| 1. | Naik Swaraj Prashant |
| 2. | Samel Sagar Vidyadhar |
| 3. | Patil Gyatri Suhas |
| 4. | Damle Tanishka Shekhar |
| 5. | Chavan Shreedhar Sandeep |

# वरिष्ठ महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल २०१९-२०

**शैक्षणिक आढावा :-**

अलिबाग तालुक्याच्या ग्रामीण भागातील सर्व सामान्य जनेतला उच्च शिक्षणाची दारे खुली करून देणाऱ्या जनता शिक्षम मंडळाचा व महाविद्यालाचा मा. ॲड. दत्ता पाटील (आदरणीय दादा) यांच्या सक्षम नेतृत्वाखाली विकास झाला आहे. सध्याच्या काळात दादांचे सुपुत्र मा. श्री. संजय दत्ता पाटील यांनी संस्थेची धुरा समर्थपणे सांभाळली आहे. मा. श्री. संजय दत्ता पाटील यांच्या कारकिर्दीत महाविद्यालयामध्ये विविध शैक्षणिक व अभ्यासेतर उतक्रम राबवले जात असून शैक्षणिक प्रगतिचा आलेख कायम राखला गेला आहे. सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाचा अहवाल सादर करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

सध्या महाविद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान या पारंपारिक अभ्यासक्रमांबरोबरच संगणशास्त्र, माहिती तंत्रज्ञान, बी. एम. एस इत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. महाविद्यालयास अनिवार्य असणाऱ्या NAAC च्या पुनर्मूल्यांकनाची तिसरी फेरी पूर्ण करून महाविद्यालयाने B Grade प्राप्त केली. चालू शैक्षणिक वर्षामध्ये प्रा. डॉ. एस. ए. कानडे यांच्या नेतृत्वाखाली IQAC कार्यरत असून सन २०१८-१९ चा AQAR NAAC कडे सादर करण्यात आला आहे. मा. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली IQAC मार्फत Academic Audit चा प्रस्ताव मुंबई विद्यापीठाकडे व National Ranking साठी महाविद्यालयाचा प्रस्ताव NIRF कडे सादर केला आहे.

महाविद्यालयातील प्राध्यापकांना अध्यापन करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर प्रभावीपणे करता यावा याकरिता Knowledge Bridge Ahmednagar यांच्या सहय्याने क- Content Development for Effective TEaching यावरील कार्यशाळा दि. १४ सप्टेंबर २०१९ रोजी आयोजित करण्यात आली. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला.

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात वरिष्ठ महाविद्यालयात कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील पदवी आणि पदव्युत्तर अभ्याक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची आकडेवारी पुढीलप्रमाणे -

| | विद्यार्थी | | विद्यार्थिनी | |
|---|---|---|---|---|
| | अनुदानित | विना-अनुदानित | अनुदानित | विना-अनुदानित |
| पदवी | | | | |
| पदव्युत्तर | | | | |

**शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये मार्च/एप्रिल २०१८ मध्ये झालेल्या विद्यापीठ परीक्षांचे निकाल उत्कृष्ट लागले ते पुढीलप्रमाणे**

| | |
|---|---|
| टी.वाय.बी.ए | ७७.५९% |
| टी.वाय.बी.एस्सी. | ७९.८०% |
| टी.वाय.बी.कॉम. | ५६.८८% |
| टी.वाय.बी.एम.एस. | ८५.३२% |
| एम. ए. मराठी | १००% |
| एम. ए. हिन्दी | ८३.३३ |
| एम. एस्सी. | ४७.३७ |

**विद्यापीठस्तरावरील विविध परीक्षांमध्ये खालील विद्यार्थी प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले.**

| | |
|---|---|
| टी.वाय.बी.ए. | पासवान संगीता राजेंद्रप्रसाद |
| टी. वाय. बी.कॉम. | बोडस कौशिक दीपक |
| टी. वाय. बी.एस्सी. | चोगले रुजा अन्सार |
| टी.वाय.बी.एस्सी.आय.टी. | ठाकूर स्नेहा दिलीप |
| टी.वाय.बी.एस्सी.सी.एस. | अहीरराव आसावरी अरुण |
| टी.वाय.बी.एम.एस. | कडवे हर्षला भीमनाथ |
| एम.ए.मराठी | वाणी सुरभी उमेश |
| एम.ए.हिन्दी | कदम मधुरा किशोर<br>म्हात्रे गणेश दत्ताराम |
| एम.एस्सी. | पाटील चैताली मन्मय |

**लोकनेते ॲड. दत्ता पाटील यांचा स्मृतीदिन - गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा :-**

लोकनेते कै. ॲड. दत्ता पाटील तथा दादा यांच्या स्मृतीदिनानिमित्त मंगळवार, दि. २७ ऑगस्ट २०१९ रोजी जे.एस.एम. महाविद्यालयातील कनिष्ठ महाविद्यालय तसेच पदवी आणि पदव्युत्तर स्तरावर विविध विभाग, वर्ग आणि ज्ञानशाखांमध्ये मार्च-एप्रिल २०१९ मधील परीक्षेत प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकाविलेल्या व प्राविण्य प्राप्त केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कारसोहळा महाविद्यालयाच्या वतीने सकाळी ११.०० वाजता कै. जयवंत केळुसकर सभागृहात आयोजित करण्यात आला. सकाळी ठीक १०.०० वाजता जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. संजय दत्ता पाटील, तसेच सेक्रेटरी मा. श्री. अजित शाह यांनी महाविद्यालयाच्या प्रांगणातील ॲड. कै. दत्ता पाटील यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतीस अभिवादन केले.

गुणवतं विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. अनिल पाटील हे उपस्थित होते. व्यासपीठावर उपप्राचार्य मा. डॉ. नीळकंठ शेरे, उपप्राचार्य मा. प्रा. अविनाश ओक, महाविद्यालयाचे ओ.एस.डी. प्रा. सुरेंद्र दातार, कनिष्ठ महाविद्यालय पर्यवेक्षक सौ. वृंदा एरंडे, परीक्षा समिती प्रमुख प्रा. ए. व्ही. जाधव हे उपस्थित होते.

प्राचार्य मा. डॉ. अनिल पाटील यांनी गुणवंत विद्यार्थी व त्यांचे पालक यांचे अभिनंदन केले. लोकनेते ॲड. दत्ता पाटील तथा दादा यांचे जीवन हे सर्वांसाठी स्पूर्तीदायक आहे, विद्यार्थ्यांना यश प्राप्त करण्यासाठी कठोर परिश्रम घ्यावे व शिक्षणाकडे गांभीर्याने पहावे असे प्रतिपादन मा. प्राचार्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले. परीक्षा समिती प्रमुख प्रा. ए. व्ही. जाधव यांनी सन २०१८-१९ च्या शैक्षणिक अहवालाचे वाचन केले.

या प्रसंगी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, भेटवस्तू व रोख रक्कम अशा स्वरुपातील पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या सत्कार सोहळ्यास गुणवत्ताप्राप्त ७६ विद्यार्थी उपस्थित होते. मॉरीशस येथे गणेशोत्सवानिमित्त होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी मुंबई विद्यापीठाच्या संघात निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाची विद्यार्थीनी स्नेहल सुरेश पाटील (TY-IT) हिचा पुष्पगुच्छ, भेटवस्तू व रोख रक्कम देऊन विशेष सत्कार मा. प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांनी तसेच त्यांच्या पालकांनी आपले मनोगत व्यक्त करताना या स्त्युत्य उपक्रमाचे कौतुक केले व या कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल महाविद्यालयाचे व्यवस्थापन, प्राध्यापक, शिक्षक यांना धन्यवाद दिले.

**पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ :-**

महाविद्यालयीन जीवनात खडतर परिश्रम करून पदवीस पात्र ठरल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते पदवी स्वीकारणे हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील एक आनंदाचा व महत्वपूर्ण क्षण असतो. जे.एस.एम. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या अनुभवाचे साक्षीदार होण्याची संधी मिळाली. निमित्त होते पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे! मार्च-एप्रिल २०१८-१९ मधील बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.एम.एस., एम.ए., एम.एस्सी. या परीक्षांमध्ये उत्तीर्ण होऊन पदवी व पदव्युत्तर प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांसाठी पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ दि. १० जानेवारी २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता महाविद्यालयाच्या कै. जयवंतराव केळुसकर सभागृहात संपन्न झाला.

जनता शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष मा. ॲड. गौतम पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. ॲड. गौतम पाटील, मा. प्राचार्य, उपप्राचार्य, सर्व विभागप्रमुख, गुणवत्ताधारक पदवीधर यांची प्रथेप्रमाणे मिरवणूक काढण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली. अंतराळशास्त्रज्ञ डॉ. जी. सतीश रेड्डी यांनी मुंबई विद्यापीठातील दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून केलेल्या भाषणाची ध्वनिचित्रफित यावेळी विद्यार्थ्यांसमोर प्रदर्शित करण्यात आली.

प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी प्रास्ताविक केले. मा. प्राचार्यांनी यावेळी सर्व यशस्वी पदवीधर विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भावी वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी आपल्याला मिळालेल्या पदवीचा उपयोग करून जगाकडे स्वतंत्र दृष्टीकोनातून पाहायला शिकावे व एक जबाबदार नागरिक म्हणून समाजासाठी आपले योगदान द्यावे असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.ॲड. गौतम पाटील यांनी पदवी प्रमाणपत्र वितरण करण्यासंबंधी उदघोषणा केली. यानंतर ३५४ विद्यार्थ्यांना पदवी व पदव्यत्तर प्रमाणपत्र मा. ॲड गौतम पाटील, प्राचार्य डॉ. अनिल पाटील, उपप्राचार्य डॉ. नीळकंठ शेरे, ॲड रेश्मा पाटील (प्राचार्य ॲड. दत्ता पाटील कॉलेज ऑफ लॉ), उपप्राचार्य प्रा. अविनाश ओक, प्रा. सुरेंद्र दातार व प्रा. टी.डी. वाल्डे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. प्रत्येक विद्यार्थ्याला पदवी व पदव्युत्तर पदवी मान्यवरांच्या हस्ते स्वीकारण्याचा संस्मरणीय अनुभव प्राप्त झाल्याने विद्यार्थी, पालक, शिक्षक यांनी या सोहळ्याच्या आयोजनाबद्दल आनंद व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आशुतोष मेहेंदळे यांनी केले. प्रा. जयेश म्हात्रे, डॉ. मिनल पाटील, डॉ. जयश्री पाटील, प्रा. श्वेता पाटील, प्रा. दीक्षिता भोईर, प्रा. अश्विनी दळवी यांनी प्रमाणपत्रांचे वाचन केले. उपप्राचार्य प्रा. अविनाश ओक यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**विद्यार्थी शिक्षक संवाद कार्यक्रम :-**

मा. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी-शिक्षक संवाद कार्यक्रम दि. १५ जुलै २०१९ रोजी सकाळी ठीक ९.२० वाजता केळुसकर सभागृह येथे संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये F.Y.B.A., F.Y.B.Com., F.Y.B.Sc., F.Y.B.M.S., F.Y.B.Sc. I.T. व F.Y.B.Sc. Computer Science मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना निमंत्रित केले होते. सदर कार्यक्रमासाठी एकूण ५६० विद्यार्थी व १४ शिक्षक उपस्थित होते.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रथम वर्ष कला, विज्ञान व वाणिज्य शाखांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना अभ्याक्रम, नवीन परीक्षापध्दती, अभ्यासक्रमेतर उपक्रम, महाविद्यालयातील सुविधा, शिस्त इत्यादी बाबींची माहिती देणे व त्यांना योग्य मार्गदर्शन करणे हा विद्यार्थी-शिक्षक संवाद कार्यक्रम आयोजन करण्याचा मुख्य हेतू होता.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना महाविद्यालयाचा विकास, व्यवस्थापन समिती तसेच इतर बाबींची माहिती थोडक्यात दिली. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पूर्ण करण्याबरोबर अभ्यासक्रमेतर उपक्रमांमध्ये सहभागी होणे किती महत्वाचे आहे याविषयी प्राचार्यांनी मार्गदर्शन केले. तसेच महाविद्यालयात सुरु असलेले राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम व या व्यतिरिक्त इतर उपक्रम हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी किती उपयुक्त आहेत ते स्पष्ट केले व वरील उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे यासाठी आवाहन केले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना स्वयंशिस्त, नेतृत्वगुण, कौशल्यविकास शिक्षकांशी संवाद कसा वाढवावा विषयी विद्यार्थ्यांना प्राचार्यांनी मार्गदर्शन केले.

## रामशेठ ठाकूर ग्रंथालय अहवाल

महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमांना उपयुक्त अशी ग्रंथसंपदा उपलब्ध करून देणाऱ्या प्रमुख उद्देशांबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये वाङयीन व कलात्मक गुणांची वाढ करण्याच्या हेतूने आपले महाविद्यालयीन ग्रंथालय कार्यरत आहे. विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच माजी विद्यार्थी ग्रंथालयाचा वाचनाकरिता नियमीत उपयोग करून घेत असतात. विविध विषयांवरील संदर्भ ग्रंथांची लक्षणीय संख्या आपल्या ग्रंथालयाचे वैशिष्ट्य आहे.

आज अकेर ग्रंथालयात एकूण रु. ९५६१३२३/- किंमतीची ८२,३९३ ग्रंथ आहेत. कनिष्ठ महाविद्यालयासाठी ग्रंथालयात ७,४८९ ग्रंथ उपलब्ध आहेत. या ग्रंथाखेरीज विविध विषयांवरील अद्ययावत माहिती मिळण्यासाठी ग्रंथालयात ८६ नियतकालिके व २५ वृत्तपत्रे येतात.

**देवघेव विभाग :** ग्रंथालयाचा देवघेव विभाग सकाळी ८.०० ते ४.०० वाजेपर्यंत चालू असतो. या विभागात इ. ११ वी ते पदव्युत्तर वर्गाची अनेक पुस्तके आहेत. या विभागात विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके त्याचप्रमाणे अवांतर वाचनासाठी पुस्तके उपलब्ध करून दिली जातात. चालू वर्षी ९३६७ पुस्तके विद्यार्थ्यांनी देवघेव विभागातून घेतली.

**अभ्यासिका :** हा विभाग सकाळी ८.०० ते ५.०० वाजेपर्यंत चालू असतो. यथे विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तके, अवांतर वाचनाची पुस्तके, जनरल नॉलेजवरील विविध स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त पुस्तके तसेच नियतकालिके, वृत्तपत्रे व प्रश्नपत्रिका संच उपलब्ध आहेत. अभ्यासिकेत ८० विद्यार्थ्यांची बसण्याची सोय केली आहे. दररोज सरासरी १५० विद्यार्थी या सुविधेचा लाभ घेतात.

**बुक बँक :** या योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना पाठ्यक्रमिक पुस्तके मुळ किंमतीच्या १/३ एवढ्या किंमतीत वर्षभर वापराकरिता मिळतात. यावर्षी विद्यार्थ्यांनी बुक बँक योजनेअंतर्गत एकूण रु. १९,५५३/- किंमतीच्या ४०१ पुस्तकांचा लाभ घेतला.

**इ-लायब्ररी :** पारंपरिक पुस्तकांबरोबरच डीजीटल स्वरूपातील माहिती ई-बुक्स, ई-जर्नल्स व ई-मॅग्झीन द्वारे ग्रंथालयातून दिली जाते. ग्रंथालयात एकूण ३१३५००० ई-बुक्स, ६००० ई-जर्नल्स तसेच ५००० ई-मॅग्झीन ग्रंथालयात उपलब्ध आहेत.

E-Content Development Studio : नेटवर्क रिसोर्स सेंटर ची सुविधा विद्यार्थी व प्राध्यपकांना उपलब्ध करून दिली आहे. त्यासोबतच महाविद्यालयातील प्राध्यापकांना अध्यापन करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर प्रभाविपणे करता यावा याकरीता ग्रंथालयामध्ये E-Content Development Studio सुरु करण्यात आला आहे.

**देणगी :** यावर्षी श्री. विजय हिरामण कोकणे, प्रा. एम. पी. पाटील, सौ. मेधा किरीट सोमैया, प्रा. गौरी लोणकर, प्रा. प्रेम आचार्य व आयसीएसआय, पुणे यांनी देखील देणगीदाखल ग्रंथालयाला पुस्तके भेट दिली, त्याबद्दल त्यांना धन्यवाद!

**उपक्रम :**

१) **इ-कन्टेन्ट डेव्हलपमेंट कार्यशाळा :** प्रभावी अध्ययनासाठी इ-कन्टेन्ट विकसित कसे करावे याचे प्रशिक्षण महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकांना द्यावे या हेतूने जे.एस.एम. महाविद्यालयात, अलिबाग व नॉलेज ब्रिज, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभावी अध्यापनासाठी इ-कन्टेन्ट डेव्हलपमेंट या विषयावर आधारित दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयाच्या 'अंतर्गत गुणवत्ता निर्धारण समिती' व 'ग्रंथालय विभाग' यांच्यावतीने कै. जयवंतराव केळुसकर सभागृहात दिनांक १४ व १५ सप्टेंबर २०१९ रोजी करण्यात आले होते. या कार्यशाळेचे प्रमुख प्रशिक्षक व मार्गदर्शक म्हणून नॉलेज ब्रिजचे मा. श्री. भूषण कुलकर्णी व मा. श्री. एकनाथ कोरे उपस्थित होते. महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अशा एकूण ८४ जणांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला.

या कार्यशाळेत एखाद्या विषयावर आधारित व्हिडीओ निर्मिती कशी करावी, एडिटिंग कसे करावे, तांत्रिकदृष्ट्या अचूक ध्वनीमुद्रण कसे करावे, विविध इफेक्टसचा वापर कसा करावा याचे प्रशिक्षण विविध सत्रांमधून दिले गेले. या कार्यशाळेमुळे इ-कन्टेन्ट विकसित करन अध्यापन अधिकाधिक प्रभावी करता येईल, असे मत सहभागी प्राध्यापक व शिक्षकांनी व्यक्त केले. या कार्यशाळेच्या आयोजनात समन्वयक म्हणून ग्रंथपाल सुबोध डहाके व प्रा. जयेश म्हात्रे यांनी महत्वाची भूमिका पार पाडील. तसेच ग्रंथालयातील सर्व

कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**२) वाचन प्रेरणा दिवस :** भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त दि. १५ ऑक्टोबर हा दिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणूीन साजार केला जातो. यानिमित्ताने महाविद्यालयात 'ग्रंथालय व माहिती स्त्रोत केंद्र विभाग' आणि 'मराठी भाषा व वाङमय अभ्यास मंडळा' तर्फे मंगळवार दि. १५ ऑक्टोबर २०१९ रोजी 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात आला. यावेळी विविध स्पर्धा व वाचनध्यास, नो गॅझेट डे, निवडक उताऱ्यांचे वाचन अशा विविध उपक्रमांचे आयोजन महाविद्यालयाच्या ग्रंथालयात करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. नीळकंठ शेरे उपस्थित होते.

वाचनध्यास उपक्रमात ७० विद्यार्थ्यांनी सलग आठ तास वाचन करून माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना अभिवादन केले. यावेळी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलामांचे साहित्य तसेच वाचनीय अशा विविध ग्रंथांचे ग्रंथप्रदर्शनही भरविण्यात आले होते. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक म्हणून अब्दुल कलामांचे 'अग्नीपंख' हे आत्मचरित्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी वाचन संस्कृतीच्या प्रसाराकरिता महाविद्यालयाच्या ग्रंथालयात 'जे.एस.एम. वाचन कट्टा' सुरु करण्यात आला. ग्रंथपाल प्रा. सुबोध डहाके व प्रा. जयेश म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

३) **संविधान दिवस :** दिनांक २६ नोव्हेंबर २०१९ रोजी महाविद्यालयातील ग्रंथालयात ७१ वा संविधान दिवस साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल क. पाटील यांनी राज्यघटनेची प्रस्तावना वाचून कार्यक्रमाची सुरुवातकेली. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या ॲड. रेश्मा पाटील, प्राचार्या ॲड. दत्ता पाटील कॉलेज ऑफ लॉ आणि महाविद्यलयाचे उपप्राचार्य व राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. अविनाश ओक यांनी 'भारतीय संविधानाची ओळख' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## राष्ट्रीय सेवा योजना अहवाल

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने राष्ट्रीय सेवा योजना विभागाची भूमिका अत्यंत महत्वाची असते. **'Not Me But You'** हे ब्रीद वाक्य समोर ठेऊन शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये केंद्र सरकार व महाराष्ट्र शासन यांच्या आदेशाननुसार राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत महाविद्यालयामध्ये योग दिन, वृक्षारोपण कार्यक्रम, स्वच्छता अभियान, स्वच्छता पखवाडा, मतदार जनजागृती अभियान, एड्स जनजागृती अभियान, परिसर व सागरकिनारा स्वच्छता, प्लास्टिक मुक्ती अभियान, स्वस्थ भारत अभियान इत्यादी उपक्रम यशस्वीरित्या राबविले गेले. तसेच सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठी सांगली व कोल्हापूर येथील पूरग्रस्तांसाठी रा.से.यो. स्वयंसेवकांनी मदत गोळा करून ती पेण तहसील कार्यालयामध्ये जमा केली. तसेच रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक यांनी श्री समर्थ कृपा वृध्दधाम परहूर ता. अलिबाग येथील वृध्दाश्रमाला भेट देऊन तेथील आजी आजोबांना फराळ व कंदील वाटप केले व त्यांच्या सोबत दिवाळी साजरी केली त्यावेळी स्वयंसेवकांनी मनोरंजनाचे कार्यक्रम सादर केले.

**उदबोधन कार्यक्रम :** राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे केवळ स्वच्छता करणे नसून, विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठी केंद्र सरकारने १९६९ ला सुरु केलेला हा एक उपक्रम आहे. राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे काय, या विभागामार्फत कोणते सामाजिक प्रकल्प उपक्रम व कार्यक्रम राबवले जातात, राष्ट्रीय सेवा योजना विभागाची विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकासासाठी कशी मदत होते याविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती व्हावी या हेतूने उद्बोधन वर्गाचे आयोजन दि. ३ ऑगस्ट २०१९ शनिवार रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाच्या १८० विद्यार्थीनी व १३० विद्यार्थी अशा एकूण ३१० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी व्हावे व सामाजिक बांधिलकी जोपासावी असे आवाहन केले. यावेळी कु. विराज अच्युतकर या स्वयंसेवकाने ६२ कुटुंबान भेट देऊन शासकीय योजनांची माहिती देऊन माहितीदूत हा प्रकल्प पूर्ण केल्याबद्दल मा.प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते गुलाबपुष्प व पुस्तक भेट देऊन त्याचा सत्कार केला.

**जागतिक योग दिवस :** मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकारच्या वतीने जारी करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार दि. २१ जून २०१९ रोजी महाविद्यालयात योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करून जागतिक योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख प्रा. बी. आर. गुरव हे योग प्रशिक्षक म्हणून, तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. सकाळी ठीक ७.३० वाजता योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले. कनिष्ठ

महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. श्रध्दा वैशंपायन हिने प्रांभी योग प्रार्थन सादर केली. महाविद्यालयातील ७८ विद्यार्थी व ६८ विद्यार्थिनी असे १४६ एन. एन. एस. स्वयंसेवक, शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतरकर्मचारी यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. याशिवाय महाविद्यालयातील १५ विद्यार्थी व ०५ विद्यार्थीनी अशा २० एन. एन. एस. स्वयंसेवकांनी पोलीस मैदान अलिबाग येथे माध्यमिक शिक्षण अधिकारी व क्रीडा अधिकारी रायगय यांच्यातर्फे आयोजित जिल्हास्तरीय योग दिवस कार्यक्रमात सहभाग घेतला.

**तंबाखू व्यसनमुक्तीसाठी सामुहिक शपथ कार्यक्रम :** व्यसनाधीनतेला आळा बसावा व मुलांमध्ये याविषयी जाणीव व्हावी म्हणून दि. ११ जुलै २०१९ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता तंबाखू व्यसनमुक्तीसाठी सामुहिक शपथ कार्यक्रम आयोजित केला. सदर कार्यक्रमामध्ये एकूण १०३५ विद्यार्थी व १९ शिक्षक सहभागी झाले. संबंध हेल्थ फौन्डेशन या ग़्क्र ने तयार केलेली तंबाखू व्यसनमुक्तीची चित्रफितयावेळी विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली. बी. ए., बीकॉम., बी. एस्सी. व बी. एम. एस. च्या ६२१ विद्यार्थिनी व ४१४ विद्यार्थी एकूण १०३५ विद्यार्थ्यांनी तंबाखू व्यसनमुक्तीसाठी सामुहिक शपथ घेतली.

**युवा माहिती दूत उपक्रम :** शासकीय योजनांची माहिती सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवणे तसेच युवक व लोकसहभागातून सामुहिक विकासाची कामे करणे या हेतूने जे. एस. एम. महाविद्यालय अलिबाग व अनुलोम संस्था रायगड विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने युवा माहिती दूत उपक्रम सकाळी ठीक ९.३० वाजता महाविद्यालयाच्या रूम नं. १ मध्ये साजरा केला. या कार्यक्रमासाठी अनुलोम संस्थेचे रायगड विभागाचे अधिकारी श्री. रविंद्र चव्हाण व तालुका समन्वयक श्री. घनश्याम गायकवाड उपस्थित होते. अनुलोम संस्थेचे तालुका समन्वयक श्री. घनःशाम गायकवाड यांनी युवा माहिती दूत या ॲप्लिकेशन विषयी माहिती देऊन ॲप्लिकेशन विद्यार्थ्यांना इंस्टॉल करण्याबाबत प्रशिक्षणदिले. सदर कार्यक्रमामध्ये ८४ विद्यार्थीनी व ५७ विद्यार्थी असे एकूण १४१ विद्यार्थी व २ रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले.

**स्वच्छ भारत अभियान उपक्रम :** जनसामान्य व विद्यार्थी वर्गामध्ये प्रचार व प्रसाराच्या माध्यमामातून विविध सरकारी योजना, स्वच्छता जनजागृती माहिती, आरोग्य विषयक माहिती, कौशल्य उपक्रम यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजना विभाग व जन शिक्षण संस्थान, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ जुलै २०१९ शनिवार रोजी सकाळी ठीक ९.३० वाजता 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत स्वच्छता जनजागृती, कापडी पिशवी वाटप, सॅनिटरी नॅपकीन प्रबोधन व वाटप, घोषवाक्य स्पर्धा, पथनाट्य असे विविध कार्यक्रम महाविद्यालयाच्या रूम न्. १ मध्ये संपन्न झाले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील, उपप्राचार्य प्रा. अविनाश ओक, जन शिक्षण संस्थान, अलिबाग चे अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, संचालक श्री. विजय कोकणे, बोर्ड मेम्बर श्री. नरेन जाधव, नीला तुळपुळे, श्री. विकास पाटील, वेदांती पाटील इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाच्या ९५ विद्यार्थिनी व ५७ विद्यार्थी अशा एकूण १५२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

स्वच्छता जनजागृती या विषयासंदर्भात घोषवाक्य स्पर्धा आयोजित केली. यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यापैकी उत्कृष्ट घोषवाक्य तयार करणाऱ्या प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तजनार्थ क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यापैकी उत्कृष्ट घोषवाक्य तयार करणाऱ्या प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व भेटवस्तू प्रदान करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांना स्वच्छ भारत अभियाना संदर्भात दोन चित्रफित दाखवण्यात आल्या व नंतर सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व जन शिक्षण संस्थांनचे पदाधिकारी यांनी स्वच्छतेची शपथ घेतली. सदर उपक्रमानंतर नीला तुळपुळे यांनी सॅनिटरी नॅपकीन प्रबोधन व स्त्रियांचे आरोग्य या विषयावरती प्रबोधनपर व्याख्यान दिले. त्यांनी आरोग्य विषयक धुम्रपानाबाबत घ्यावयाची दक्षता याबबत मार्गदर्शन केले. त्यानंतर उपस्थित विद्यार्थ्यांना कापडी पिशवी वाटप व प्रातिनिधिक स्वरुपात २० विद्यार्थ्यांनीना सॅनिटरी नॅपकीन वाटप करण्यात आले.

भारत सरकारच्या स्वच्छ भारत अभियानाचा प्रचार व प्रसार व्हावा या हेतूने विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढली. त्यानंतर पर्यावरण संवर्धन व्हावे म्हणून वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले. वृक्षारोपण कार्यक्रमानंतर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी स्वच्छता जनजागृती या विषयावर पथनाट्य सादरकेले. या पथनाट्याद्वारे विद्यार्थ्यांनी परिसर स्वच्छता, शौचालयाचा वापर, प्लॅस्टिक बंदी, पर्यावरण संवर्धन याबाबत संदेश दिले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन रोहित जोशी याने केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे मार्गदर्शन, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अद्वैत घाटपांडे, प्रा. सौ. श्वेता पाटील, प्रा. डॉ. प्रविण गायकवाड यांचे नियोजन आणि जन शिक्षण संस्थान, अलिबाग चे सर्व पदाधिकारी व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक, विद्यार्थी यांच्या सहकार्यामुळे 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत स्वच्छता जनजागृती, कापडी पिशवी वाटप, सॅनिटरी नॅपकीन प्रबोधन व वाटप, घोषवाक्य स्पर्धा, पथनाट्य, असे विविध उपक्रम यशस्वीरित्या संपन्न झाले.

**स्वच्छ भारत अभियान पंधरवडा :** दि. १ ऑगस्ट २०१९ ते १५ ऑगस्ट २०१९ पर्यंत 'स्वच्छ भारत अभियान पंधरवडा' साजरा करण्यात आला. या उपक्रमाच्या अंतर्गत स्वच्छता जनजागृती, कापडी पिशवी वाटप, सॅनिटरी नॅपकीन प्रबोधन व वाटप, घोषवाक्य स्पर्धा, पथनाट्य, महाविद्यालय परिसर स्वच्छता, अलिबाग बिच स्वच्छता, वृक्षारोपण कार्यक्रम, दत्तक गाव मानिभूते येथे ग्राम स्वच्छता असे कार्यक्रम घेण्यात आले. 'स्वच्छ भारत अभियान पखवाडा' या उपक्रमाची सुरुवात दि. १ ऑगस्ट २०१९ रोजी सकाळी ठीक ९.३० वाजता 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत स्वच्छता जनजागृती, कापडी पिशवी वाटप, सॅनिटरी नॅपकीन प्रबोधन व वाटप, घोषवाक्य स्पर्धा, पथनाट्य असे विविध कार्यक्रम महाविद्यालयाच्या रूम न्. १ मध्ये घेऊन करण्यात आली. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील, उपप्राचार्य प्रा. अविनाश ओक, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अद्वैत घाटपांडे, प्रा. सौ. श्वेता पाटील, प्रा. डॉ. प्रविण गायकवाड तसेच जन शिक्षण संस्थान, अलिबागचे अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, संचालक श्री.विजय कोकणे, बोर्ड मेम्बर श्री. नरेन जाधव, नीला तुळपुळे, श्री. विकास पाटील, वेदांती पाटील इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाच्या ९५ विद्यार्थिनी व ५७ विद्यार्थी अशा एकूण १५२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

जन शिक्षण संस्थानचे संचालक श्री. विजय कोकणे यांनी विद्यार्थ्यांना विविध सरकारी योजना, भारत सरकारचे सामाजिक उपक्रम, स्वच्छ भारत अभियान, आरोग्य विषयक उपक्रम यांविषयी सविस्तर माहिती दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांना भारत सरकारच्या स्वच्छ भारत अभियान उपक्रमाचे महत्व पटवून दिले. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी स्वच्छता जनजागृती, आरोग्य विषयक उपक्रम यांची सुरुवात वैयक्तिक जीवनापासून करावी व त्याचे महत्व समजापर्यंत पोहोचवावे असे आवाहन केले. समाजाचे आपण काही देणे लागतो या भावनेतून विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठी शासकीय योजना, स्वच्छ भारत अभियान, पर्यावरण संवर्धन कार्यक्रम, उन्नत भारत अभियान आदी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे असे मत प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी व्यक्त केले. त्यानंतर जन शिक्षण संस्थान, अलिबाग चे अध्यक्ष डॉ. नितीन गांधी यांनी 'च्क्ष्ढ़ ग़्र घ्क्ष्ठ्ढक्ष' या विषयावर बोलताना प्लॅस्टिकच्या अतिवापरामुळे मानवी जीवनावर व इतर प्राण्यांवर त्याचे काय विपरीत परिणाम होतात हे स्पष्ट केले. तसेच विद्यार्थ्यांनी प्लॅस्टिक पिशवी व इतर प्लॅस्टिकच्या वस्तू वापरण्याऐवजी त्याला पर्यायी व्यवस्था करून त्याचा जास्तीत जास्त वापर करावा जेणेकरून प्रदूषण नियंत्रण होण्यास मदत होईल असे गांधी यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की जर प्रत्येक विद्यार्थी व नागरिक यांनी स्वतःचा परिसर स्वच्छ ठेवला तर साथीचे रोग, अस्वच्छता, दुर्गंधी नियंत्रित करण्यासाठी मदत होईल म्हणून भारत सरकारच्या स्वच्छ भारत अभियानामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन डॉ. गांधी यांनी केले.

स्वच्छता जनजागृती या विषयासंदर्भात घोषवाक्य स्पर्धा आयोजित केली. यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यापैकी उत्कृष्ट घोषवाक्य तयार करणाऱ्या प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व भेटवस्तू प्रदान करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्याना स्वच्छ भारत अभियाना संदर्भात दोन चित्रफित दाखवण्यात आल्या व नंतर सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व जन शिक्षण संस्थानचे पदाधिकारी यांनी स्वच्छतेची शपथ घेतली. सदर उपक्रमानंतर नीला तुळपुळे यांनी सॅनिटरी नॅपकीन प्रबोधन व स्त्रियांचे आरोग्य या विषयावरती प्रबोधनपर व्याख्यान दिले. त्यांनी आरोग्यविषयक धुम्रपानाबाबत घ्यावयाची दक्षता याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर उपस्थित विद्यार्थ्यांना कापडी पिशवी वाटप व प्रातिनिधीक स्वरुपात २० विद्यार्थ्यांना सॅनिटरी नॅपकीन वाटप करण्यात आले.

भारत सरकारच्या स्वच्छ भारत अभियानाचा प्रचार व प्रसार व्हावा या हेतूने विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढली. त्यानंतर पर्यावरण संवर्धन व्हावे म्हणून वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले. वृक्षारोपण कार्यक्रमानंतर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी स्वच्छता जनजागृती या विषयावर पथनाट्य सादर केले. या पथनाट्याद्वारे विद्यार्थ्यांमा परिसर स्वच्छता, शौचालयाचा वापर, प्लॅस्टिक बंदी, पर्यावरण संवर्धन याबाबत संदेश दिले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन रोहित जोशी याने केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे मार्गदर्शन, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अद्वैत घाटपांडे, प्रा. सौ. श्वेता पाटील, प्रा. डॉ. प्रविण गायकवाड यांचे नियोजन आणि जन शिक्षण संस्थान, अलिबाग चे सर्व पदाधिकारी व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक, विद्यार्थी यांच्या सहकार्यामुळे 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत स्वच्छता जनजागृती, कापडी पिशवी वाटप, सॅनिटरी नॅपकीन प्रबोधन व वाटप, घोषवाक्य स्पर्धा, पथनाट्य, असे विविध उपक्रम यशस्वीरित्या संपन्न झाले.

दि. ९ व १० ऑगस्ट रोजी राषट्रीय सेवा योजना विभागाच्या एकूण ७० स्वयंसेवकांनी दत्तक गाव मानिभूते याठिकाणी भेट देऊन गावातील परिसर, रस्ते, शाळेचा परिसर यांची स्वच्छता केली. त्यानंतर स्वयंसेवकांनी स्वच्छता जनजागृती व प्रबोधन व्हावे या हेतून पथनाट्य सादर केले. त्यानंतर स्वयंसेवकांना अल्पोपहार देण्यात आला.

दि. १३ व १४ ऑगस्ट २०१९ रोजी ७३ वा स्वातंत्र्य दिन साजरा केला. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या एकूण २६० स्वयंसेवकांनी भाग घेतला. १५ ऑगस्ट २०१९ रोजी ७३ वा स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून दत्तक गाव मानिभूते याठिकाणी रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये ग्रंथालायाची स्थापना केली. यामध्ये देणगी स्वरुपात मिळालेली १७५ पुस्तके शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचाच्या एकूण ६५ स्वयंसेवकांनी सहभाग गेऊन मानिभूते येथे बहावा, फणस, पेरू, चिंच, वड, पिंपळ, गुलमोहर, करंज अशी ५०१ झाडे लावली. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी संपूर्ण गावातून वृक्षारोपणा संदर्भात घोषणा देत फेरी काढली. त्यानंतर सर्व स्वयंसेवकांना अल्पोपहार देण्यात आला.

**ग्रंथालय निर्मिती :** मा. संचालक राष्ट्रीय सेवा योजना विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांनी प्रत्येक राष्ट्रीय सेवा योजना विभागाने आपल्या दत्तक गावामध्ये किमान एक ग्रंथालय स्थापन करण्याचे आवाहन केले होते. सदर आवाहनास प्रतिसाद देऊन जे. एस. एम. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत दि. १५ ऑगस्ट २०१९ रोजी स्वातंत्र्य दिनादिवशी दत्तक गाव मौजे मानी-भूते येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये ग्रंथालय सुरु केले. सदर ग्रंथालयासाठी देणगी स्वरुपात मिळालेली विविध विषयावरील १७५ पुस्तके शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक यांच्याकडे सुपूर्द केली.

**स्वस्थ भारत अभियान (Fit India Movement) :** जे. एस. एम. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत मा. शुदीर पुराणिक, संचालक राष्ट्रीय सेवा योजना, मुंबई विद्यापीठ यांनी केलेल्या आवाहनानुसार महाविद्यालयाने Fit India Movement या कार्यक्रमाचे उद्घाटन दि. २९ ऑगस्ट, २०१९ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता केले. सदर सशक्त भारत अभियान या कार्यक्रमाचे थेट प्रत्रेपण सकाळी ठीक १०.०० वाजल्या पासून विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी "स्वस्थ भारत, सशक्त भारत"ची शपथ घेतली. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. सी. घाटपांडे, प्रा. सौ. श्वेता पाटील व प्रा. डॉ. पी.बी. गायकवाड व राष्ट्रीय सेवा योजनेचे ६५ स्वयंसेवक (११ मुले व ५४ मुली) तसेय प्रा. सुनील आनंद उपस्थित होते.

**राष्ट्रीय सेवा योजना दिन कार्यक्रम :** जे. एस. एम. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून दि. २४ सप्टेंबर २०१९ मंगळवार रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता रा.से.यो. ध्वजारोहण, रा.से.यो. गीत, स्वच्छता शपथ, राष्ट्रगीत इत्यादी कार्यक्रम संपन्न झाले. तसेच सकाळी ठीक ११.०० वाजता 'राष्ट्रीय सेवा योजना काल आणि आज' आणि 'व्यक्तिमत्व विकासातील राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान' या विषयावर परिसंवाद महाविद्यालयाच्या केळुसकर सभागृहामध्ये पार पडला. सदर कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. नीळकंठ शेरे, प्रा. अविनाश ओक, प्रा. सुरेंद्र दारा, माजी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. जयेश म्हात्रे, प्रा. डॉ. प्रेम आचार्य, प्रा. कपिल कुलकर्णी तसेच चालू शैक्षणिक वर्षातील रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. अद्वैत घाटपांडे, प्रा. सौ. श्वेता पाटील, प्रा. डॉ. प्रविण गायकवाड तसेच महाविद्यालयातील माजी विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी स्वयंसेवक श्री. रत्नाकर पाटील, श्री. प्रतीम सुतार, श्री. विजय कोकणे आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे ६५ स्वयंसेवक उपस्थित होते.

**गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंती :** राष्ट्रीय सेवा योजना विभाग व उन्नत भारत अभियान अंतर्गत सत्य व अहिंसेचा मार्ग दाखवणारे राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांची १५० वी जयंती व 'जय जवान जय किसान' चा नारा देणारे माजी पंतप्रधान

लाल बहादूर शास्त्री यांची ११६ वी जयंती महाविद्यालयाच्या केळुसकर सभागृहामध्ये दि. २ ऑक्टोबर २०१९ रोजी साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विषयाचे प्राध्यापक डॉ. ईश्वर कोकणे यांनी 'महात्मा गांधींची सामाजिक विचारधारा' या विषयावर व्याख्यान देताना 'महात्मा गांधीजींची सत्य, अहिंसा व खेड्याकडे चला ही तत्व प्रणाली आज काळाची गरज आहे', असे मत व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी उपस्थितांना स्वच्छतेची व पर्यावरण संवर्धनाची शपथ दिली.

**सोलर स्टडी लॅम्प प्रशिक्षण शिबिर :** गांधी जयंतीचे औचित्य साधून जे.एस.एम. महाविद्यालयात सौर दिवा बनविण्याचे प्रशिक्षण शिबिर दि. २ ऑक्टोबर २०१९ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले.

आजदेखील अनेक गावांमध्ये वीज पोहचलेली नाही. अशा गावांमधील लोकांना व विद्यार्थ्यांना ऊर्जा स्रोत पुरवण्याच्या उद्देशाने आय.आय.टी. बॉम्बे या संस्थेने "Localization of Solar Energy through Local Assembly, Sale and Usage of 1 Million Solar Urja Lamps (SoUL)", हा उपक्रम राबवला आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून सोलर स्टडी लॅम्प बनवण्याची कार्यशाळा महाविद्यालयात आयोजित केली. या कार्यशाळेमध्ये १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व त्यांना प्रा. रविंद्र चिखले, प्रा. एस. के. तानवडे, प्रा. मिलिंद धोदरे, व प्रा. सत्यजित तुळपुळे यांनी सौर दिवे बनवण्याचे प्रशिक्षण दिले. सौर दिवा बनवल्यानंतर सायंकाळी ५.३० ला विद्यार्थ्यांनी बनवलेले दिवे प्रज्वलित करण्यात आले.

सदर कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे ७० स्वयंसेवक कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

**मदतान जनजागृतीपर रॅली व पथनाट्य :** महाराष्ट्र विधानसभा निवडणूक, ऑक्टोबर २०१९ मध्ये राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अद्वैत घाटपांडे, प्रा. डॉ. प्रविण गायकवाड व प्रा. श्वेता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रा.से.यो. स्वयंसेवकांनी सागरमाची, मानी-भुते, अलिबाग, पोयनाड बाजार, थळ बाजार, वेश्वी इत्यादी गावांमध्ये मतदान जनजागृतीपर रॅली व पथनाट्य यांचे आयोजन केले. तसेच सदर गावांत ग्रामस्थांना ङ्घ्ध्र मशीन व ध्ध्द्रङ्घ्य यांचे प्रात्यक्षिक दाखवले व जास्तीत जास्त लोकांनी मतदान करावे असे आवाहन केले. अशाप्रकारे राष्ट्रीय कार्यक्रमात मौल्यवान कार्यकेल्याबद्दल तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी जे.एस.एम. कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभगाचे अभिनंदन व कौतुक केले.

**संविधान दिन :** राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत दि. २६ नोव्हेंबर २०१९ रोजी सकाळी ९.०० वाजता 'संविधान दिन' महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील, ॲड. दत्ता पाटील लॉ कॉलेजच्या प्राचार्या सौ. रेश्मा पाटील, उपप्राचार्य प्रा. डॉ. नीळकंठ शेरे, प्रा. अविनाश ओक, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. अद्वैत घाटपांडे, सौ. श्वेता पाटील, डॉ. प्रविण गायकवाड ग्रंथपाल श्री. सुबोध डहाके, प्रा. प्रविण सातपुते, प्रा. ईश्वर कोकणे उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे ११० स्वयंसेवक उपस्थित होते. (६२ विद्यार्थिनी व ४८ विद्यार्थी).

सदर कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या प्रास्ताविकाने झाली. प्रास्ताविकामध्ये मा. प्राचार्य यांनी संविधान दिन साजरा करण्यापाठीमागचा उद्देश स्पष्ट केला तसेच संविधान दिनाच्या शुभेच्छा दिल्या व संविधानातील उद्देशिकेचे वाचन केले. या कार्यक्रमानंतर राष्ट्रीय सेवा योजनेचे २५ स्वयंसेवक अलिबाग येथे आयोजित केलेल्या संविधान यात्रेत सहभागी झाले.

**रक्तदान शिबिर:** राष्ट्रीय सेवा योजना विभाग, एक्स. एन. सी. सी. कॅडेट असोसिएशन व सिविल हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २६ नोव्हेंबर २०१९ रोज महाविद्यालयाचे रक्तदान शिबिर आयोजित केले. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील, उपप्राचार्य प्रा. डॉ. नीळकंठ शेऱे, प्रा. अविनाश ओक, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. अद्वैत घाटपांडे, प्रा. सौ. श्वेता पाटील, डॉ. प्रविण गायकवाड, ग्रंथपाल श्री. सुबोध डहाके, प्रा. ईश्वर कोकणे, सिविल हॉस्पिटलचे डॉ. गोसावी तसेच महाविद्यालयाचे माजी एन. सी. सी. कॅडेट्स उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे १४५ स्वयंसेवक उपस्थित होते.

एकूण ४८ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

**राष्ट्रीय मतदार दिवस :** दि. २५ जानेवारी २०२० रोज मतदार जनजागृती दिनानिमित्त रायगड जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी अलिबाग शहरातून राष्ट्रीय मतदार दिवस रॅलीचे आयोजन केले होते. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे १६७ स्वयंसेवक सहभागी झाले होते. यामध्ये विविध घोषमा देऊन मतदार जनजागृती करण्यात आली. यानंतर PNP नाट्यगृहामध्ये रांगोळी स्पर्धेचे व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. रांगोळी स्पर्धेत कु. भक्ती राऊत या विद्यार्थीनीने प्रथम क्रमांक प्राप्त केला. तसेय स्वयंसेवकांनी मतदानाचे महत्व विशद करणारे पथनाट्य सादर केले. राष्ट्रीय कार्यक्रमामध्ये सहभाग घेऊन जनजागृती केली म्हणून या सर्व स्वयंसेवकाचे जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी यांनी कौतुक केले.

**कुलाबा किल्ला स्वच्छता मोहिम :** दि. ८ जानेवारी २०२० रोजी भारतीय नौसेना दलाच्या संयुक्त विद्यमाने अलिबाच्या कुलाबा किल्ल्यात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

**राष्ट्रीय युवा दिन :** दि. ११ जानेवारी २०२० रोजी राजमाता जिजाऊ साहेब आणि स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. तसेच राष्ट्रीय युवा दिना निमित्त स्वयंसेवकांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी स्लोगन मेकिंग स्पर्धाही आयोजित करण्यात आली.

**फिट इंडिया वॉकेथॉन :** दि. २ फेब्रुवारी २०२० रोजी ONGC यांच्या वतीने आयोजित सक्षम फिट इंडिया वॉकेथॉनमध्ये १६० स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला.

**Save Indhan Save Environment वॉकेथॉन :** भारत पेट्रोलियम व ONGC यांच्या संयुक्त विद्यमाने 'इंधन वाचवा पर्यावरण वाचवा' हा विषय समोर ठेऊन अलिबाग शहरातून वॉकेथॉनचे आयोजन केले. यामध्ये महाविद्यालयाच्या ८५ रा.से.यो. स्वयंसेवकांनी सहभागी होऊन पर्यावरण संवर्धन व इंधन बचतीसाठी जनजागृती केली. वॉकेथॉन नंतर अलिबाग समुद्र किनारा स्वच्छ केला. सहभागी झालेल्या स्वयंसेवकांना ONGC मार्फत प्रमाणपत्र देण्यात आली.

**रेड रिबीन क्लब :** HIV AIDS बद्दल विद्यार्थी व समाज यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याच्या हेतूने महाविद्यालयात रेड रिबीन क्लबची स्थापना करण्यात आली. रेड रिबीन क्लब तर्फे पुढील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**HIV AIDS जनजागृती कार्यक्रम** - राष्ट्रीय सेवा योजना विभाग व जिल्हा सामान्य रुग्णालय एड्स नियंत्रण व प्रतिबंध विभाग, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने HIV AIDS या आजाराविषयी समाजात तसेय युवा वर्गात जनजागृती व्हावी या उद्देशाने दिनांक १२ ऑगस्ट आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त HIV एड्स जनजागृतीपर कार्यक्रम महाविद्यालयात आयोजित केला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील. जिल्हा एड्स नियंत्रण व प्रतिबंध विभागाच्या समुपदेशक अर्चना जाधव व सुजाता तुळपुळे, रा. से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. सी. घाटपांडे, प्रा. सौ. श्वेता पाटील व प्रा. डॉ. पी. बी. गायकवाड व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

जिल्हा एड्स नियंत्रण व प्रतिबंध विभागाच्या समुपदेशक अर्चना जाधव व सुजाता तुळपुळे यांनी सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना HIV AIDSया आजाराविषयी माहिती, आजारांविषयी असलेले समज व गैरसमज इत्यादी विषयीची माहिती दिली. HIV एड्स या आजारावरती कोणतेही औषध नसल्याने प्रतिबंध हाच एकमेव उपचार असल्याने या आजाराची माहिती सदर कार्यक्रमाद्वारे पोहोचवावी हा शासनाचा मुख्य उद्देश आहे.

जे.एस.एम. महाविद्यालयात एन.एस.एस ने दत्तक घेतलेल्या गावामध्ये स्वयंसेवकांनी HIV एड्सविषयी जनजागृती व्हावी या उद्देशाने प्रभात फेरी काढण्यात आली. तसेच गावातील ग्रामस्थ व युवकांना सदर आजाराविषयी माहिती पुस्तिका व पत्रके देऊन त्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर एन.एस.एस. स्वयंसेवकांनी एड्सविषयी पथनाट्य सादर केले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. सी. घाटपांडे, प्रा. सौ. श्वेता पाटील व प्रा. डॉ. पी. बी. गायकवाड व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक तसेच मानीभूते गावाच्या सरपंच मोनिका म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ व युवक उपस्थित होते.

**HIV AIDS जनजागृती कार्यक्रम** - राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत श्री. संजय माने, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग-रायगड यांच्या परिपत्रकानुसार दि. २० ऑगस्ट २०१९ रोजी दुपारी २.०० वाजता E-LEARING HIV AIDS EDUCATION SEMINAR चे महाविद्यालयाच्या Computer Science Lab मध्ये आयोजन केले. यावेळी डॉ. प्रशांत देशपांडे व श्री. रमाकांत गायकवाड यांनी Basics of HIV AIDS या विषयावर दिलेले व्याख्यान विद्यार्थ्यांना थेट प्रक्षेपणाद्वारे दाखवण्यात आले. त्यानंतर उपस्थित विद्यार्थ्यांनी सदर कार्यक्रमाबाबत feedback form भरून दिले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. सी. घाटपांडे, प्रा. डॉ. पी. बी. गायकवाड, प्रा. अवंती जोगळेकर व राष्ट्रीय सेवा योजनचे ४२ (४२ मुली व १८ मुले) स्वयंसेवक उपस्थित होते.

१६ जानेवारी, २०२० रोजी रेड रिबीन क्लब अंतर्गत AIDS माहितीपर व्हीडिओ कॉन्फरंसिन्ग राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना दाखवण्यात आली.

**एड्स जनजागृती पदयात्रा** - रेड रिबीन क्लब, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग-रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने जागितक एड्स दिनानिमित्त एड्सविषयी जनजागृती होण्याकरिता अलिबाग शहरातून पदयात्रेचे आयोजनकेले. या पदयात्रेमध्ये डॉ. संजय माने जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण अधिकारी, सौ. सुजाता तुळपुळे, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. सी. घाटपांडे, प्रा. सौ. एस. एस. पाटील, प्रा. डॉ. पी. बी. गायकवाड तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथील डॉक्टर्स, नर्स व इतर कर्मचारी उपस्थित होते. या पदयात्रेत राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे ८२ विद्यार्थिनी व ५४ विद्यार्थी असे एकूण १३६ स्वयंसेवक सहभागी झाले.

१ डिसेंबर हा जागतिक एड्स दिन म्हणून साजरा केला जातो. सदर दिवशी HIV एड्स विषयी जनजागृती व्हावी या हेतूने जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथून अलिबाग शहरात पदयात्रेचे आयोजन केले. पदयात्रा प्रारंभ होण्यापूर्वी उपस्थितांनी एड्स प्रतिबंध व नियंत्रण या संदर्भात शपथ घेतली. त्यानंतर सिविल हॉसिप्टल, अलिबागपासून महावीर चौक, बस स्थानक, बाजारपेठ, शिवाजी चौक या मार्गे पदयात्रेचे आयोजन केले. पदयात्रेमध्ये विद्यार्थ्यांनी 'वचन पाळा एड्स टाळा','माझे आरोग्य माझा अधिकार', 'नैतिकता पाळा - त्क्ष्ज टाळा' अशा विविध घोषणा देऊन एड्सविषयी जनजागृती होण्याकरिता समाजातील नागरिकांचे लक्ष वेधले. सदर पदयात्रेचा समारोप जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग येथे झाला. पदयात्रा संपन्न् झाल्यान्ंतर सर्व उपस्थितांना अल्पोपहार देण्यात आला.

**रेशीम कीटक संगोपन प्रकल्प :** राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०१९-२० अंदर्गत वर्षांच्या सुरुवातीपासून महाविद्यालयस्तरीय 'रेशीम कीटक संवर्धन व संगोपन प्रकल्प' हाती घेण्यात आला. महाविद्यालयाच्या परिसराचे हरितक्षेत्र वाढविणे, निसर्गप्रेमी वातावरण निर्मिती करणे, तुतीची फळे खाणाऱ्या पक्षी-पाखरांचा वावर वाढवणे इत्यादी उद्देशाने सदर प्रकल्पाची आखणी करण्यात आली.

या प्रकल्पाअंतर्गत तुतीच्या झाडापासून फुटवे कापून घेणे, प्लॅस्टीकच्या पिशव्यांमध्ये खत माती टाकून या फुटव्यांपासून छोटी रोपे बनविणे, तुतीच्या वृक्षारोपणासाठी ग्रंथालयाजवळ जागेची स्वच्छता करून जमीन तयार करणे, या जमिनीत ठराविक अंतरावर खड्डे घेणे, यात तुतीच्या रोपांचे वृक्षारोपण करणे, तायस वेळोवेळी खतपाणी टाकून वाढविणे, तुतीच्या झाडांची योग्य वाढ झाल्यानंतर रेशीम कीटकांची अंडी मागविणे, त्या अंड्यांना योग्य वातावरणात ठेऊन त्यातून अळ्या बाहेर येईपर्यंत ब्लॅक बॉक्समध्ये त्यांचे संगोपन करणे, बाहेर आलेल्या अळ्यांचे ब्रशिंग करून त्यांना त्यांच्या वाढीनुसार वेगवेगळ्या ट्रे मधून पास करणे, त्यांना सतत तुतीचा कोवळा पाला बारीक करून घालणे, त्यांचे वेगवेगळ्या आजारापासून, मुंग्यांपासून संरक्षण करणे, त्यांचा खाद्यकाल संपल्यानंतर त्यांचे कोषात रुपांतर होईपर्यंत संगोपण करणे इत्यादी कामे करण्यात आली. या संपूर्ण प्रकल्पादरम्यान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील आणि पदार्थ विज्ञान विभागाचे विभागप्रमुख प्रा. सुरेंद्र दातार यांच्याकडून वेळोवेळी बहूमूल्य मार्गदर्शन व सहाय्य मिळाले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अद्वैत घाटपांडे, प्रा. सौ. श्वेता पाटील, व प्रा. डॉ. प्रवीण गायकवाड यांच्या सहकार्याने स्वयंसेवकांनी मोठ्या उत्साहाने सदर प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण केला.

**विवध शिबिरांमध्ये सहभाग :** राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शिबिरे जिल्हा व राष्ट्रीय स्तरावर आयोजित केली जातात. सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात प्रसाद नरेंद्र अमृते या स्वयंसेवकाची SRD Camp साठी विद्यापीठ स्तरावर निवड झाली. तसेच रोहित जोशी व कु. संस्कृती चव्हाण या स्वयंसेवकांनी LTP Camp मध्ये सहभाग घेतला.

**विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिर :** राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार सात दिवसीय निवासी शिबीर सोमवार दि. ३ डिसेंबर २०१९ ते रविवार दि. ९ डिसेंबर २०१९ या कालावधीत मौजे मानी-भुते, ता. अलिबाग, जि. रायगड या ठिकाणी आयोजित करण्यात आले. सदर शिबिराचे उद्घाटन मा. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली, सौ. मोनिका म्हात्रे, सरपंच मानी-भुते यांच्या हस्ते झाले. या शिबिरात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी विविध कार्यक्रम आयोजित केले गेले. विद्यार्थ्यांना शारीरिक मानसिक स्वास्थ्य लाभावे म्हणून प्राणायाम, योगासन, कराटे व स्वसंरक्षणाचे धडे दिले गेले. स्वयंसेवकाचा बौध्दिक विकास व्हावा या हेतूने तज्ञ मार्गदर्शकांची व्याख्याने आयोजित करण्यात आली. हे शिबीर 'स्वच्छ भारत समृध्द भारत' हा विषय समोर ठेऊन आयोजित केले होते. सामाजिक बांधिलकी जोपासण्याच्या दृष्टीने मानी-भुते येथे ग्रामस्वच्छता, ग्रामसर्वेक्षण, जनजागृती रॅली, शौचालय निर्मिती असे विविध उपक्रम घेण्यात आले. विद्यार्थअयांना स्वयंरोजगाराचे धडे मिळावे यासाठी कागदी पिशव्या बनवण्याचे प्रशिक्षम व नारळ काढणे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले.

सदर शिबिरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनचे एकूण ९४ स्वयंसेवक व ३ कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले. या शिबिराचा समारोप समारंभ मा. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी मानी-भुते गावच्या सरपंच सौ. मोनिका म्हात्रे, प्रा. डॉ. पी. बी. आचार्य, प्रा. सौ. नम्रता नागावकर, श्री. सानकर व इतर ग्रामस्थ, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. अद्वैत घाटपांडे, प्रा. डॉ. प्रविण गायकवाड, प्रा. सौ. श्वेता पाटील व रा.से.यो. चे शिबिरात सहभागी झालेले स्वयंसेवक उपस्थित होते.

जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा. संजय दत्ता पाटील, उपाध्यक्ष मा. ॲड. गौतम पाटील, सचिव मा. अजित शाह व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील प्रा. अद्वैत घाटपांडे, प्रा. श्वेता पाटील व प्रा. डॉ. प्रविण गायकवाड यांनी कार्यक्रम अधिकारी म्हणून राष्ट्रीय सेवा योजना विभागाची जबाबदारी सांभाळली.

## उन्नत भारत अभियान

केंद्र सरकारच्या मान संसाधन विकास मंत्रालयाच्या उन्नत भारत अभियान या उपक्रमात महाविद्यालयाने सहभाग घेतला आहे. IIT Bombay यांच्याद्वारे आयोजित कार्यशाळेत मा. प्राचार्य डॉ. अनिल पाटील व उन्नत भारत अभियान समन्वयक प्रा. श्वेता पाटील यांनी सहभाग घेऊन सदर उपक्रमाची सविस्तर माहिती घेतली.

या उपक्रमाच्या अंतर्गत महाविद्यालयाने सागाव, तळवली, गोठी, वढाव, वाघोली ही पाच गावे दत्तक घेतेली असून या पाचही गावाचे ग्रासर्वेक्षण पूर्ण झाले आहे. तसेच ग्राम सर्वेक्षणाची माहिती छएत्रृ पोर्टलवर अपलोट केली आहे. ग्रामसर्वेक्षमात या गावामध्ये पाण्याची समस्या, कचरा व्यवस्थापन, रस्ते समस्या, रोजगाराचा अभाव, विविध शासकीय योजनेची माहिती नसणे व त्यांचा फायदा न घेणे, काही ठिकाणी शौचालयांचा अभाव इ. समस्या आढळून आल्या. पुढील शैक्षणिक वर्षांमध्ये या समस्यांवर महाविद्यालयाचे प्राधअयापक तसेच विद्यार्थी काम करणार आहेत.

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग - NSS



समुद्र किनारा स्वच्छता अभियानात सहभागी एन.एस.एस.विद्यार्थी स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी प्रा.श्वेता पाटील व प्रा.डॉ.पी.बी.गायकवाड



सौर दिवा बनविण्याच्या प्रशिक्षण शिबिरात सहभागी विद्यार्थी



गांधी जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात 'महात्मा गांधींची सामाजिक विचारधारा' या विषयावर व्याख्यान देताना प्रा.डॉ.आय.पी. कोकणे



महाराष्ट्र विधानसभा निवडणूक ऑक्टो. २०१९ निमित्ताने मतदान जनजागृतीपर मोहिमेत सहभागी विद्यार्थी कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.पी.बी.गायकवाड व प्रा.जयेश म्हात्रे यांच्यासमवेत



एन.एस.एस. निवासी शिबिर उद्घाटन समारंभ



एन.एस.एस. निवासी शिबिर आरोग्यविषय जनजागृती कार्यक्रम



एन.एस.एस.निवासी शिबिर कागदी पिशव्या बनविणे कार्यशाळा



प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या समवेत कार्यक्रम अधिकारी व एन.एस.एस.विद्यार्थी स्वयंसेवक

# राष्ट्रीय कॅडेट कोर - NCC



स्वातंत्र्य दिन सोहळा

स्वातंत्र्य दिन सोहळ्यानिमित्त
राष्ट्रीय ध्वजाला सलामी देताना NCC कॅडेटस्





6 महाराष्ट्र बटालियन चे CO
कर्नल शिरीष पांडे सर यांची
NCC UNIT युनिटला भेट

स्वच्छता पंधरवडा - सायकल रॅली






जागतिक एड्स दिनानिमित्त आयोजित जनजागृतीपर
रॅलीमध्ये सहभागी NCC कॅडेट्स

युनिट आणि कोस्ट गार्ड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
ऑपरेशन विजय दिवस समारंभ



# क्रीडा विभाग



कु. अथर्व श्रीवर्धनकर (राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत सिल्व्हर मेडल),
व कु. समीर पटेल (विभागीय कराटे स्पर्धेत सहभागी)
यांचा सत्कार करताना प्राचार्य मा.डॉ.अनिल पाटील,
सोबत किनिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडाशिक्षक श्री.बी.आर.गुरव



कु. श्रुती अडित (विभागीय थाळीफेक स्पर्धेत तृतीय क्रमांक)
व कु. ऋचा पाटील (जिल्हास्तरीय ८०० मी. धावणे प्रथम क्रमांक)
यांचा सत्कार करतांना प्राचार्य मा.डॉ.अनिल पाटील,
सोबत क्रीडा शिक्षक श्री.बी.आर.गुरव व श्री.पी.व्ही.पाटील



विभागीय थ्रोबॉल स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या
मुलांच्या संघाचा सत्कार करताना प्राचार्य मा.डॉ.अनिल पाटील,
सोबत कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडाशिक्षक
श्री.बी.आर.गुरव व सौ. जागृती म्हात्रे



विभागीय थ्रोबॉल स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या
मुलींच्या संघाचा सत्कार करताना प्राचार्य मा.डॉ.अनिल पाटील,
सोबत कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडाशिक्षक
श्री.बी.आर.गुरव व श्री.पी.व्ही.पाटील



माजी विद्यार्थी संघटना व गिरीदुर्ग ॲडव्हेंचर्स,
पुणे यांच्यातर्फे आयोजित
'रॅपलिंग आणि ट्रेकिंग' प्रशिक्षण शिबिर



जिल्हास्तरीय शिकाई मार्शल आर्ट स्पर्धेत द्वितीय क्रमांक
पटकावणारी कु. संतोषी थिटे (डावीकडे) व कु. मिताली (सहभागी)
यांचा सत्कार करताना प्राचार्य मा.डॉ.अनिल पाटील, सोबत
कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक श्री.बी.आर.गुरव,
श्री.पी.व्ही.पाटील व सौ. जागृती म्हात्रे

# वार्षिक स्नेहसंमेलन-उन्मेष



वार्षिक स्नेहसंमेलन 'उन्मेष' निमित्त आयोजित
रांगोळी प्रदर्शन पाहताना मा.ॲड.गौतम पाटील,
उपाध्यक्ष, जनता शिक्षण मंडळ, अलिबाग,
महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.अनिल पाटील



वार्षिक स्नेहसंमेलन 'उन्मेष' निमित्त आयोजित
पाककला स्पर्धा



वार्षिक स्नेहसंमेलन 'उन्मेष' निमित्त आयोजित
पुष्परांगोळी स्पर्धा



वार्षिक स्नेहसंमेलन 'उन्मेष' निमित्त आयोजित
कलागुणदर्शनाच्या कार्यक्रमात
समूहगीत सादर करताना विद्यार्थी



वार्षिक स्नेहसंमेलन 'उन्मेष' निमित्त आयोजित
कलागुणदर्शनाच्या कार्यक्रमात आपल्या सुमधुर आवाजाने
श्रोत्यांना मंत्रमुग्ध करताना राज पाटील
(वैयक्तिक गायन-प्रथम क्रमांक)




वार्षिक स्नेहसंमेलन 'उन्मेष' निमित्त आयोजित
कलागुणदर्शनाच्या कार्यक्रमात गोंधळ नृत्य सादर करताना
भक्ती राऊत व मनस्वी सहस्त्रबुध्दे

# वार्षिक स्नेहसंमेलन-उन्मेष



वार्षिक स्नेहसंमेलन 'उन्मेष' निमित्त आयोजित कलागुणदर्शनाच्या कार्यक्रमात द्वंद्वगीत सादर करताना अभिषेक नाईक व मनस्वी सहस्त्रबुध्दे



वार्षिक स्नेहसंमेलन 'उन्मेष' निमित्त आयोजित कलागुणदर्शनाच्या कार्यक्रमात बहारदार लावणी नृत्य सादर करताना श्रेया पाटील (वैयक्तिक नृत्य - प्रथम क्रमांक)



वार्षिक स्नेहसंमेलन 'उन्मेष' निमित्त आयोजित कलागुणदर्शनाच्या कार्यक्रमात देशभक्तीपर नाटीका सादर करताना विद्यार्थी




वार्षिक स्नेहसंमेलन 'उन्मेष' समारोप समारंभात आभार व्यक्त करताना सांस्कृतिक कार्यक्रम प्रतिनिधी प्रांजली जाधव



युवा महोत्सवाच्या विद्यापीठस्तरीय अंतिम फेरीत लोकनृत्य स्पर्धेत सहभागी विद्यार्थिनी



गणेशोत्सवानिमित्त मॉरिशसमध्ये झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी विद्यार्थिनी स्नेहल पाटील (बसलेले-डावीकडून दुसरी) मॉरिशसचे पंतप्रधान प्रविन्द जगन्नाथ यांच्या समवेत

# व्याख्याने, कार्यशाळा, परिसंवाद




शैक्षणिक व करिअर फेअर - जे.एस.एम. करिअर उत्सव..!च्या
उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून
आपले मनोगत व्यक्त करताना
रायगड जिल्हा परिषदचे सदस्य मा. ॲड. आस्वाद पाटील



'प्रभावी अध्यापनासाठी इ-कन्टेन्ट डेव्हलपमेंट'
या विषयावर आधारित दोन दिवसीय कार्यशाळेत
मार्गदर्शन करताना नॉलेज ब्रिजचे
मा. श्री. भूषण कुलकर्णी




जागतिक योग दिवस



विज्ञान दिना निमित्त आयोजित कार्यक्रमात
उपस्थितांना संबोधित करताना
मा. प्राचार्य डॉ. अनिल पाटील



एम. कॉम. अभ्यासक्रमाच्या मंजुरीसाठी
समितीची महाविद्यालयास भेट



परीक्षा पे चर्चा
मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचे
विद्यार्थ्यांना मार्गदर्शन - थेट प्रक्षेपण

# व्याख्याने, कार्यशाळा, परिसंवाद



DLLE - द्वितीय सत्र जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिर



वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात पारतोषिक वितरण करताना उपप्राचार्य प्रा. अविनाश ओक



महिला विकास कक्षातर्फे आयोजित स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिर



महिला विकास कक्षातर्फे आयोजित लघुउद्योग प्रशिक्षण शिबिर



मराठी भाषा व वाङमय अभ्यास मंडळातर्फे आयोजित महाकवी कालिदास दिन कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलताना प्रा. डॉ. मोहसिन खान



'अंतर्गत तक्रार निवारण कक्षातर्फे' आयोजित 'महिलांचे लैंगिक शोषण व कायदे' या विषयावरील व्याख्यान - प्रमुख वक्त्या ॲड. रेश्मा पाटील, प्राचार्य, ॲड. दत्ता पाटील कॉलेज ऑफ लॉ

# वृत्तपत्रांमध्ये जे. एस. एम.

**नव राष्ट्र**

## जहिरहसन अयामुद्दीन कुरेशीची युवा संवाद स्पर्धेत बाजी

**अलिबाग :** जे.एस.एम. कनिष्ठ महाविद्यालयाच्या जहिरहसन अयामुद्दीन कुरेशी या विद्यार्थ्याने जिल्हास्तरीय युवा संसद स्पर्धा २०१९ मध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला. युवा जागर, महाराष्ट्रावर बोलू काही अंतर्गत जिल्हा क्रीडा विभागामार्फत या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. अलिबाग तालुक्यातील जिल्हा क्रीडा संकुल नेहुली येथे स्पर्धा पार पडली. जहिरहसन अयामुद्दीन कुरेशी याने युवा संसद आयोजित तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेतदेखील प्रथम येण्याचा मान मिळवला होता. जे.एस.एम. कनिष्ठ महाविद्यालयाच्याच श्रद्धा वैशंपायन हिने या



या दुहेरी उज्वल यशाबद्दल महाविद्यालयाचे व्यवस्थापन, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका वृंदा एरंडे, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी यश

**पुढारी**

## जेएसएम कॉलेज विद्यापीठात सर्वोत्कृष्ट

### प्रजासत्ताकदिनी मुंबईत विशेष सोहोळ्यात होणार गौरव

**अलिबाग : पुढारी वृत्तसेवा**

येथील जनता शिक्षण मंडळाच्या (जेएसएम) महाविद्यालयाची मुंबई विद्यापीठाच्या ग्रामीण क्षेत्रातील महाविद्यालयातील सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील सर्वोत्कृष्ट महाविद्यालय म्हणून विद्यापीठाकडून निवड करण्यात आली आहे. रविवार दि.२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी मुंबई विद्यापीठाच्या सर फिरोजशाह मेहता सभागृहात संपन्न होणाऱ्या एका विशेष सोहोळ्यात जेएसएम कॉलेजला पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येणार असल्याची माहिती मुंबई विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. अजय देशमुख यांनी दिली आहे.



**तत्कालीन कुलाबा व आताच्या रायगड जिल्ह्यातील स्थानिक तरुणांना उच्च शिक्षण देण्याच्या उद्देशाने जुलै १९५९ मध्ये जनता शिक्षण मंडळाची स्थापना झाली. जून १९६१ मध्ये तत्कालीन मुंबई विधिमंडळाचे सभापती नानासाहेब कुंटे यांच्या अध्यक्षीय नेतृत्वाखाली महाविद्यालयाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. आणि कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेच्या प्रथम वर्गास प्रारंभ झाला.**

जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष संजय पाटील, सर्व संचालक, प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी महाविद्यालय या उच्च स्तरावर घेवून जाण्याकरिता केलेल्या यशस्वी प्रयत्नांची दखल घेवून यंदा जेएसएम महाविद्यालयाची विद्यापीठाने निवड केली आहे. जानेवारी १९८७ मध्ये महाराष्ट्र राज्य विधानसभेतील विरोधी पक्षनेते ॲड. दत्ता पाटील यांची जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. त्यांच्या नेतृत्वाखाली या महाविद्यालयाच्या विकासाची नवी योजना आखून ती राबविण्यात आली. जून २००० मध्ये स्थापन झालेल्या जनता शिक्षण मंडळाच्या ॲड. दत्ता पाटील लॉ कॉलेजच्या उभारणीत त्यांचा मोलाचा वाटा होता. गेल्या ५९ वर्षांत या महाविद्यालयातून हजारो विद्यार्थी पदवी घेवून विविध क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत.

**पुढारी**

## कोरोना लढ्यात उतरणार एनसीसी कॅडेट

### तात्पुरत्या नियुक्त्यांसाठी संरक्षण मंत्रालयाने दिल्या मार्गदर्शक सूचना, सत्वर अंमलबजावणी

**अलिबाग : जयंत धुळप**





**एनसीसी देशातील सर्वात मोठी गणवेशधारी युवा संघटना**

## एचआयव्ही जनजागृतीसाठी जेएसएममध्ये रेड रिबन क्लब

**रायगड :** आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त एचआयव्ही जनजागृती जे.एस.एम महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व ६ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. कॅडेड. व जिल्हा रुग्णालय एड्स नियंत्रण व प्रतिबंध विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने एचआयव्ही/एड्स याआजाराविषयी समाजात तसेच युवावर्गात जनजागृती व्हावी या उद्देशाने महाराष्ट्रात राज्य एड्स नियंत्रण संस्था वडाळा, मुंबई मा. प्रकल्प संचालक,




जनजागृती करण्यात आली. तसेच '६ महाराष्ट्र एन.सी.सी.बटालियन युनिट' जे.एस.एम. महाविद्यालय प्राध्यापक वर्ग यांना एचआयव्ही या आजाराविषयी माहिती व युवकांमध्ये जनजागृती, आजाराविषयी असलेले

**पुढारी**

## मॉरिशसच्या गणेशोत्सवात घुमला अलिबागचा आवाज

### स्नेहल पाटीलने पंतप्रधानांच्या उपस्थितीत सादर केली सुमधुर गीते

**अलिबाग : विशेष प्रतिनिधी**

मॉरिशस मधील गणेशोत्सवात यंदा मुंबई विद्यापीठाच्या गीतसंगीत चमुला निमंत्रीत करण्यात आले होते. विद्यापीठीच्या चमूने सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांत अलिबागच्या जे.एस.एम.कॉलेजची माहिती व तंत्रज्ञान विषयाची विद्यार्थिनी स्नेहल पाटील हिने, मॉरिशसचे पंतप्रधान प्राविंद जगन्नाथ यांच्या उपस्थितीत सुमधुर गीते सादर करुन तेथील रसिकांची मने जिंकली.



केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशात व जगभरात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. मॉरिशसमधील मराठी भाषीकांचा आगळावेगळा गणेशोत्सव आतापर्यंत जगभरात संगीत गायन, नाट्यगीत गायन या दोन्ही विभागात प्रथम तर सुगम संगीत गायन विभागात द्वितीय क्रमांक पटकावला व्यवस्थापन तसेच प्राचार्य डॉ.अनिल पाटील, प्रा.सुरेंद्र दातार, रायगड (दक्षिण) विभागाचे सांस्कृतिक कार्यक्रम

**मॉरिशसच्या मराठी सांस्कृतिक केंद्राच्या माध्यमातून दरवर्षी**




## कै. ॲड. दत्ता पाटील यांचा स्मृतीदिन

### जे.एस.एम.महाविद्यालयात गुणवंतांचा सत्कार

**। वावे । वार्ताहर ।**

लोकनेते कै.ॲड. दत्ता पाटील यांच्या स्मृतीदिनानिमित्त मंगळवार, दि. २७ रोजी जे.एस.एम. महाविद्यालयातील कनिष्ठ महाविद्यालय तसेच पदवी आणि पदव्युत्तरस्तरावरील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

कै. जयवंत केळुसकर सभागृहात आयोजित या कार्यक्रमाला जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष संजय पाटील, सचिव अजित शाह उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्रांगणातील ॲड. दत्ता पाटील यांच्या पुतळ्यास उपस्थितांनी पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतीस अभिवादन केले.

गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. अनिल पाटील उपस्थित होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. नीळकंठ शेरे, प्रा. अविनाश ओक, प्रा. सुरेंद्र दातार, पर्यवेक्षक वृंदा एरंडे, प्रा. ए. व्ही. जाधव उपस्थित होते.

लोकनेते मा.दत्ता पाटील यांचे जीवन सर्वांसाठी स्फूर्तीदायक आहे; विद्यार्थ्यांनी यश प्राप्त करण्यासाठी कठोर परिश्रम घ्यावे व शिक्षणाकडे गांभीर्याने पाहावे, असे मत प्राचार्य अनिल पाटील यांनी व्यक्त केले. प्रा. ए. व्ही. जाधव यांनी शैक्षणिक अहवालाचे वाचन केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. या सत्कार सोहळ्यास गुणवत्ताप्राप्त ७६ विद्यार्थी उपस्थित होते.

# वृत्तपत्रांमध्ये जे. एस. एम.

## जे. एस. एम. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अनुभवला रॅपलिंगचा थरार

खास प्रतिनिधी, अलिबाग





अलिबाग- केवळ साहसी खेळांची आवड असणाऱ्यांनीच नव्हे तर जीवनात उच्च ध्येय गाठू इच्छिणाऱ्या प्रत्येकानेच रॅपलिंग व ट्रेकिंगचा छंद जोपासायला हवा, असे प्रतिपादन गिरीदुर्ग अॅडव्हेंचर्सचे ट्रेकर सुबोध वैशंपायन यांनी जे. एस. एम. महाविद्यालयात केले. जे. एस. एम. महाविद्यालय व जे. एस. एम. महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटना यांच्यातर्फे गिरीदुर्ग अॅडव्हेंचर्स, पुणे यांच्या सहकार्याने आयोजित रॅपलिंग आणि ट्रेकिंग कॅम्पच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. उद्घाटनप्रसंगी जनता शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष व माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष अॅड. गौतम पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य ... घेता या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना हे प्रशिक्षण देण्यासाठी रॅपलिंग व ट्रेकिंगचा प्रदीर्घ अनुभव गाठीशी असणारे, ७०० हून अधिक ट्रेक यशस्वीपणे पूर्ण करणारे सुबोध ... जिल्हा व सह्याद्रीचा परिसर ट्रेकिंगच्या दृष्टीने समृद्ध परिसर असून ट्रेकिंग करता-करता आपल्याला किल्ल्यांची स्वच्छता व पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने प्रयत्नही करता येतात. यावेळी त्यांनी ट्रेकिंग करताना काय ... प्रशिक्षण घेत रॅपलिंगचा अनुभवला. जे. एस. एम. कॉले... अॅड. दत्ता पाटील लॉ कॉलेज म... ८१ विद्यार्थी व २८ शिक्षका... प्रशिक्षण घेतले. यावेळी खास ... विद्यार्थिनींनी दाखवलेला उ... वाखाणण्याजोगा होता. माजी वि... संघटनेचे महासचिव प्रा. जयेश ... व खजिनदार डॉ. जयश्री पा... वरिष्ठ महाविद्यालय क्रीडा वि... प्रमुख व या शिबिराचे समन्वयक ...

## साहित्याचा अभ्यास सर्वांसाठी आवश्यक - डॉ.अनिल पाटी[ल]

पुढारी

### दै. पुढारी, जेएसएम कॉलेज विद्यमाने महाकवी कालिदास दिन साजर[ा]

अलिबाग : प्रतिनिधी

सुक्ष्म निरिक्षणातून विविध उपमांच्या सहाय्याने प्रेम भावना आणि पर्यावरण यांची अनोखी सांगड ज्यांच्या काव्यांतून अनुभवास येते असे मेघदूतकार महाकवी कालिदास यांच्या काव्य व साहित्याचा अभ्यास केवळ कला शाखेच्याच नव्हे तर सर्व शाखांतील विद्यार्थ्यांनी करणे गरजेचे आहे. 'दै. पुढारी'च्या सहयोगातून महाविद्यालयात प्रथमच साकारत असलेल्या महाकवी कालिदास दिन सोहळ्याची संकल्पना चांगली असून विद्यार्थी महाविद्यालयात नियमित शिक्षणाबरोबर शिक्षणपूरक आणि व्यक्तिमत्व विकासात्मक उपक्रम करीत असतात याची कल्पना दै.पुढारीच्या माध्यमातून आता विद्यार्थ्यांच्या पालकांना येवू शकणार आहे, असे प्रतिपादन येथील जेएसएम.कॉलेजचे प्राचार्य तथा पर्यावरण ...टील यांनी केले आहे. ...जेएसएम कॉलेज ...भाषा, साहित्य अभ्यास ...व साहित्य अभ्यास ...विद्यमाने बुधवारी ...दिनानिमित्त कॉलेजच्या ...र सभागृहात आयोजित ...दिन समारंभाच्या अध्यक्षपदावरुन प्राचार्य डॉ. अनिल पाटील बोलत होते. यावेळी व्यासपिठावर जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा मराठी भाषा व साहित्य अभ्यास मंडळाचे प्रमुख डॉ. निळकंठ शेरे, हिंदी भाषा व साहित्य अभ्यास मंडळाचे प्रमुख डॉ. मोहसिन खान आदी मान्यवर उपस्थित होते.



हिंदी भाषा व साहित्य अभ्यास मंडळाचे प्रमुख डॉ. मोहसिन खान यांनी अत्यंत आत्मियतेने महाकवी कालिदास यांच्या 'मेघदूत' या महाकाव्यासह त्यांच्या विविध साहित्यकृतींचे विविध वैशिष्ठपूर्ण पैलू सर्वांना उलगडून सांगितले. उज्जैनीमध्येच जन्मलेले कवी भूषण हे तेथून रायगडमध्ये येवून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समवेत कार्यरत होते, असे अनोखे साहित्य नाते उज्जैनी आणि रायगडमध्ये असल्याचे डॉ. खान यांनी सांगितले. 'दै. पुढारी'च्या सहयोगातून जेएसएम महाविद्यालयात प्रथमच साकारत असलेल्या महाकवी कालिदास दिन सोहळ्याच्या संकल्पनेचे उपस्थित सर्वच मान्यवरांनी स्वागत केले.तर हिंदी व मराठी साहित्य मंडळांचा हा यंदाचा पहिलाच कार्यक्रम असल्याने विद्यार्थीवर्गात

महाकवी कालिदास यांचे जन्म ठिकाण असणाऱ्या उज्जैनीमध्येच जन्म झालेले हिंदी भाषा व साहित्य अभ्यास मंडळाचे प्रमुख डॉ. मोहसिन खान यांनी अत्यंत आत्मियतेने महाकवि कालिदास यांच्या 'मेघदूत' या महाकाव्यासह त्यांच्या विविध साहित्यकृतींचे विविध वैशिष्ठपूर्ण पैलू सर्वांना उलगडून सांगितले. उज्जैनीमध्येच जन्मलेले कवी भूषण हे तेथून रायगडमध्ये येवून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समवेत कार्यरत होते, असे अनोखे साहित्य नाते उज्जैनी आणि रायगडमध्ये असल्याचे डॉ. खान यांनी सांगितले. महाकवी कालिदासांची सर्व काव्य ही सुखांतीका होत्या, त्याचा अभ्यास करताना तत्कालीन समाज रचना व परिस्थिती विचारात घेवून त्या अभ्यासणु आवश्यक असल्याचे त्यांनी अखेरीस सांगितले.

जिल्हा माहिती अधिकारी ... दुसाने यांनी, महाकवी कालिदास... मेघांनाच आपले दूत बनवून आ... प्राणप्रिय पत्नीपर्यंत पोहोचविण्या... ढगांवर सोपवून माध्यमांना नवा ... काळातच दिला होता, असे यावे... सांगितले. महाविद्या... प्राचार्य तथा मरा... साहित्य अभ्या... प्रमुख डॉ.नि... महाकवी कालि... आपल्या 'मा... खळखळाट..' कवितेतून आदरां... केली. तर महाविद्यालया... विद्यार्थिनींनी स्नेहल सोरटे, मन... श्रद्धा वैशंपायन यांनी आपल्या ... तसेच मान्यवर कवींच्या कवीता... महाकवी कालिदास यांना अनोखी... अर्पण केली. दै. पुढारी रायगड ... जयंत धुळप यांनी उपक्रमाची सं... विषद केली. तर दै.पुढारीचे जा... व्यवस्थापक गणेश दाते यांनी प्र... केले. कार्यक्रमाच्या आयोजना... महाविद्यालयाचे प्रा. जयेश म्हात्रे... टिमने परिश्रम घेतले.

## जे.एस.एम. महाविद्यालयाकडे विजेतेपद

### मुंबई विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा

अलिबाग

मुंबई विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन झोन ४ कबड्डी स्पर्धेत अलिबाग येथील जे.एस.एम. महाविद्यालयाने विजेतेपद पटकावले. जे.एस.एम. कॉलेजच्या कबड्डी संघाने १३ वर्षांनंतर अंतिम विजेतेपद मिळाले आहे. कर्नाळा स्पोर्ट्स अॅकॅडमी, बार्न्स कॉलेज, पनवेल येथे पार पडलेल्या या स्पर्धेत रायगड, नवी मुंबई, ठाणे जिल्ह्यातील ४८ महाविद्यालयांतील कबड्डी संघांनी सहभाग घेतला होता. या सर्व कबड्डी संघांमध्ये अटीतटीच्या लढती झाल्या. या अटीतटीच्या लढतीमध्ये जे.एस.एम. कॉलेजच्या कबड्डी संघाने उत्कृष्ट कामगिरी ... (उपकर्णधार), करण म्हात्रे, विनय पाटील, सशांत मगर, आदेश पाटील, इस्माइल वासकर, साहिल राऊत, अखिल ठाकूर, वृणाल सुतार, विप्रय सावंत, मंथन सुर्वे, रोहन वर्तक या खेळाडूंचा समावेश होता. या खेळाडूंनी या स्पर्धेमध्ये आपली सर्वोत्तम कामगिरी दर्शविली. यामुळेच जे.एस.एम. कॉलेजच्या कबड्डी संघाला १३ वर्षांनंतर अंतिम विजेतेपद मिळविता आले. या विजयी संघाचे व्यवस्थापन व प्रशिक्षक म्हणून क्रीडा विभागप्रमुख प्रा. एन.ए. बाबर यांनी काम पाहिले व मोलाचे मार्गदर्शन केले. या विजयी संघाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील, जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष संजय पाटील, ...

## एन.एस.एस. शिबिरातून विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकास साधावा – प्राचार्य डॉ. अनिल पाटील

। रायगड टाइम्स ।



अलिबाग । एन.एस.एस. शिबिरांतून विद्यार्थ्यांना आपल्या व्यक्तिमत्व विकासाची संधी मिळत असते, या संधीचा फायदा घेत विद्यार्थ्यांनी ग्रामविकासाची कामे करता-करता आपला सर्वांगीण विकास साधावा, असे प्रतिपादन जे. एस. एम. कॉलेजचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले.

जे. एस. एम. महाविद्यालय, अलिबाग तर्फे राष्ट्रीय सेवा योजना विशेष निवासी शिबिराचे आयोजन २२ ते २९ डिसेंबर या कालावधीत मौजे मानीभुते ता. अलिबाग येथे करण्यात आले आहे. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. अनिल पाटील अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. शिबिराचे उद्घाटन मोनिका म्हात्रे, सरपंच ग्रामपंचायत मान तर्फे झिराड यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच चंदा म्हात्रे, मुख्याध्यापक सुनील पाटील उपस्थित होते.

एन.एस.एस. शिबिरांतून समाजसेवेच्या संस्कारांसोबत लेखन, वाचन, अभिव्यक्ती संस्कारदेखील होत असतात त्यामुळे विद्यार्थ्यांनी आणि समाज विकासात आपले योगदान द्यावे, असे आवाहन डॉ. अनिल पाटील यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा.अविनाश ओक, सल्लागार समितीचे सदस्य प्रा.जयेश म्हात्रे, प्रा.डॉ. एस.ए. कानडे, प्रा.डॉ. जयश्री पाटील, प्रा. आचार्य रमेश ग्रामस्थ व माजी विद्यार्थी उपस्थित होते.

सात दिवसांच्या कालावधीत चालणाऱ्या या शिबिरात ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, शौचालय निर्मिती, अंधश्रद्धा निर्मूलन, पथनाट्यातून जनजागृती, विविध विषयावरील व्याख्याने, उपक्रमांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच त्यांच्यामध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करण्याच्या दृष्टीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

शिबिराचा समारोप २९ डिसेंबर रोजी सकाळी १०:३० वाजता मुंबई विद्यापीठाचे रा. से. यो. कार्यक्रम समन्वयक प्रा.सुधीर पुराणिक यांच्या प्रमुख उपस्थितीत प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होईल. शिबीर यशस्वी होण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा.अद्वैत घाटपांडे, प्रा.श्वेता पाटील, प्रा.डॉ. प्रवीण गायकवाड परिश्रम ...

## युवा महोत्सवात 'जेएसएम'चे यश

### विविध स्पर्धांमध्ये चमक; यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव

अलिबाग, ता. ९ (बातमीदार) : मुंबई विद्यापीठाच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत युवा महोत्सवाचे आयोजन केले होते. यानिमित्त अनेक स्पर्धा झाल्या. त्यामध्ये अलिबागमधील जेएसएम महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धांमध्ये यश मिळविले. या विद्यार्थ्यांचा संस्थेचे उपाध्यक्ष अॅड. गौतम पाटील यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

माणगाव येथे युवा महोत्सवाच्या जिल्हास्तरीय फेरीत जेएसएम महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एकूण २७ स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. त्यापैकी १५ स्पर्धा ... झोन क्रमांक आठमध्ये सर्वाधिक पारितोषिके पटकाविली. अंतिम फेरीत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. त्यात ... कथाकथनमध्ये प्रांजली प्रमोद जाधव हिने प्रा. जयेश म्हात्रे लिखित 'निरोप' ही कथा सादर करत कास्यपदक मिळविले. नुकतेच मॉरिशस येथील ... गायन स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषि[क] प्राप्त केले. अभिषेक पाटील याच... उत्कृष्ट अभिनेता म्हणून उत्तेजना[र्थ] पारितोषिकासाठी निवड झाली... राज्यस्तरीय 'इंद्रधनुष्य' या स्पर्धे[त] सहभागी होणाऱ्या मुंबई विद्यापीठाच्या संघनिवडीसाठी हे चारही विद्यार्थी पा[त्र] ठरले आहेत. सर्व विद्यार्थ्यांचा सत्का[र] जनता शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष अॅ[ड.] गौतम पाटील यांच्या हस्ते करण्या[त] आला. प्राचार्य डॉ. अनिल पाटील, उपप्राचार्य डॉ. नीळकंठ शेरे, ओएसडी प्रा. एस. बी. दातार, सांस्कृति[क] कार्यक्रमप्रमुख प्रा. जयेश म्हात्रे, माजी सांस्कृतिक कार्यक्रमप्रमुख प्र...



अलिबाग : विद्यार्थिनीचा गौरव करताना अॅड. गौतम पाटील.

पुढारी

## जे.एस.एम.महाविद्यालयात योग दिन उत्साहात

नागाव : हर्षल मोरे

जे.एस.एम.महाविद्यालयात योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करून पाचवा आंतरराष्ट्रीय जागतिक योग दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख प्रा.बी.आर.गुरव हे योग प्रशिक्षक म्हणून, तर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ.अनिल पाटील कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

एन.सी.सी. अधिकारी कॅ.डॉ.मोहसीन खान यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी सकाळी ठीक ७.३० वाजता योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनी श्रद्धा वैशंपायन हिने प्रारंभी योग प्रार्थना सादर केली. त्यानंतर योग प्रशिक्षक प्रा.बी. आर.गुरव यांनी महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांना योगाच्या विविध आसनांचे प्रशिक्षण दिले. यावेळी २१व्या शतकात योगाभ्यासाचे महत्व या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा.बी.आर.गुरव यांनी प्रत्येकाने दिवसातील किमान अर्धा तास योगासने करण्यासाठी द्यावा आणि योग या प्राचीन भारतीय परंपरेचा प्रचार आणि प्रसार जगभर व्हावा यासाठी सर्वांनीच प्रामाणिक प्रयत्न करावे असे आवाहन केले.



महाविद्यालयातील एन.सी.सी. कॅडेट, एन.एन.एस. स्वयंसेवक, क्रीडा विभागातील विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. एन.सी.सी. अधिकारी कॅ.डॉ.मोहसीन खान, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.अद्वैत घाटपांडे, प्रा. श्वेता पाटील, प्रा.डॉ.पी.बी.गायकवाड, वरिष्ठ महाविद्यालय क्रीडा विभाग प्रमुख प्रा.एन.ए.बाबर, प्रा.जयेश म्हात्रे यांनी आयोजनात सहभाग घेतला.


महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
३ रा मजला, मंत्रालय विस्तार इमारत, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
निविदा सूचना
संदर्भ :- वित्त विभाग पत्र क्र.शावनि-१०१९/प्र.क्र.१५/प्रशासन-५, दिनांक : २८.०५.२०१९
उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये मोहोरबंद निविदा मागविण्याकरिता देण्यात आलेल्या जाहिरातीस तांत्रिक अडचणीमुळे दिनांक ०१ जुलै, २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. यासंदर्भातील निविदेच्या अटी-शर्ती व सर्व तपशीलवार माहिती महाराष्ट्र शासनाच्या http://www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.
सही/-

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) (व्याजाचे रकमेतून) सन २०१८-१९ अंतर्गत
ई-निविदा क्र. २०६२ व २०६३ / सन २०१९-२० ची निविदा सूचना
महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) (व्याजाचे रकेतून) सन २०१८-१९ अंतर्गत २ कामांची ई-निविदा क्र. २०६२ व २०६३/ सन २०१९-२० ई-टेंडर पद्धतीने ऑनलाईन मागविणेसाठी अहमदनगर महानगरपालिकेच्या http://amc.maharashtra.etenders.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तरी याची संबंधितांनी नोंद घ्यावी.
सही/-
आयुक्त
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर


Raigad Edition

# वृत्तपत्रांमध्ये जे. एस. एम.

## जेएसएम महाविद्यालयात सोलार स्टडी लॅम्प प्रशिक्षण

गांधी जयंतीचे औचित्य साधून शिबीर संपन्न; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



## जे.एस.एम. महाविद्यालयात करिअर फेअरचे आयोजन

माजी विद्यार्थी संघटनेचा स्तुत्य उपक्रम

## जेएसएम कॉलेज माजी विद्यार्थी संघटना स्थापन



**अलिबाग : शहर वार्ताहर**

जनता शिक्षण मंडळाच्या जेएसएम महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांची संघटना स्थापन करण्यात आली. संघटनेच्या अध्यक्षपदी जनता शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष तथा महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी अॅड. गौतम पाटील यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती प्राचार्य तथा संघटनेचे सचिव डॉ. अनिल पाटील यांनी दिली.

तसेच उपाध्यक्ष सुरेंद्र दातार, सचिव डॉ. अनिल पाटील, सहसचिव जयेश म्हात्रे, खजिनदार डॉ. जयश्री पाटील, सदस्य अॅड. प्रसाद पाटील, जयंत धुळप, डॉ. सोनाली पाटील, डॉ. मिनल पाटील, मयुरी पाटील, प्रविण पाटील आदींचा समावेश आहे. गुरुवारी महाविद्यालयात पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली. यावेळी अॅड गौतम पाटील, डॉ. अनिल पाटील यांच्यासह संघटनेचे उपाध्यक्ष प्रा डॉ. सुरेंद्र दातार यांच्यासह पदाधिकारी, प्राध्यापक उपस्थित होते. १९६१ साली जेएसएम कॉलेज अलिबागमध्ये सुरू करण्यात आले. ५८ वर्षांपासूनच्या माजी विद्यार्थ्यांना एकत्रित आणून महाविद्यालयाच्या पुढील विकासात सहभाग घेण्याच्या उद्देशाने माजी विद्यार्थ्यांची संघटना स्थापन करण्यात आली असल्याची माहिती प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी दिली. सदर संस्थेची नोंदणी धर्मादाय आयुक्तांकडे करण्यात आली आहे.

### आजी माजी विद्यार्थ्यांमध्ये ठरणार दुवा

जेएसएम कॉलेजच्या सर्व माजी विद्यार्थ्यांना एकत्रित आणून महाविद्यालयाच्या पुढील विकासात व वाटचालीत सहभागी करून घेण्याच्या उद्देशाने जेएसएम कॉलेज माजी विद्यार्थी संघटनेची स्थापना करण्यात आली असून ही संघटना आजी- माजी विद्यार्थ्यांमधील दुवा ठरणार असल्याचा विश्वास संघटनेचे अध्यक्ष अॅड. गौतम पाटील यांनी गुरुवारी आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केला आहे.

अॅड. गौतम पाटील म्हणाले की, जेएसएम कॉलेजचा माजी विद्यार्थी या संघटनेचा सदस्य होऊ शकतो. सदस्यत्वाचे अर्ज महाविद्यालयाच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. सदस्यत्वासाठीचा अर्ज संघटनेच्मार्फत मंजूर केला जाईल. अर्ज मंजूर झाल्यास तसे अर्जदाराला कळविले जाईल. त्यानंतर महाविद्यालयाच्या वेबसाईटवर फॉर्म भरण्यासंबंधी सूचना पाठविली जाईल. सदर फॉर्म व सभासद फी भरल्यानंतर सभासदत्व देण्यात येणार आहे. संघटनेचे आश्रयदाते होऊ इच्छिणाऱ्या माजी विद्यार्थ्यांसाठी १० हजार रू. इतके सभासद नोंदणीशुल्क निश्चित करण्यात आले आहे. तर आजीव सभासदत्वासाठी १ हजार रू. तर वार्षिक सभासदत्वासाठी २००, आणि महाविद्यालयातून पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी १०० रू इतके नोंदणी शुल्क घेण्यात येईल. तसेच परदेशात वास्तव्यास [illegible]

## नवराष्ट्र

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात

जेएसएम महाविद्यालयात राबवले विविध उपक्रम | मातृभाषा शिक्षणाचे माध्यम असायला हवे



## पुढारी

## जेएसएमची विद्यार्थ्यांना गुगल स्टडी 'लिंक'

विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण अभ्यासासाठी प्राध्यापक वर्गाचे महत्पूर्ण योगदान



### एनसीसी-एनएसएसचे विद्यार्थी आपत्ती मुकाबल्यासाठी सज्ज

प्राचार्य डॉ.अनिल पाटील हे व्हॉट्सअॅप व ईमेल या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत वेळोवेळी संदेश पोहचवत आहेत. कॅ.मोहसिन खान यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय छात्र सेवेचे विद्यार्थी कोव्हीडच्या प्रादूर्भावांतर्गत उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या सेवांबाबत प्रशिक्षण घेत आहेत तर राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी जनजागृती करण्याच्या ऑनलाईन ट्रेनिंगमध्ये सहभागी झाले आहेत.

Raigad E
15 Apr, 2020
Powered by :

## जेएसएममध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात



**। नागाव । वार्ताहर ।**

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त जे.एस.एम. [illegible] वाचन करून माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना अभिवादन केले.

तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा निम [illegible] शतकात ग्रंथालयाचे महत्त्व मला आवडलेले पुस्तक या विषयांवरील निबंधलेखन, लेखी प्रश्नमंजुषा अशा विविध स्पर्धा व वाचनध्यास, नो गॅझेट डे, निवडक उताऱ्यांचे वाचन अशा विविध उपक्रमांचे आयोजन महाविद्यालयाच्या ग्रंथालयात यावेळी करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ.नीळकंठ शेरे उपस्थित होते.

डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलामांचे साहित्य तसेच वाचनीय अशा विविध ग्रंथाचे ग्रंथप्रदर्शनही भरविण्यात आले होते. निबंधलेखन स्पर्धेत पारितोषिक मिळविणाऱ्या मानसी राऊत या विद्यार्थिनीने वाचन संस्कृतीचे जतन आवश्यक आहे या विषयावर अभिवाचन केले, तर काव्यलेखन स्पर्धेत पारितोषिक मिळविणाऱ्या मनश्री पवारने पुस्तक या कवितेचे वाचन केले.

## जे.एस.एम. कॉलेजचे युवा महोत्सवात घवघवीत यश



सोरटे, हर्षदा रिसबूड, मीरा पाटील, हृतिक झेमसे, नाट्यगीत गायन- प्रथम क्रमांक- स्नेहल पाटील, शास्त्रीय गायन- प्रथम क्रमांक- स्नेहल पाटील, सुगम संगीत गायन- द्वितीय क्रमांक- स्नेहल पाटील. कथाकथन (मराठी)- द्वितीय क्रमांक- प्रांजली जाधव, चित्रकला- द्वितीय क्रमांक- धीरज इंदुलकर- कोलाज- द्वितीय क्रमांक- धीरज इंदूलकर, मेहेंदी- द्वितीय क्रमांक- भक्ती राऊत, माईम, द्वितीय क्रमांक-

## सकाळ




अलिबाग : प्रभात फेरीमध्ये सहभागी झालेले विद्यार्थी.

### अलिबागमध्ये युवा दिनानिमित्त प्रभात फेरी

अलिबाग : आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त एचआयव्ही जनजागृती

# वृत्तपत्रांमध्ये जे. एस. एम.

## महिलांनी लैंगिक शोषणाविरोधात आवाज उठवायला हवा

### ॲड. रेश्मा पाटील यांचे आवाहन



### उपस्थितांनी घेतली विविध कायद्यांची माहिती

## जेएसएम महाविद्यालयाच्या वतीने स्वच्छतेबाबत जनजागृती

। अलिबाग । वार्ताहर ।

जे.एस.एम. कॉलेज, अलिबाग येथे राष्ट्रीय सेवायोजना यांच्या माध्यमातून स्वच्छता पंधरवडा हा उपक्रम राबविण्यात आला. या निमित्ताने पथनाट्य, जनजागृती रॅली यासह अनेक कार्यक्रम पार पडले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील, प्रा. अविनाश ...

आले व स्वच्छतेची शपथ देखी[ल] घेण्यात आली तसेच स्वच्छताविषय[क] जनजागृती रॅली काढण्यात आल[ी]. स्वच्छता पंधरवडा अंतर्गत स्वच्छ[ता] जनजागृतीवर आधारित पथनाट[्य] कार्यक्रम करुन विविध कार्यक्रमांच[्या] माध्यमातून स्वच्छता पंधरवडा साज[रा] केला. या उपक्रमाचा भाग ...

## अलिबागमध्ये एड्स दिनानिमित्त जनजागृ[ती]

» जिल्हा सामान्य रुग्णालयापासून काढली रॅली; उत्स्फूर्त प्रतिसाद

। रायगड टाइम्स ।

अलिबाग । जागतिक एड्स नियंत्रण दिन व पंधरवडानिमित्त आयोजित रॅलीचे उद्घाटन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अजित गवळी, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, संदीप वीरभद्र स्वामी, अध्यक्ष लायन्स क्लब श्रीबाग अंकित बंगेरा व चित्रलेखा पाटील, निहा राऊत लायन्स क्लब श्रीबाग, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा एड्स नियंत्रण व प्रतिबंध विभाग संजय माने यांच्या हस्ते करण्यात आले.



ही रॅली यशस्वी होण्यासाठी गिरीश म्हात्रे, गौरी म्हात्रे, हर्षद घरत, नेहा घरत, संतोष साखरे, बाबासाहेब चौगुले, कला पाटील, वैशाली बंगेरा, डॉ. स्मिता पाटील, रक्तसंक्रमण अधिकारी डॉ.दिपक गोसावी, वरिष्ठ वैधकीय अधिकारी डॉ. पांडरंग ...

अनिल खंडाळे, समुपदेशक, सुजाता तु... अमित सोनवणे, गणेश सुतार, प्रयोगशाळ[ा] हेमकांत सोनार, वाहनचालक महेश घाडगे, पाटील, क्लिनर रुपेश पाटील, संकेत घरत विशेष परिश्रम घेतले.

## जे.एस.एम. महाविद्यालयात गांधी जयंती

अलिबाग : जे.एस.एम. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व उन्नत भारत अभियान अंतर्गत राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांची १५० वी जयंती व पूर्व प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांची ११६ वी जयंती महाविद्यालयाच्या केळुस्कर सभागृहामध्ये साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे विषयावर व्याख्यान देताना महात्मा गांधीजीची सत्य, अहिंसा व खेड्याकडे चला ही तत्वप्रणाली आज काळाची गरज आहे असे मत व्यक्त केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध उपक्रमाची माहिती दिली. तसेच आज पर्यावरण संवर्धन व स्वच्छता काळाची गरज बनली आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. आपल्याकडून पर्यावरणाची कोणत्याहि प्रकारची हानी होणार नाही याची दक्षता सर्वांनी घ्यावी, असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. त्यानंतर सर्वांना स्वच्छतेची व पर्यावरण संवर्धनाची शपथ प्राचार्यांनी उपस्थितांना दिली.

## जेएसएम महाविद्यालय येथे रक्तदान शिबीर

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

...जे.एस.एम. महाविद्यालय, अलिबाग येथे राष्ट्रीय ...योजना विभाग, एक्स एनसीसी कॅडेट असोसिएशन ...व्हिल हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ...११/२०१९ रोजी महाविद्यालयामध्ये रक्तदान ...र आयोजित केले. यासाठी महाविद्यालयाचे ...र्य डॉ. अनिल पाटील, उपप्राचार्य प्रा. डॉ. ...

## बारा तास अभ्यास करुन महामानवाला अभिवादन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जेएसएम महाविद्यालयात एक आगळा वेगळा उपक्रम राबविण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १८ तास अभ्यास केला. त्यांचा आदर्श आजच्या विद्यार्थ्यांनी घ्यावा म्हणून महाविद्यालयाच्या वाचनालयात सलग बारा तास अभ्यास हा स्तुत्य उपक्रम राबवून महामानवाला अभिवादन करण्यात आले.



बारा तास अभ्यास उपक्रमात सहभागी झालेले शिक्षव व विद्यार्थी.

जेएसएम महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. प्रेम आचार्य यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते झाले. डॉ. बाबासाहेब ... अभिवादन करून सलग बारा तास अभ्यास या उपक्रमाला सुरुवात करण्यात आली. सकाळी सात ते सायंकाळी सात यावेळेत सलग बारा तास अभ्यास उपक्रम घेण्यात आला.

प्रा. अविनाश ओक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रकांड पांडित्य, विविध विषयांचा असलेला गाढा अभ्यास, पुस्तकांवर असलेले प्रेम यावर भाष्य केले. प्राचार्य डॉ. अनिल का. पाटील ... समता, स्व... याबद्दलची ... बाबासाहेब ... संघटित व्हा ... आणि विद्या...

...१९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2020)
» शनिवार, दि. ३० नोव्हेंबर २०१९ २

## जे. एस. एम.महाविद्यालयात संविधान दिन साजरा

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी । जेएसएम महाविद्यालय ...

तसेच सर्वांना संविधान दिनाच्या शुभेच्छा दिल्या व संविधानातील ...

# वृत्तपत्रांमध्ये जे. एस. एम.

## शैक्षणिक वृत्तांत



व्यसनमुक्तीची शपथ घेताना जे.एस.एमचे विद्यार्थी

### जे. एस. एम. च्या विद्यार्थ्यांची व्यसनमुक्तीसाठी सामूहिक शपथ

**नागाव :-** व्यसनाधीनतेला आळा बसावा व मुलांमध्ये याविषयं जाणीव निर्माण व्हावी म्हणून तंबाखू व्यसनमुक्तीसाठी जे. एस. एम महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे तंबाख व्यसनमुक्तीसाठी सामूहिक शपथ कार्यक्रम आयोजित केला. सद कार्यक्रमामध्ये एकूण १०३५ विद्यार्थी व १९ शिक्षक सहभागी झाले.

सदर कार्यक्रमामध्ये रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. ए.सी घाटपांडे, प्रा. श्वेता पाटील आणि डॉ. पी.बी. गायकवाड यांनी मार्गदर्श केले. तसेच 'संबंध हेंल्थ फौन्डेशन' या एनजीओने तयार केलेल तंबाखू व्यसनमुक्तीची चित्रफित विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली त्यानंतर विद्यार्थ्यांना तंबाखू व्यसनमुक्तीसाठी सामूहिक शपथ दिली. यामध्ये बी. ए., बी.कॉम., बी. एस्सी., व बी. एम. एस.च्य ६२१ विद्यार्थिनी व ४१४ विद्यार्थी अशा एकूण १०३५ विद्यार्थ्यांनी तंबाखू व्यसनमुक्तीसाठी सामूहिक शपथ घेतली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या बहुमूल्य मार्गदर्शनाखाली सद

## जेएसएम महाविद्यालयात इ-कंटेन्ट डेव्हलपमेंट कार्यशाळा

**अलिबाग : विशेष प्रतिनिधी**

प्रभावी अध्यापनासाठी इ- कंटेन्ट विकसित कसे करावे याचे प्रशिक्षण महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकांना द्यावे, या हेतूने जेएसएम महाविद्यालय व नॉलेज ब्रिज, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभावी अध्यापनासाठी इ- कंटेन्ट डेव्हलपमेंट या विषयावर आधारित २ दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील उपस्थित होते. तसेच प्रमुख प्रशिक्षक व मार्गदर्शक म्हणून नॉलेज ब्रिजचे भूषण कुलकर्णी व एकनाथ कोरे उपस्थित होते.

यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. नीळकंठ शेरे, उपप्राचार्य प्रा. अविनाश ओक, ओएसडी. प्रा. सुरेंद्र दातार उपस्थित होते. महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या कार्यशाळेसाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तंत्रज्ञानात ज्या तीव्र गतीने बदल होत आहेत, त्याच गतीने शिकणे- शिकविणे- शिकणारे- शिकविणारे यांच्या व्याख्यांमध्येही बदल होत आहे. अध्यापनाची पारंपरिक व्याख्यानपद्धती कधीही

जोड देत अध्यापन अधिकाधिक आकलनसुलभ व विद्यार्थीलक्ष्यी होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याची वेळ आता आली असल्याचे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी व्यक्त केले.

अध्यापनात माहिती व तंत्रज्ञानाचा वापर म्हणजे केवळ पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनचा वापर करणे हा समज बाजूला ठेवून माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करीत अध्यापन अधिकाधिक प्रभावी होण्याकरीता पाठावर, विषयावर आधारित व्हिडिओची निर्मिती करून त्याचा अध्यापनात उपयोग करणे, तसेच समाजमाध्यमांचा वापर करीत सर्व विद्यार्थ्यांसाठी या गोष्टी खुल्या करणे याची आवश्यकता असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेत एखाद्या विषयावर आधारित व्हिडीओ निर्मिती कशी करावी, एडिटिंग कसे करावे, तांत्रिकदृष्ट्या अचूक ध्वनीमुद्रण कसे करावे, विविध इफेक्ट्सचा वापर कसा करावा, याचे प्रशिक्षण विविध सत्रांमधून दिले गेले. या कार्यशाळेमुळे इ- कंटेन्ट विकसित करून अध्यापन अधिकाधिक प्रभावी करता येईल, असे मत सहभागी प्राध्यापक व शिक्षकांनी व्यक्त केले. या कार्यशाळेच्या आयोजनात समन्वयक म्हणून ग्रंथपाल प्रा.सुबोध डहाके व प्रा. जयेश म्हात्रे यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली.

## गुणवत्तेकडे दुर्लक्ष करू नका - प्रा.अविनाश ओक

**नागाव : वार्ताहर**

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम केवळ कर्मकांड न होता त्यातून यशस्वी फलश्रुती व्हावी व स्वंयसेवकांनी उपक्रम साजरे करत असताना शैक्षणिक गुणवत्तेकडे दुर्लक्ष करता कामा नये, असे मत राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात प्रा. अविनाश ओक यांनी केले.

अलिबाग येथील जे. एस. एम. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत राष्ट्रीय सेवा योजना 'काल आणि आज आणि व्यक्तिमत्व विकासातील राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान' या विषयावर परिसंवाद जे.एस.एम. महाविद्यालयाच्या केळुस्कर सभागृहात पार पडला. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी कार्यक्रमाला निळकंठ शेरे, प्रा. अविनाश ओव प्रा. सुरेंद्र दातार, प्रा. प्रेम आचार्य प्रा. जयेश म्हात्रे, शैक्ष. वर्षातील रा.से.योजना कार्यक्रम अधिकार प्रा. अव्दैत घाटपांडे, प्रा.श्वेत पाटील, डॉ. प्रविण गायकवाड, अॅड रत्नाकर पाटील, विजय कोकणे व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे ६५ स्वयंसेवक उपस्थित होते. एकमेकांना सहाय्य करणे हा मानवीधर्म आहे म्हणून राष्ट्रीय सेवा योजना हेच उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून कार्य करत आहे, असे मत प्रा. सुरेंद्र दातार यांनी व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजनेला दहा वर्षापूर्वी या विभागाला उपक्रम राबविण्यासाठी जो निधी मिळत होता तेवढाच निधी मिळत आहे.

त्यामुळे निधी अपुरा पडत असल्याने शासकीय पातळीवर निधीत वाढ करण्यासाठी विचार होणे गरजेचे असल्याचे, मत रा.से. योजनेचे माजी कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रेम आचार्य

## अलिबाग समुद्रकिनारी स्वच्छता मोहीम

**अलिबाग**

**केंद्र सरकारच्या** आवाहनानुसार स्वच्छता पंधरवडाअंतर्गत १ ते १५ डिसेंबर या कालावधीत प्लॉचगिंग म्हणजेच डस्टिंग वेस्टॉ कलेक्शन कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमात अलिबाग येथील जे एस. एम. महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले आहे. एनसीसी व एनएसएस युनिटच्या वतीने आज अलिबाग येथे समुद्रकिनारी स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली होती. या उपक्रमास सेवाभावी संस्थादेखील सहभागी झाल्या होत्या. सर्वांनी मिळून किनारा स्वच्छ केला. या मोहिमेचे नेतृत्व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले



## सिकाई मार्शल आर्ट स्पर्धेत शुभमची सुवर्ण कामगिरी



**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ यूथ विभागाच्या व महाराष्ट्र सिकाई फेडरेशनच्या वतीने नाशिक येथील विभागीय क्रीडा संकुलामध्ये दि. १७ व १८ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय, तसेच राष्ट्रीय सिकाई चॅम्पीयनशिप स्पर्धेत जे.एस.एम. महाविद्यालयाचा विद्यार्थी शुभम नखाते या विद्यार्थ्याने दोन्ही स्तरावर सुवर्णपदकाची कामगिरी केली आहे.

विसावी जुनिअर व सिनिअर सिकाई मार्शल आर्ट स्पर्धेत राज्यातील विविध जिल्ह्यांतून स्पर्धक आले होते. त्या स्पर्धकांमधून जे.एस.एम. महाविद्यालया शुभम नखातेने सिनिअर कॅटेगिरी स्पर्धेम सुवर्णपदक पटकाविले. त्यामुळे त्य राष्ट्रीय स्तरावर निवड झाली. तसेच नाशि येथे दि. २३ ते २५ नोव्हेंबर रोजी झाले राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेतदेखील सं देशातून सिनिअर कॅटेगिरीमध्ये शुभम नख याने सुवर्णपदक पटकाविले. याबद्दल ज शिक्षण मंडळाचे अध्यक्ष संजय पाटी उपाध्यक्ष अॅड. गौतम पाटील, सेक्रे अजित शाह, प्राचार्य डॉ. अनिल पाटी क्रीडा विभागप्रमुख प्रा. एन.ए. बाब क्रीडा समिती सदस्य, प्राध्यापक आद शुभमचे अभिनंदन केले.

## तरुणांनो देशसेवेसाठी सैन्यात सामील व्हा

### कमांडंट अरुणकुमार सिंग यांचे आवाहन; जेएसएम महाविद्यालय, तटरक्षक दलाचा शहिदांना सॅल्यूट

**रायगड : प्रतिनिधी**

२६ जुलै १९९९ हा दिवस सर्व भारतीयांच्या हृदयावर अभिमानाने कोरला गेलेला दिवस आहे. कारण याच दिवशी भारतीय सैन्याने कारगिलमध्ये घुसखोरी केलेल्या पाकिस्तानी सैन्याला चारीमुंड्या चीत करीत युद्ध जिंकले होते. सुमारे अडीज महिने चाललेल्या या 'ऑपरेशन विजय'मध्ये देशाने ५२७ पेक्षा अधिक वीर योद्धे गमावले. तर १३०० पेक्षा जास्त जवान जखमी झाले. अशा शहिदांना श्रद्धांजली देण्यासाठी आणि देशसेवेसाठी तरुणांनी सैन्यदलात दाखल व्हावे आणि आपले कर्तव्य बजावावे, असे आवाहन तटरक्षक दलाचे कमांडंट अरुणकुमार सिंग यांनी केले.

कारगिल विजय दिवस साजरा करण्याकरिता जेएसएम महाविद्यालय अलिबाग येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कारगिल विजयात शहिदांना श्रद्धांजली देण्यासाठी आणि तरुणांना प्रेरणा देण्यासाठी तटरक्षक दल मरूड येथील

छाया : रमेश कांबळे



कारगिल विजय दिनाच्या कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना सैन्य दलात खास करून तटरक्षक दलाच्या जवानांना युद्धासाठी देण्यात आलेल्या शस्त्रे आणि इतर वस्तूंचा परिचय करून देण्यात आला. ही शस्त्रे युद्धामध्ये कशी वापरता येतात. त्यांचा वापर कसा करावा कोणत्या शस्त्राला काय बोलले जाते, याची सखोल माहिती यावेळी तटरक्षक दलाचे जवानांनी दिली.

जवान उपस्थित होते. त्यांच्यासमवेत महाविद्यालयातील एनसीसी आणि एनएसएसचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात कप्तान डॉ. मोहसीन खान यांनी प्रास्ताविक करून

कमांडंट शैलेश गुळवे, असिस्टंट कमांडंट अदिती शर्मा, असिस्टंट कमांडंट आकिम जुत्शी, अधिकारी राकेश कुमार, प्रधान नाविक राजेश कुमार, उत्तम नाविक परवीन कुमार, उत्तम नाविक नवीन यादव, नाविक

उपस्थित होते.

संपूर्ण देशात कारगिल विजय दिनाचा उत्सव साजरा करण्यात आला. कारगिलमधील यशस्वी ऑपरेशनमधून मिळालेल्या विजयानंतर हे नाव देण्यात

पाकिस्तानला पराभूत करून मोहीम यशस्वी केली होती. कारगिल युद्धात खऱ्या अर्थाने आपले योगदान देणाऱ्या सैनिकांच्या सन्मानार्थ दरवर्षी २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस साजरा केला जातो. कारगिल युद्धातील शहिदांना आणि त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी हा दिवस समर्पित आहे. आपल्या या नायकांची आठवण करीत विजय दिन साजरा करतो, असे कमां अरुणकुमार सिंग म्हणाले.

आपल्या देशासाठी लढलेल्या आपल्या महान सैनिकांना आपण स्मरणात ठेवले पाहिजे आणि या देशाच्या प्रादेशिक अखंडतेला परत मिळवले पाहिजे. युवकांनी देश रक्षणातील युद्धात आपल्या नायकानी दाखवलेल्या शौर्यापासून त्यांनी शिकायला हवे. त्यांच्या त्यागातून प्रेर घेतली पाहिजे आणि प्रत्येकाने या मह राष्ट्राच्या अखंडतेसाठी योगदान देण्या गरज आहे, असे महाविद्यालयाचे प्राच

## जे.एस्.एम्. महाविद्यालयात 'राष्ट्रीय सेवा योजना दिन कार्यक्रम' संपन्न

**अलिबाग :-** जे.एस.एम. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून दि. २४ सप्टेंबर रोजी विविध कार्यक्रम

स्वयंसेवक रत्नाकर पाटील, प्रतिम सुतार, विजय कोकणे आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे ६५ स्वयंसेवक उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजनेचे योजनेचे स्वयंसेवक सागर म्हात्रे व मानसी म्हात्रे यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शन केले. तसेच संपूर्ण

## जे.एस.एम.महाविद्यालयात लघुउद्योग प्रशिक्षण



# आमचं महाविद्यालय



मुख्य इमारत



नवीन कार्यालय इमारत



वर्गखोली



प्रयोगशाळा



विद्यार्थिनी वसतीगृह



सुसज्ज कार्यालय



कॉन्फरन्स रुम



एन.सी.सी. कार्यालय

# आमचं महाविद्यालय



ग्रंथालय



ग्रंथालय अभ्यासिका



प्राचार्य मा.डॉ.अनिल पाटील यांच्या समवेत
वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षक वृंद




मुंबई विद्यापीठातर्फे आयोजित युवा महोत्सवाचे जिल्हास्तरीय विजेतेपद पटकावणारा संघ
मा. प्राचार्य डॉ. अनिल पाटील, जिल्हा समन्वयक प्रा. जयेश म्हात्रे,
सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख डॉ. पी. बी. आचार्य,
संघव्यवस्थापक डॉ. सुनील आनंद, प्रा. रिध्दी गुरुजी, प्रा. चैताली चौधरी यांच्यासह



आंतरमहाविद्यालयीन कबड्डी झोन-४ च्या स्पर्धामध्ये अंतिम विजेतेपद पटकावणारा संघ
मा. प्राचार्य डॉ. अनिल पाटील, क्रीडा विभाग प्रमुख प्रा. एन. ए. बाबर,
कार्यालयीन अधिकारी जी. के. गीते यांच्यासह

राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद

विश्वविद्यालय अनुदान आयोग का स्वायत्त संस्थान

NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL

*An Autonomous Institution of the University Grants Commission*

# Certificate of Accreditation

The Executive Committee of the
National Assessment and Accreditation Council
on the recommendation of the duly appointed
Peer Team is pleased to declare the

Janata Shikshan Mandal's

Smt. Indirabai G. Kulkarni Arts College, J. B. Sawant Science College and Sau. Janakibai Dhondo Kunte Commerce College

Alibag, Dist. Raigad, affiliated to University of Mumbai, Maharashtra as

**Accredited**

with CGPA of 2.08 on seven point scale

at B grade

valid up to July 02, 2023

Date : July 03, 2018

Director